

विश्वव्यापिनी संस्कृति

समन्वयमहर्षि प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबरामहाराज अन्वेषिता

विश्वव्यापिनी संस्कृति

डॉ. कृष्ण माधव घटाटे

आणि

सुरेश मापारी

विश्व हिंदु परिषद एकात्मता यज्ञ प्रकाशन

।। श्रीगंगायात्रा त्रिवेणीसंगमक्षेत्र नागपुरम् ।।

युगाब्द ५०८५/कार्तिक शुद्ध दशमी/२९ नोव्हेंबर १९८३

प्रज्ञाचक्षू समन्वयमहर्षि श्रीगुलाबराव महाराज प्रणीत

१. **धर्म समन्वय विचार**
पृष्ठ ५२ / हिंदी / मराठी / मूल्य २ रु.

२. **धर्म आणि व्यवहार**
पृष्ठ ७६ / मराठी / मूल्य २ रु.

३. **विश्वव्यापिनी संस्कृति**
पृष्ठ १०८ / हिंदी / मराठी / मूल्य ५ रु.

5. **Universal Culture**
Pages 96 / English / Rs. 5/-

विश्व हिंदु परिषद, अष्टविनायक, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर.

प्रकाशक :– **वसंत धुंडिराज पाठक**, एम. ए. एम. एड्. मंत्री, विश्व हिंदु परिषद
अष्टविनायक, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर.

मुद्रक :– **तरुण भारत प्रिंटर्स अँड प्रोसेसर्स लि.**, रामदासपेठ, नागपूर.

श्रीगुलाबराव महाराज वाङमय प्राप्तव्य स्थान :–

- मधुर दर्शन, गोकुळ, घटाटे ले-आऊट, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
- श्रीज्ञानेश्वर मंदिर, दहिसाथ, अमरावती.
- इंद्रायणी साहित्य, २७३, शनिवारपेठ, पुणे–४११०३०.

॥ परमगुरु श्रीगुलाबरावमहाराजानां उत्तराधिकारि-
सद्गुरु श्रीबाबाजीमहाराजपण्डितचरणयोः
समर्पितम् ॥

।। श्री ज्ञानेश्वर माऊली ।।

युगाब्द

आपली भारतवर्षाची हजारो वर्षांची अत्यंत प्राचीन संस्कृती आहे. आपल्या धार्मिक जीवनासाठी उपयोगात आणत असलेल्या पंचांगात लक्षावधि वर्षांच्या कालगणनेची, ज्योतिष् आणि सूक्ष्म गणितानुसार, शास्त्रशुद्ध पद्धती आढळते. त्यानुसार आज सातव्या वैवस्वत मन्वन्तरातील अठ्ठावीसवे महायुग चालू आहे. त्यापैकी कृतयुगाची १७,२८००० वर्षे–त्रेतायुगाची १.२९६००० वर्षे–द्वापारयुगाची ८६४००० वर्षे आणि कलियुगाची ५०८४ वर्षे वर्ष प्रतिपदेला पूर्ण झाली असून ५०८५ वे बर्ष चालू आहे.

आज भारतात प्रचलित असलेल्या कालगणनेत शालीवाहान शक, विक्रम संवत, शिवराज्याभिषेक शक, हिजरी सन, ईसवी सन–या सर्वांपेक्षा आपली भारतीयांची कालगणना व्यक्ति निरपेक्ष आणि अत्यंत प्राचीन असून ती ज्योतिष् आणि गणिताच्या शास्त्रशुद्ध वैज्ञानिक पद्धतीने सर्वोत्कृष्ट सिद्ध झालेली आहे, हे आपण भारतीयांना अभिमानास्पद आहे.

या विश्वोत्पत्तीपासूनच्या कालगणनेचा दैनंदिन व्यवहारात उपयोग केल्यास आपल्या पूर्वजांच्या ज्ञानविज्ञानसंपन्न, वैभवसंपन्न आणि साऱ्या विश्वाचे जगद्गुरुत्व भूषणविणाऱ्या पुरातन संस्कृतीचे संस्मरण होत राहील व त्यापासून स्फूर्तीचा स्रोत मिळत राहील आणि पुढे केव्हातरी लवकरच असा एक सोनियाचा दिवस उगवेल की ज्या दिवशी सारा मानव समाज या प्राचीनतम कालगणनेचा पुनः स्वीकार करील, हीच एक दुर्दम्य आशा बाळगून "युगाब्द" नामक कालगणना दैनंदिन जीवनात पुनः सुरू करण्याचा निर्णय आपण सर्वांनी मिळून घेतलेला आहे.

गीतेत भगवान् स्वतःला "अनुमंता" म्हणवितात. त्यांनी या शुभ आणि मंगल उपक्रमाला अनुमोदन द्यावे, हीच प्रार्थना।

कार्तिक शु. १०
युगाब्द ५०८५

–श्रीधर गणेश पांढरीपांडे
मंत्री, विश्वहिन्दू परिषद,
प्रदेश, कार्यालय, अष्टविनायक, खरे टाऊन,
धरमपेठ, नागपूर–४४००१०.

...वाचण्यापूर्वी

भारतीय एकात्मतेला आधार आहे प्राचीन इतिहासाचा-परंपरांचा आणि संस्कृतीचा! तोच आधार आज डळमळत आहे. प्राचीन परंपरांचे नाते तोडून टाकण्यास आज आपणातील "शहाणी" मंडळी उद्युक्त झाली आहेत. "जुन्यातील वाईट" मरणालागी जाऊ देणे, शहाणपणाचे असले तरी "जुन्यातील चांगल्यालाही सोडून देणे" हे मात्र शहाणपणाचे नाही. त्यासाठी आपल्या ठिकाणी चांगल्यालाही 'वाईट' समजण्याची प्रवृत्ती कां निर्माण झाली हेही लक्षात घेणे जरूर आहे. हिंदु राष्ट्राच्या भावविश्वाला उध्वस्त करणाऱ्या इंग्रजी कुटिल नीतीचे स्वरूप लक्षात घेण्यासाठी इंग्रजी अंमलात 'काय झाले, कसे झाले' हे पाहणे अगत्याचे आहे.

"Divide and rule" या कुटिल नीतीचा अवलंब केलेल्या इंग्रजांनी दीड दोनशे वर्षे राज्य केले. सत्ता बळकट करण्यासाठी आणि ख्रिस्तीधर्म प्रसारासाठी भारतीयांची मनोभूमिका बदलणे त्यांना आवश्यक वाटले. त्यासाठी त्यांनी शैक्षणिक योजना आखून प्राचीन परंपरेचा धागा तोडून टाकण्याचा जबरदस्त प्रयत्न केला. त्यातूनच "तुमचे पूर्वज मूर्ख होते, त्यांना साधा इतिहासही लिहिता येत नव्हता, प्राचीन वेदशास्त्रे, पुराणे, धर्म, तत्त्वज्ञाने सारी टाकाऊ आहेत" असे गोड शब्दात शिकविले. आणि त्याच योजनेतून "आर्य वंश होता, त्याने आक्रमण केले, आणि मूळच्या आदिवासींवर अत्याचार करून त्यांना शूद्रत्व दिले" वगैरे खुळचट आणि अप्रमाण अपसिद्धान्त नव्या कोवळ्या पिढीच्या डोक्यात शिक्षणाच्या माध्यमातून भरविले. पण अजूनही स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ५० वर्षे होत आली तरीही, भारतीय सत्यान्वेषी विद्वानांनी सत्याचा शोध घेऊन "शत्रूंनी केलेल्या निंदेवर विश्वास ठेवण्याची गरज नसते" असे लक्षात घेऊन, आपल्या पूर्वजांचा खरा इतिहास, पुनः लिहिण्याचा सामूहिक प्रयत्न केला नाही, हे आपल्या एकसंघ राष्ट्राचे फार मोठे दुर्दैव आहे. शासन आणि विद्वत्सभा या दोघांच्याही नाकर्तेपणाची कटू फळे आज आपल्याला चाखावी लागत आहेत. आर्य-अनार्य, आक्रमक-आदिवासी, उत्तर-दक्षिण, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, वगैरे सारख्या द्वेषभावना खोटया आणि अतिरंजित इतिहासाच्या आधारावर उफाळून आल्या आहेत. आणि आज आपल्या विशाल आणि विविधतेतील सामरस्य कायम राखणाऱ्या प्राचीनतम राष्ट्राला एकात्मतेसाठी प्रयत्न करावा लागतो यातच इंग्रजी कुटिल नीतीला बळी पडलेल्या आपल्या राष्ट्राचा दारुण पराभव आहे. परंतु या राष्ट्राने अनेक पराभव पचविले आहेत. त्यातच हाही पराभव पचवून पुनः सशक्त, तेजस्वी आणि सत्त्वसंपन्न आर्यावर्ताचे

स्वप्न साकार करण्याचे दुर्दम्य सामर्थ्य भारतमातेच्या सुपुत्रांत नक्कीच आहे. "हा तो नोहे निराशेचा ठाव !"

याच एका दुर्दम्य आशेतून प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराजांनी जन्मांध असूनही प्राचीन शास्त्रांची नव्याने मांडणी केली. इतिहासाकडे पाहण्याच्या दृष्टीला जो कावीळ झाला होता. तो काढून टाकण्याचा प्रयत्न केला. ते म्हणतात-"आर्यांचे म्हणणे बरोबर आहे, हे सिद्ध करण्याशिवाय मला आणि माझ्या हितचिंतकांना दुसरे कोणतेही जीवनकर्तव्य नाही" याच त्यांच्या जीवननिष्ठेतून इतिहास सूत्रांचीही मांडणी त्यांनी केली. आजच्या विज्ञानप्रणीत इहवादातून भोगवादाकडे झुकलेल्या पण मूळात त्यागप्रधान असलेल्या भारतीय समाजाला प्राचीन इतिहासाकडे निर्मळ रीतीने पाहण्याची जी दिव्य दृष्टी जन्मांध सत्पुरुषाने दिली तिच्याकडे लक्ष वेधण्याचा लहानसा प्रयत्न म्हणजे ही लहानशी पुस्तिका होय.

या पुस्तिकेत सृष्टीच्या उत्पत्तिपासून आजपर्यंत जो सांस्कृतिक बदल होत गेला त्याच्या आधाराने घेतलेला लहानसा आढावा आहे. तो संक्षेपाने असा-

अडीच हजार वर्षापूर्वी सर्व जगात एकच वैदिक आर्य संस्कृती व्यापून होती. पुढे मात्र-

कालचक्रानुसार भारत सोडून इतरत्र सर्व जगात संस्कारलोप झाला. अध्ययन अध्यापन बंद झाले. नानाविध ज्ञानशाखा विस्मृत झाल्या. त्यामूळे अधोगती होता होता युरोप वगैरे देश तर अगदी रानटी अवस्थेपर्यंत पोचले. आणि अज्ञानाचे अंधःकारयुग आले.

पण याच काळात मानवी संस्कृतीच्या सुदैवाने भारतातील सांस्कृतिक परंपरा त्या तमोयुगातही टिकून राहिल्या.

त्यामुळे पुनः अरबी, इजिप्ती वगैरे देशातील विद्वानांनी भारतातील ज्ञानविज्ञानाचे प्रवाह आपापल्या देशात नेले. आणि त्यांचा युरोपापर्यंत पुन्हा विस्तार झाला. म्हणूनच- "भारतातून आम्हाला धर्म मिळाला, तत्त्वज्ञान मिळाले, वैद्यकशास्त्र मिळाले," वगैरे उद्गार पाश्चात्य पंडितांनी मोठ्या गौरवाने काढले.

जसे आज गणित-विज्ञान-वैद्यकशास्त्र वगैरे आधुनिक शास्त्रे मूळात भारतीय असूनही "इंग्रजांनी ती भारतात आणली" असे आपण समजतो, त्याचप्रमाणे पाश्चात्य आणि पौर्वात्य जगात हजारो वर्षापूर्वी वैदिक संस्कृती असूनही- तिच्या आत्यंतिक विस्मृतीमुळे "भारतापासून ती शास्त्रे आम्हाला मिळाली" असे पाश्चात्य पंडितांना वाटल्यास नवल नाही.

त्यानंतरच्या काळात भारतही निस्तेज होऊ लागला. शास्त्राध्ययनाच्या परंपरा (विशेषत: वैशेषिक दर्शनातील प्रत्यक्ष खंड जो विज्ञानाचे मूळ आहे) खंडित झाल्या. जुने अवशेष केवळ ग्रंथरूपाने शिल्लक राहिले. त्यावेळी यावनी नरपशूंचे आक्रमण झाले. त्यांनी नालंदा, तक्षशीला वगैरे अनेक ग्रंथालयातील, हजारो नव्हे लक्षावधि, ग्रंथांची होळी केली. त्यामुळे भारतावरही अज्ञानयुगाचे घोर सावट पडले. परंतु अध्यात्म आणि वेदपरंपरा मात्र कशाबशा टिकून राहिल्या.

पुढे या देशात इंग्रज आले. त्यांनी युरोपातील वैज्ञानिक सुधारणा, तत्त्वज्ञान, वैद्यकशास्त्र, गणित, खगोलशास्त्र वगैरे विज्ञान भारताला शिकविले. पण या साऱ्या ज्ञानशाखांचे मूळ भारतीय आहे याची जाणीव मात्र दोघांनाही नव्हती. या रीतीने भारतातून पूर्वी बाहेर गेलेल्या विद्यांचे माहेरघरी पुनरागमन झाले. मात्र त्यामुळे शिष्याने गुरूला शिकविण्याचा लाजिरवाणा प्रसंग आला.

यात भाग्याची गोष्ट एवढीच की, आपल्या पूर्वजांनी वैदिक परंपरा पूर्णत: विस्मृत होऊ दिल्या नाहीत. कोणी ना कोणी महापुरुष निर्माण होतात आणि सारे जीवन खर्ची घालून एकेक ज्ञानशाखा जिवंत ठेवतात. त्यामुळें आजच्या मतामतांच्या गलबल्यातही प्राचीन वैभवाच्या आणि ज्ञानसंपन्नतेच्या सुवर्णस्मृती कायम आहेत. पूजनीय गुरुजींच्या शब्दात सांगावयाचे म्हटले म्हणजे,

"सत्प्रवृत्तीची बीजं कायम राखली गेली आहेत" अन् यातूनच भोगप्रधान आसुरी संस्कृती बाजूला सारली जाऊन प्राचीन आर्यांची त्यागप्रधान वैदिक संस्कृतीची विजयपताका साऱ्या जगात पुन्हा डौलाने फडकेल. "कृण्वन्तो विश्वमार्यम्" ही ऋषींची प्रतिज्ञा पूर्ण होईल. "पृथिव्यै समुद्रपर्यन्ता एक राट्"– समुद्रवलयांकित सर्व पृथ्वी एका राष्ट्राप्रमाणे एकरस होईल. सत्प्रवृत्त, अध्यात्मप्रवण आणि वैभव संपन्न अशी आद्य मानवांची संस्कृती पुन: येईल यात मुळीच संशय वाटत नाही. श्रीगुलाबराव महाराजांनी एके ठिकाणी मार्मिक उद्‌गार काढले आहेत. ते म्हणतात–

"दुसरीकडे कितीहि जड सुधारणा झाली तरी तिचा जेव्हा कंटाळा येईल तेव्हा सर्वांना शांति आर्यावर्तातच मिळेल. आणि यास्तव आर्यदेश टिकला आहे आणि टिकेल."

जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परे घडो । मैत्र जीवाचे ।।
दुरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो ।
जो जो वांछील तो ते लाहो । प्राणिजात ।। ज्ञानेश्वरी ।।

□ □ □

कालचक्र परिवर्तन

भारत		युरोपादि जगत्
१) वेदकाल (प्रकाशयुग)	सृष्टि उत्पत्तिपासून (अनादिकाल)	१) वेद काल (प्रकाश युग)
२) ,,	युगाब्द (कलियुगापासून) २५०० पर्यंत	२) संस्कारलोप–परंपरालोप (अज्ञान युग)
३) बाह्य जगाला ज्ञान विज्ञानाचे अध्यापन. प्रकाशयुगाचे उत्तरायण	युगाब्द २५०० नंतर	३) भारतापासून पुनः ज्ञानविज्ञानाचे अध्ययन. (उदयकाल)
४) परकीय आक्रमणामुळे विज्ञानपरंपरा खंडित परंतु वेद अध्यात्म कायम (धूसर युग)	युगाब्द ४००० नंतर	४) केवळ विज्ञानशास्त्र-विस्तार परंतु अध्यात्म परंपरा नष्ट. भौतिकवाद वृद्धि. (विज्ञानयुग)
५) इंग्रजांकडून विज्ञानाचे शिक्षण, भारतीय शिक्षण विकृति (विज्ञान युगाची सुरुवात)	युगाब्द ४९०० पासून	५) भारताकडून गीता, योग, वेदान्त, अध्यात्म आणि संस्कृत शिक्षणाची सुरुवात.
६) अध्यात्माकडून भोगवादाकडे	युगाब्द ५००० नंतर	६) भोगवादाकडून अध्यात्माकडे

टीप : युगाब्द म्हणजे कलिवर्ष ५०८५/इ. सन १९८३.

विषयानुक्रम

आगे बढो

रा. स्व. संघाचे परम पूजनीय गुरुजी गोळवलकर हे आमच्या कुटुंबियांशी अगदी निकटचे. लहानपणी त्यांनी आम्हाला अंगाखांद्यावर खेळविलेले. आमच्या घरचे कोणतेही कार्यक्रम गुरुजींशिवाय झाले नाहीत, असे आमचे घरोब्याचे संबंध ! माझ्या प्रबंधाचा आराखडा तयार झाल्यानंतर काही दिवसांनी योगायोगाने पूजनीय गुरुजी आमचे घरी विश्रांतीला आले असता प्रबंधाचा विषय निघाला. श्री गुलाबराव महाराजांच्या वाङमयावर मी लिहिणार आहे असे ऐकून त्यांना आनंद झाला. त्यांनी महाराजांच्या संप्रदायाशी स्वत:ची असलेली जवळीक मला सांगितली व म्हणाले "मुळे मास्तरांना मी महाराजांचे सर्व ग्रंथ वाचून दाखविलेले आहेत." नंतर प्रबंधाचा आराखडा स्वत:हून पाहिला व म्हणाले "पुढे जे काय लिहिशील ते मला पहावयाचे आहे."

विद्यार्थी दशेपासून पू. गुरुजींचा महाराजांच्या संप्रदायाशी निकट संबंध होता. महाराजांचे शिष्य श्री मुळे मास्तर (नागपूरच्या नीलसिटी हायस्कूलचे मुख्याध्यापक) यांचेकडे गुरुजी विद्यार्थी दशेत राहत असत. तसेच महाराजांचे उत्तराधिकारी श्रीबाबाजीमहाराज पंडित यांचेशी गुरुजींचा नातेसंबंध होता व गुरुजींच्या मातोश्रींचा–ताईंचा श्रीबाबाजी महाराजांवर गुरुभावही होता. या सर्व ऋणानुबंधामुळे त्यांना माझ्या प्रबंधा विषयी उत्सुकता होती.

गुरुजी – "महाराजांच्या साहित्यावर लेखन करणे अवघड आहे. पण आता ठरविलेच आहे तर मग मागे पाय घेऊ नकोस."

प्रोत्साहन मिळाले. धीर आला. तरी मी एक शंका विचारली.

समन्वय विचार

मी– "महाराजांनी नानाविध विषयांवर विपुल लेखन केले आहे. खंडन करताना कोणाचाही मुलाहिजा ठेवलेला नाही. पण प्रसंगविशेषी खंडन करून पुन: त्याचाच ते समन्वयही करून दाखवितात. तेव्हा याची संगती कशी लावणार ?"

गुरुजी हंसले व म्हणाले– "अरे, अभ्यास करणारा तू! तूच संगती लावायला हवी. मला महाराजांचे ग्रंथ वाचून बरेच दिवस झालेत. आता बरोबर आठवतही नाही. परंतु एक लक्षात ठेव की महाराजांनी जे काय खंडनमंडन केले ते द्वेषबुद्धीने केलेले नाही. तुम्ही संशोधक स्वत:ची मते साधुसंतांवर लादून काय वाटेल ते लिहिता ! असा प्रकार टाळावयास हवा. महाराजांनी एका ठिकाणी एखाद्या व्यक्तीचे खंडन केले आहे तर दुसरीकडे तिची स्तुतीही केली आहे याचा अर्थ त्यांच्या मनात कोणत्याही प्रकारचा आकस नाही हे निश्चित ! महाराजांना धर्मदृष्टीने किंवा भक्तिदृष्टीने जे चूक वाटले ते त्यांनी खोडून काढले पण चांगल्या गोष्टी त्यांनी स्वीकारणीयही ठरविल्या. त्यांनी भिन्न भिन्न धर्मांचे किंवा मतांचे अद्वैतज्ञानदृष्टीने व परखड युक्तिवादाने खंडन केले पण लोकांमध्ये विनाकारण परस्पर विद्वेष पसरू नये यासाठी त्यांचा समन्वयही करून दाखविला. आपली मते समतोलपणाने आणि तौलनिक रीतीने मांडली. स्वत: कुणबी जातीत जन्मूनही स्वजातिबांधवांच्या द्वेषमूलक युक्तिवादांची चिकित्सा केली. परस्पर विरोधी असलेल्या दोन्ही बाजू अगदी स्पष्टपणे पुढे मांडल्या आणि भारतीय समाजात जातींचा "भेद" नसून "व्यवस्था" असल्याचे प्रतिपादन केले. आपल्या समाजातील भिन्न भिन्न घटकांनी परस्पर भांडू नये यासाठी त्यांनी अत्यंत महत्व असलेला **"समन्वयविचार"** मांडला.

"हा समन्वयविचार म्हणजे देशातील सामाजिक बंधुभावाला

महाराजांनी दिलेले तात्त्विक अधिष्ठान आहे." या समन्वय-विचाराचे फार दूरगामी परिणाम होण्याजोगे आहेत. मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, बौद्ध वगैरे धर्मसंप्रदायांतील प्रमुख तत्त्वे, त्या त्या धर्मांपेक्षा ऐतिहासिक दृष्टीने प्राचीन असलेल्या हिंदुसंस्कृतीत म्हणजे पर्यायाने वैदिक आर्यसंस्कृतीत कशी सापडतात, याचे त्यांनी विवेचन केले. त्यासंबधी त्यांनी दाखविलेली दिशा महत्त्वपूर्ण आहे. त्यानुसार प्रबोधन झाले तर केवळ भारतीय समाजच एक होईल असे नसून जगातील सर्व धर्मांचे समाज परस्पर सामंजस्याने राहू शकतील. इतका महाराजांचा समन्वय-विचार प्रभावी आहे."

बघता बघता महाराजांच्या समन्वयसूत्राची गुरुजींनी दाखवून दिलेली ही 'सामाजिक व्याप्ती' नेहमीकरताच माझ्या लक्षात राहिली.

(इ. स. १९६८)

पूजनीय गुरुजींनी 'श्रीगुलाबराव महाराजांची विचारसंपदा' या माझ्या प्रबंधाची सारी प्रकरणे स्वत: वाचून काढली आणि प्रत्येक विषयावर माझेशी चर्चा केली. मात्र महाराजांचा इतिहासविषयक दृष्टिकोण मांडताना मला फार अवघड गेले. आर्यांच्या इतिहासाबद्दलचे संदर्भ इतके विपुल आहेत की, काय घ्यावे व काय सोडावे, हे कळत नाही. कच्चे प्रकरण तयार झाले तेव्हा मार्च १९७३ असावे. गुरुजींची प्रकृती दिवसेंदिवस क्षीण होत होती. बराच वेळ बसणे होत नसे की वाचनही होत नसे. त्या काळात कोणी डॉक्टर वगैरे आसपास नाहीत असे पाहून मी हेडगेवार भवनामध्ये गुरुजींकडे जात असे. श्री कृष्णराव मोहरील मात्र हाताने खुणावून आत जावयास सांगायचे. माझ्यावरचा कृष्णरावांचा लोभ असा व्यक्त होत असे.

एक दिवस ५०-६० पानांचे इतिहासाचे प्रकरण घेऊन गुरुजींकडे गेलो. त्यांना पाहून मनात आले की गुरुजींच्या अशा रुग्णावस्थेत त्यांना 'वाचा' म्हणणे अगदी क्रूरता आहे. आणि त्याबरोबर मनात संकोचही वाटत

होता की, आपण गुरुजींच्या उत्तर ध्रुवासंबंधीच्या मताहून वेगळे प्रतिपादन केलेले आहे. ते वाचून त्यांना काय वाटेल ? पण मनात हीही खात्री होती की माझे चुकले असेल तर गुरुजी समजावून सांगतील व मला माझे मत दुरुस्त करावे लागेल. पण त्याहीपेक्षा गुरुजींची प्रतिक्रिया पाहण्याची उत्सुकता अधिक मला होती.

गुरुजींच्या हसतमुख उल्लसित वृत्तीमुळे भीड चेपली गेली. गुरुजींनीच चौकशी केली आणि मी त्यांना सारे कागद दिले. या रुग्ण अवस्थेत वाचण्यासाठी २–३ दिवस सहज लागतील असे वाटल्याने ३–४ दिवसांनी त्यांचेकडे जाण्याचे मी ठरविले. पण दुसरेच दिवशी कृष्णराव मोहरीलांचा फोन आला. "भैय्या तू अजून आला कसा नाहीस ? गुरुजी तुझी आठवण करीत आहेत." मी तावडतोब कार्यालयात गेलो. दुपारचे ३॥–४ वाजले होते. भीतभीतच खोलीत प्रवेश केला. गुरुजी स्वस्थ बसले होते. त्यांनी एकदम विचारले--

गुरुजी – "सकाळपासून तुझी वाट पहात होतो."

मी – "आपली तब्येत बरी नाही. वाचायला दोन दिवस सहज लागतील असे वाटले म्हणून उद्या येणार होतो."

गुरुजी – "अरे, मी तर केव्हाच वाचले. चांगला अडीच तास बसलो होतो. एका दमात वाचून काढले."

मनात आले की अशी क्षीण प्रकृती असताना आपण गुरुजींना उगाच त्रास दिला.

गुरुजी – "हा विषय महत्त्वाचा आहे. मांडणी चांगल्या रीतीने झाली पाहिजे. समतोलपणा नसेल तर लोक मुळीच लक्ष देणार नाहीत."

मी – "गुरुजी, एक विचारावयाचे आहे. मी त्यात तुमच्या मताहून वेगळे मत मांडले आहे. उत्तर ध्रुव पूर्वी ओरिसात होता हे मत मला बरोबर वाटत नाही. तसे मानले तर लो. टिळकांचे मत बहुतांश खरे मानल्यासारखे होईल. आपल्या प्राचीन ग्रंथातील

पुराव्यांबद्दल अनास्था दाखवावी लागेल. 'प्रथम आर्य लोक उत्तर ध्रुवावरच राहत होते, त्यावेळी इतरत्र आर्यांची वसती नव्हती, आर्य शब्द वंशवाचक आहे;' वगैरे एकांगी निष्कर्ष काढण्यास वाव मिळेल. जगातील भिन्न भिन्न ठिकाणच्या उत्खननातील पुराव्यांतून सर्व जगात आर्यसंस्कृतीचे प्राचीन अवशेष आजही सापडत आहेत. त्यांना बाध येईल असे मला वाटते."

गुरुजी – " अरे, लो. टिळकांच्या म्हणण्याप्रमाणे उत्तर ध्रुव आजच्याच ठिकाणावर असला काय किंवा ओरिसा बिहारात असला काय, फारसा फरक पडक नाही.

महाराजांचा सिद्धांत या दोन्ही मतांपेक्षा व्यापक आहे. आणि निश्चितपणे सत्याला अधिक जवळचा आहे. उत्तर ध्रुवावर आर्य होते तेव्हा साऱ्या जगातही आर्य होतेच. हीच आर्यांची विश्वव्यापक संस्कृती नव्हे काय ?

तसेच आर्य हा वंश आहे ही कल्पना तर पाश्चात्य पंडितांनीही चुकीची ठरविली आहे.

एकूण काय तर महाराजांच्या सिद्धान्ताने उत्तर ध्रुवीय वगैरे मते सपशेल चूक ठरत नाहीत तर एकांगी ठरतात. बरे असो. या विषयावर नवीन संशोधन पुष्कळ झाले आहे. त्यांचाही संदर्भ या प्रकरणात घेता आला तर पहा."

त्यांनी पुस्तकांची नावे आठवण्याचा बराच प्रयत्न केला व शेवटी म्हणाले–

"आता आठवणही दगा देत चालली ...... उद्या परवा तू ये. पुस्तकांची नावे आठवली तर सांगेन. या प्रकरणात तू महाराजांच्या 'समयोपदेश' या पुस्तकातील बरेच उद्धृत केलेले आहे. हा ग्रंथ नवा दिसतो. माझ्या वाचनात आलेला नाही. त्यातील महाराजांच्या विवेचनाचा चांगला अभ्यास करून नवीन पुराव्यांच्या आधाराने हा विषय समर्थपणे मांडला गेला

पाहिजे. "अभयं सत्त्वसंशुद्धिः !!" कोणाचेही भय बाळगण्याचे कारण नाही.

इतिहासाच्या अध्ययनाची दिशा महाराजांनी दाखवून दिली आहे. त्याच्या अनुरोधाने खूप "लिहिता येण्याजोगे" आणि "करता येण्याजोगे" आहे. आमचे तर संपले . . . . . .आता तुम्ही करा ! अतिरेक न करता सत्याची बाजू व्यवस्थित मांडली की लोकांचा विरोध आपोआप कमी होईल. लोकांना फारसे न दुखवता आपले विचार मांडावे. तू हा विषय घेतला आहेस तर आता मागे हटू नकोस."

असे बोलत असता गुरुजींनी माझ्या पाठीवर थाप मारली व म्हणाले,

"डरो मत, आगे बढो !"

माझ्या प्रबंधासंबंधीचे गुरुजींचे हे अखेरचे शब्द ! त्यानंतर मात्र त्यांची प्रकृती अधिकाअधिक खालावतच गेली.

देह असा कर्क रोगाने जर्जर झालेला, पैल तीरावर नजर स्थिर झालेली, पण गुरुजींच्या मुखावरील स्मित कधी मावळलेले दिसले नाही. तीव्र स्मरणशक्ती असलेले गुरुजींचे शतावधानी व्यक्तिमत्त्व कोणीकडे आणि मजसारखा अपरिपक्व बुद्धीचा सामान्य विद्यार्थी कोणीकडे ! मी त्यांच्या पुस्तकावर आक्षेप घेतले पण त्यांना त्याचा राग आला नाही. उलट मी मांडलेले महाराजांचे सनातन सिद्धान्त त्यांनी उचलून धरले. अतिशय प्रेमाने आणि अगदी सहजतेने मला प्रोत्साहित केले. स्वतःकडे कमीपणा घेण्यात त्यांना संकोच वाटला नाही. हा मनाचा मोठेपणा मला जवळून पाहता आला–अनुभवता आला. हे माझं केवढं भाग्य ! "लघुत्वाचेनि मुद्दले, बैसला गुरुत्वाचे सेले" असे उत्तुंग व्यक्तिमत्व पुनः दिसणे नाही आणि पाठीवर थाप पडणे– तेही नाही !

फक्त त्यांचे निरंतर स्फूर्ती देणारे अखेरचे "डरो मत, आगे बढो, –डरो मत आगे बढो" हे शब्द आठवतात आणि पूजनीय गुरुजींची आठवण होते.

कृष्ण माधव घटाटे

मार्च १९७३

समन्वयमहर्षी

दत्तोपंत ठेंगडी
अध्यक्ष, भारतीय मजदूर संघ.
माजी खासदार.

जगाच्या इतिहासात असे आढळते की मानवजातीला उपकृत करणाऱ्या थोर पुरुषांच्या खऱ्या योग्यतेची कल्पना त्यांच्या समकालिनांना येत नाही. त्यांच्या मृत्यूनंतर कालांतराने पुढील पिढ्यांना क्रमाक्रमाने त्यांच्या विचारांची मौलिकता, व्यक्तिमत्त्वाचे उत्तुंगत्व व कर्तृत्वाचे असामान्यत्व यांचा अधिकाधिक परिचय होऊ लागतो. अशा श्रेष्ठ व्यक्तीच्या जीवनकार्याला त्यांच्या जिवंतपणी फळे येणेही अशक्य असते, कारण त्यांचे लक्ष्य दूरगामी असते. त्यांनाही याची जाणीव असते. तरीपण आदर्श-प्रेरीत होऊन अंतिम यशाविषयी दृढ विश्वास असल्यामुळे असे महाभाग आपले संपूर्ण जीवन निष्काम बुद्धीने अखंड परिश्रम करण्यात व्यतीत करतात. आणि ईश्वरी न्यायानुसार प्रारंभी उपेक्षित असलेल्या त्यांच्या जीवनकार्याला त्यांच्या अवतारसमाप्तीनंतर समाजाकडून क्रमशः वाढत्या प्रमाणात मान्यता मिळू लागते. अशा अलौकिक श्रेष्ठ पुरुषांत श्रीगुलाबराव महाराज यांची गणना होते.

श्रीगुलाबरावमहाराजांची अलौकिकता

श्रीज्ञानेश्वर, शंकराचार्य किंवा ख्रिस्त यांच्याप्रमाणे गुलाबराव महाराजांनी आपला जीवनग्रंथ लवकरच आटोपला. वयाच्या केवळ चौतिसाव्या वर्षी त्यांनी महाप्रयाण केले. नऊ महिन्याचे असताना त्यांना

कायमचे अंधत्व प्राप्त झाले. बालपणी घरचे किंवा आसमंतातील वातावरण व्यक्तित्वाच्या विकासाला अनुकूल असे नव्हते. या पार्श्वभूमीवर त्यांच्या अत्युच्च अध्यात्मसाधनेचा व अफाट ज्ञानार्जनाचा विचार केला की, मन आश्चर्याने थक्क होते.

जवळजवळ जन्मांध असलेल्या या गरीब व्यक्तीने पाश्चात्य विज्ञान व विचार प्रवाह तसेच विभिन्न वैदिक अवैदिक मतांचे अचूक, मार्मिक व तौलनिक ज्ञान इतक्या लहान वयात कसे प्राप्त करून घेतले असेल ?

श्री महाराजांनी पाश्चात्यांचेच शब्द वापरून भारतीय नीतीशास्त्र कसे मांडता येते हे दाखवून दिले व युरोपीय आणि भारतीय नीतितत्वांची तुलना करून भारतीय नीतीतत्वांचे श्रेष्ठत्व सिध्द केले.

शूद्रवर्ण मूळ ब्राह्मणापैकीच होता–आर्य बाहेरून आले नाहीत–ते भारताचेच मूळ निवासी होते–आर्य शब्द वंशवाचक नसून गुणवाचक आहे व पूर्वी सर्व विश्वात एकच वैदिक–आर्यसंस्कृती नांदत होती, हे त्यांनी आव्हानपूर्वक सिद्ध केले.

परक्यांचे अंधानुकरण न करता व राष्ट्राच्या मूलभूत श्रद्धांना धक्का न लावता हिंदूंनी समाजसुधारणा कशी करावी, ह्याविषयी त्यांनी कालोचित मार्गदर्शन केले.

आर्यभौतिकशास्त्रांच्या खंडित परंपरेचे पुनरुज्जीवन कोणत्या प्रकारे करावे हे त्यांनी विशद केले, व आधुनिक बुद्धिवाद्यांना आश्वासन दिले की, आपली कल्पना जरी सध्या बाल्यदशेत आहे तरी टिटवीप्रमाणे प्रयत्न केल्यास अशक्य काहीच नाही. या सर्वांना वैशेषिक शास्त्राची जोड दिली म्हणजे खरोखरीच मोठे आणि पाश्चात्य भौतिक विज्ञानाला सर्वथा मूळस्वरूप असलेले स्वयंपूर्ण आर्यभौतिकशास्त्र तयार होईल. आणि ते आर्यभौतिकशास्त्र नास्तिक मत खंडन करणारे व ईश्वराचे अधिष्ठान असलेले आस्तिक भौतिकशास्त्र राहील.

समन्वय सिद्धान्त

पाश्चात्य तत्त्वज्ञानातील उत्क्रांतिवाद, अणुवाद, संशयवाद आदी सिद्धांत आणि धार्मिक क्षेत्रातील निरनिराळी वैदिक मते, तसेच जैन, बौद्ध, पारसिक, महंमदीय, ख्रिश्चन आदि मते या सर्वांविषयी त्यांनी अधिकारवाणीने नवीन व मूलगामी विचार प्रकट केले व समकालीन पाश्चात्य विद्वानांच्या प्रमेयांचे समर्थपणे खंडन केले. सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा, या सहाही दर्शनांवर भरपूर लिखाण करून त्या प्रत्येकांत त्यांनी मौलिक भर टाकली. सांख्य, योग, वेदान्त आणि भक्ती ही सर्व एकमेकांना पूरक आहेत, त्यांत जो विरोध वाटतो तो पातळीचा विरोध आहे–अंतर्गत विरोध नाही, हा अभिनव व समन्वयात्मक सिद्धांत त्यांनीच प्रथम प्रतिपादन केला.

तसेच पूर्वमीमांसेतील अनीश्वरवादाचे खंडन, वेदांच्या नित्यतेसंबंधी मतांचे आंशिक निराकरण आणि मंत्ररूप देवतावादाचे निरसन करून त्यांनी उत्तरमीमांसेप्रमाणे ईश्वरत्वसिद्धी, देवतांचे विग्रहस्वरूप आणि वेदांची ईश्वराकडून उत्पत्ती वगैरे सप्रमाण सिद्ध केली. तसेच यज्ञीय हिंसेचे तात्पर्य अहिंसेत आहे, हे विषद केले. "अनध्यस्त विवर्त या नवीन शब्दाची निर्मिती करून त्याच्या साहाय्याने शंकराचार्यांच्या अद्वैत सिद्धांतावर भक्तिशास्त्राची मांडणी त्यांनी केली." सगुण–निर्गुण, साकार–निराकार यांतील भेद समाप्त केला. उपासना व भक्तीतील फरक नव्यानेच स्पष्ट केला व भक्तिशास्त्रात नवीन मोलाची भर टाकली. विभिन्न वैदिक संप्रदायात त्यांनी समन्वय स्थापन केला.

वैदिक मतांबरोबर बौद्ध व जैन मतांचा मूळ हिंदू धर्माशी असलेला समन्वय त्यांनी स्पष्ट केला.

ख्रिश्चन मत, बौद्धमत व भागवत धर्म यांचा परस्परसंबंध उलगडून दाखविला व ख्रिस्तधर्म आर्ष ऋषींनीच प्रवर्तित केलेला धर्म आहे, अशी ग्वाही दिली.

राजकीय द्वेषामुळे व व्यावहारिक दुर्गुणांमुळे हिंदू–मुसलमानांच्या लढाया झाल्यात. परंतु धार्मिक द्वेष हिंदू–मुसलमानांत कधीच राहू शकत नाही असे त्यांनी घोषित केले. ते म्हणतात—

"आम्ही त्यांच्या धर्मात ढवळाढवळ करीत नाही म्हणून त्यांनी आमच्या धर्मात हात घालू नये, असे हिंदूना वाटते. हिंदूच्या धर्मात ढवळाढवळ केली तरी हिंदूनी उगे रहावे, म्हणजे हिंदुत्व नाहीसे करावे की काय ?" हिंदू–मुसलमानांच्या धर्मतत्त्वातील साम्यस्थळे दाखवून ते म्हणतात, " मुसलमान धर्म उत्पन्न होण्यापूर्वी अरबस्थान, अफगाणिस्थान वगैरे देशांत पूर्वी आर्य धर्मच होता, पण धार्मिक आचारक्रिया सुटल्यामुळे परमेश्वराने पतित लोकांना पुन: परमार्थमार्गावर आणण्यासाठी मुसलमानी धर्म उत्पन्न केला, असे इतिहासावरून आणि आपल्या पुराणांवरून अनुमान करता येत असल्यामुळे व्यापक अशा हिंदू धर्माशी या मुसलमान धर्माचा सहज समन्वय होतो."

श्रीगुलाबराव महाराजांच्या या विलक्षण समन्वय–क्षमतेमुळे त्यांचा "समन्वय महर्षी" या उपाधीने गौरव करणे उचित ठरेल. सद्य:कालीन राजकारणाची धुळवड शांत झाल्यानंतर त्यांच्या या गुणांचा राष्ट्रनिर्मितीच्या कार्याला मोठा उपयोग होणार आहे, यांत शंका नाही.

समतोल प्रतिपादन

भारतीय व पाश्चात्य राष्ट्रकल्पनेविषयी ते लिहितात, "आर्य धर्मातील राष्ट्रकल्पना जगांतील सर्व देशापेक्षा वरचढ आहे हे म्हणणे अभिमानाचे नाही तर नि:पक्षपातीपणाचे आहे. आपल्याकडे जित देशांतील चांगल्या व्यक्तीला होमरूल देण्याची पद्धत होती तर पाश्चात्यांची होमकुंडात घालण्याची पद्धत होती आणि अजूनही आहे."

त्यांच्या प्रतिपादनांतील समतोलपणा वाखाणण्यासारखा आहे. मनुष्यामनुष्यातील जन्माधारित उच्चनीचतेचा निषेध करूनही प्राचीन वर्णाश्रम व्यवस्थेचे शास्त्रीय स्वरूप त्यांनी सिद्ध केले. धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या

बुवाबाजीवर कठोर हल्ला करूनही त्यांनी गुरूवरील श्रद्धेला बळकटी आणली. प्रत्येक मत–संप्रदायातील तर्कविसंगत भागांवर कडक टीका करूनही कुणाचाही बुद्धिभेद किंवा श्रद्धाभंग होणार नाही याची कुशलतेने काळजी घेतली.

आपले जीवनकार्य पार पाडण्याच्या प्रयत्नात या अशिक्षित अंध संत-पुरुषाने मराठी, हिंदी व संस्कृत या भाषांत सव्वाशेच्यावर गद्य–पद्यात्मक ग्रंथांची रचना केली. या साहित्यात संगीत, व्याकरण, काव्य, मानसशास्त्र, मानसायुर्वेद आदी विविध विषयांचाही त्यांनी आपल्या मौलिक पद्धतीने परामर्श घेतला आहे. नवीन नावंग भाषेची निर्मिती केली आहे. लघु-लिपीची (सांकेतिक लिपीची) निर्मिती केली आहे. १२३ नवीन मात्रा-वृत्तांची योजना केली आहे. वऱ्हाडी व व्रजभाषेचा उपयोग केला आहे. वाङ्मयात लोकगीतांची निर्मिती केली आहे. आणि कौटुंबिक समस्या व शिक्षण-विषयक प्रश्नांवर प्रकाश टाकला आहे. त्यांच्या साहित्यसंपदेत २५०० अभंग, २५०० पदे, १२५० गीते, १००० श्लोक व २३००० ओव्या, यांचा समावेश होतो. एकूण पृष्ठसंख्या ६००० आहे. हे सर्व ध्यानात घेतल्यास साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकरांच्या पुढील विधानाची सत्यता पटते. " महाराजांचे ग्रंथ म्हणजे एक मोठा ज्ञानकोश झाला आहे."

असाधारण अधिकार

परंतु विद्वानांनाही स्तिमित करून सोडणारी विद्वत्ता हे श्री गुलाबराव महाराजांचे प्रमुख वैशिष्टय नव्हते. त्यांच्या श्रेष्ठत्वाचा स्थायी व भक्कम आधार होता आध्यात्मिक क्षेत्रातील त्यांचा असाधारण अधिकार ! मुकुंदराज ज्ञानेश्वरांपासून रामदास–तुकारामांपर्यंत महाराष्ट्रात अखंड चालत आलेल्या संतपरंपरेचे त्यानंतर जवळजवळ २५० वर्षांनंतर श्रीगुलाबराव महाराजांच्या रूपाने पुनरुज्जीवन झाले, असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती होणार नाही. गीतेत म्हटले आहे की,–

शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ।

विदर्भातील माधानचे पाटील श्री. गोंदूजी मोहोड व त्यांची धर्म-

परायण पत्नी अलोकाबाई यांचे घराला वरील वर्णन निश्चितपणे लागू पडते. स्वतःच्या आजोळी अमरावती जवळील लोणी टाकळी या गावी शके १८०३ मधील आषाढ शुद्ध दशमीला (इ. स. १८८१) महाराजांनी सौ. अलकाबाईच्या पोटी जन्म घेतला. जन्मतःच त्यांचा ओढा पारमार्थिक गोष्टीकडे होता. अवघ्या नवव्या महिन्यात झालेल्या दृष्टिनाशामुळे, किंवा वयाच्या चवथ्या वर्षी झालेल्या मातृवियोगामुळे, अथवा बाराव्या वर्षी झालेल्या विवाहामुळेही त्यांच्या या मूळ प्रवृत्तीत यत्किंचितही विचलितता आली नाही. ईश्वरभक्तीचे वेड जन्मजात असल्यामुळे बाल्यावस्थेपासून आपल्या तीव्र स्मरणशक्तीचा व धारणाशक्तीचा उपयोग त्यांनी शास्त्राध्ययन व अध्यात्मचिंतनाकरता केला. तर्काधिष्ठित बुद्धिवाद व सूक्ष्म कोमल भावनोत्कटता यांचा मधूर व अभूतपूर्व संगम त्यांचे ठायी असल्याचा प्रत्यय त्या वयातही निकटस्थांना येत असे. संसारसुखाविषयी पूर्ण विरक्ती व ईप्सितसिद्धिसाठी वाटेल ते परिश्रम घेण्याची सिद्धता या गुणांचाही परिचय या काळापासून होऊ लागला होता. पूर्वसुकृत व वर्तमान साधना यांच्या संयोगामुळे १६ वे वर्ष लागण्यापूर्वीच समाधिस्थितीपर्यंत त्यांची प्रगती झाली होती. अध्ययन करण्याकरिता त्यांना विलक्षण कष्ट घ्यावे लागत. दुर्मिळ पुस्तकांचा मागोवा घेणे व इतरांकडून ती वाचून घेणे हे किती जिकिरीचे काम ! प्रारंभिक काळात ज्ञानाच्या साधनांच्या शोधात त्यांना सहकुटुंब गावोगावी फिरावे लागले व पुढील काळात स्वमत प्रतिपादनाकरिता हे भ्रमण त्यांना आणखी वाढवावे लागले. इ. स. १९०१ मध्ये श्रीज्ञानेश्वर महाराजांनी त्यांना आपल्या स्वनामाचा मंत्र दिला. यानंतर त्यांना ऊहबुध्दिसिद्धीची स्फूर्ती प्राप्त झाली. इ. स. १९०२ साली त्यांनी शुक्लेश्वर वाठोडा येथे भागवतातील दशमस्कंधात सांगितलेल्या कात्यायनी देवीच्या मंत्राची दीक्षा घेतली व माधुर्यभक्तीला अनुकूल कात्यायनी महोत्सव सुरू केला.

नवा संप्रदाय

इ. स. १९०८ मध्ये त्यांनी शिवदीक्षा घेऊन पार्थिव पूजेस प्रारंभ

केला व इतरांनाही नित्य पार्थिव पूजेचा नियम घालून दिला. यानंतरचा उर्वरित काळ भजन, पूजन, प्रवचन, ग्रंथरचना, स्वमतप्रचार यातच त्यांनी घालविला व इ. स. १९१५, च्या भाद्रपद शुद्ध दशमीला २० सप्टेंबर १९१५ या दिवशी सूर्योदयाच्या मंगल समयी त्यांनी ब्रह्मस्थानी प्रस्थान केले.

या अल्पकालावधीत त्यांनी स्वत: आध्यात्मिक क्षेत्रातील अत्युच्चपद प्राप्त करून घेतलेच, परंतु त्याचबरोबर हजारो लोकांना या क्षेत्रात मार्गदर्शन केले. शेकडो लोकांना स्वत: दीक्षा दिली. सर्व मतसंप्रदायांच्या अनुयायांची त्यांच्या त्यांच्या मतांविषयी श्रद्धा बळकट केली, प्रत्येक मताला तर्कांच्या कसोटीवर घासून त्यांतील ग्राह्याग्राह्य भागाचा निवाडा केला–कुणाचाही किंचितही श्रद्धाभंग होऊ न देता–सर्व संप्रदायाचे महत्व स्वीकार करूनही त्यांनी शांकराद्वैत व वेदापासून चालत आलेल्या माधुर्य भक्तीचा अधिकार आत्मज्ञानसंपन्न व्यक्तीसाठीच मर्यादित करून संप्रदातील संभाव्य विकृतींना मुळातच आळा घातला. स्वत: विधिपूर्वक संप्रदायाच्या व्रतनियमांचे पालन करून इतरांना तसे करण्याची प्रेरणा दिली व संप्रदायाला आधारभूत अशी ग्रंथसंपत्ती निर्माण करून त्याचा भक्कम पाया घातला.

श्री ज्ञानेश्वरमधुराद्वैत संप्रदाय ही महाराजांनी समाजाला दिलेली मोलाची देणगी आहे, व ही देणगी सर्व–संप्रदाय–समन्वयाच्या अधिकारी द्रष्टयाने दिलेली आहे हे विशेष !

उण्यापुऱ्या तीन दशकांचे हे कार्यकारी जीवन कितीतरी लोकोत्तर उपलब्धींनी भरलेले आहे. त्याच्या सर्व पैलूंचे समग्र दर्शन घडविणे इथे शक्य नाही व ते अभिप्रेतही नाही. इतके मात्र खरे की, या जीवनाच्या सखोल अध्ययनाने राष्ट्र–धर्म–संस्कृतीच्या अभिमान्यांना एक नवीन प्रेरणा प्राप्त होऊ शकेल.

• • •



श्रीगुलाबरावमहाराज

प्रश्न:– सर्व धर्म समान आहेत तर आपल्याच धर्मात कां रहावे ?

उत्तर:– सर्व धर्म समान आहेत तर आपल्याच धर्मास कां सोडावे !

• • • विश्वव्यापिनी संस्कृती

प्राचीन काळी भारतात वाणि भारताबाहेर सर्व जगात एकच विश्वव्यापिनी संस्कृती होती– ती म्हणजे वैदिक आर्य संस्कृती ! परंतु प्रचंड संहारकारी काळाच्या ओघामध्ये सुसंस्कृत समाज असंस्कृत होतात, असंस्कृत समाज प्रगती करतात, नगरांचे ठिकाणी जंगले होतात आणि जंगलांचे ठिकाणी नागरी वसाहती येतात. असे हे कालचक्र सतत चालू आहे आणि चालूच राहणार ! आज सर्व जगात होत असलेल्या उत्खननात प्राचीन संस्कृतीचे अवशेष सापडले आहेत. आणि त्या सर्वांचा प्राचीन वैदिक संस्कृतीशी अगदी जवळचा संबंध आहे. इतकेच नव्हे तर ते सारे एका वैदिक संस्कृतीचेच अवशेष आहेत असे म्हणण्याची पाळी संशोधकांवर आली आहे. पण आपण भारतीय लोक न्यूनगंडाने ग्रासलेले आहोत म्हणून ते संशोधन मोकळ्या मनाने सत्य म्हणून स्वीकारण्यास आपण अजूनही तयार नाही.

आपल्या प्राचीन भारतीय इतिहासाच्या बाबतीत ख्रिस्ती मिशनरी आणि ब्रिटिश राज्यकर्ते यांनी मिळून आपल्या पूर्वजांचा इतिहास विकृत करून शिकविला. आणि त्याचे फलित म्हणून मॅक्समूलरने निर्माण केलेली कपोलकल्पित "आर्यवंश" ही संज्ञा आपण ग्राह्य ठरविली. आणि त्याला अनुसरून आर्य-

वंशाचे लोक आक्रमक म्हणून भारतात आले– भारतातील मूळ आदिवासींचा त्यांनी संहार केला– त्यांना गुलाम केले– शूद्र म्हणून सेवा करण्यास राबविले – असे इतिहासदृष्टीने पूर्णपणे चूक असलेली मते सिद्धान्त म्हणून प्राथमिक शाळेपासून एम. ए. पर्यंत इतिहासात शिकविली जातात. त्यामुळे आर्य–अनार्य, उत्तर–दक्षिण, आर्य–द्रविड, ब्राह्मण–ब्राह्मणेतर, उच्चवर्णी–पददलित, आक्रमक–आदिवासी वगैरे फूट पाडणारे भयानक वाद भारतीय समाजात निर्माण होऊन आज अनर्थ होऊ पाहत आहे. हा अनर्थ टाळण्यासाठी–त्याची तीव्रता कमी करण्यासाठी सत्य इतिहासाची कास धरून नीरक्षीर विवेक करण्याची गरज आहे.

वस्तुत: पाहिले तर सर्व जगातील विखुरलेले प्राचीन युगातील अवशेष एका वैदिक संस्कृतीचेच आहेत, हे सर्वांनाच मान्य होऊ लागले आहे. परंतु त्यावरून निष्कर्ष काढताना मात्र आपापल्या भावना आणि गृहीत मते यांच्या प्रभावाखाली येऊन वेगवेगळी मते मांडल्या गेलीत. युरोपियन पंडितांनी युरोपातील काही प्रदेश आर्यांचे मूळ स्थान मानले. रशियन पंडितांनी कास्पियन समुद्राजवळील गवताळ प्रदेश हा आर्यांचे मूळ वसतिस्थान ठरविले. मॅक्समूलरने पामीरचे पठार हेच मूळ गृहीत धरले आणि लोकमान्य टिळकांनी उत्तर ध्रुवावरील भौगोलिक व खगोल संदर्भांच्या वैदिक उल्लेखांमुळे उत्तर ध्रुवाला आर्यांचे मूळ स्थान मानले. आणि जगात इतरत्र जसे जसे अवशेष मिळत गेले तसे तसे आर्यांचे भारतात येण्याचे मार्ग कल्पिले गेले. याला उत्तर पक्ष म्हणून देशभक्तांनी भारतातून आर्य

बाहेर गेलेत असे मांडले त्या मार्गांचे टप्पे म्हणून त्या प्राचीन अवशेषांवर भिस्त ठेवली. परंतु १- भारतातून आर्य बाहेर जाणे आणि २- बाहेरून आर्यांनी भारतात येणे ही दोन्ही मते बरोबर नसून एकांगी आहेत. आर्यांच्या विश्वव्यापक संस्कृतीचा व्यापक सिद्धान्त सत्याला धरून आहे. आणि तो सिद्धान्त श्री गुलाबराव महाराजांनी मांडला. त्यावरून एक गोष्ट आठवते--

काही आंधळ्यांना एक हत्ती सापडला. एकाने सोंड धरली व हत्ती सापासारखा असतो हे सांगितले. दुसऱ्या आंधळ्याने पायाला चाचपडून पाहिले व हत्ती खांबासारखा असतो असे ठरविले. तिसऱ्याने हत्तीच्या पोटाला स्पर्श करून तो भिंतीसारखा असतो असे विधान केले. कानाला हात लावून चवथ्याने हत्तीला सुपासारखे ठरविले. याप्रमाणे प्रत्येक आंधळा हत्तीचे वर्णन करू लागला. आणि शेवटी ते सर्व मिळून परस्पर भांडू लागले. त्यांचे भांडण पाहून एक डोळस माणूस आला व त्याने सर्वांना शांत केले. तो म्हणाला– तुमचे प्रत्येकाचे म्हणणे अगदी बरोबर आहे परंतु एकांगी आहे. हत्तीची सोंड सापासारखी आहे, पाय खांबासारखे आहे हे सारे खरेच आहे परंतु हे सर्व वर्णन पूर्ण हत्तीचे नसून एकेका अवयवाचे आहे. सर्व अवयव मिळून हत्तीचे पूर्ण वर्णन होईल."

या उदाहरणाप्रमाणे आर्य युरोपात होते, उत्तर धृवावर होते, रशियात होते, अमेरिकेत होते, चीन जपानमध्ये होते, सैबेरियात होते. आस्ट्रेलियातही होते. परंतु त्याचवेळी भारतात मात्र नव्हते हे म्हणणे मात्र बरोबर नाही. सर्व जगात आर्य-

संस्कृती पसरली होती त्याचवेळी भारतातही तीच संस्कृती होती. हा झाला विश्वव्यापक आर्यसंस्कृतीचा सिद्धांत. आणि तो दाखवून दिला आहे समन्वयमहर्षी श्री गुलाबरावमहाराज यांनी ! चर्मचक्षू असलेल्या पंडितांनी एकांगी मते मांडली आणि चर्मचक्षू नसलेल्या प्रज्ञाचक्षूने विश्वव्यापक आर्यसंस्कृतीचा सत्य ऐतिहासिक सिद्धांत महाभारत पुराणे व स्मृती यांच्या आधाराने सिद्ध केला. आणि त्या सिद्धान्ताला पोषक अशी उत्खनने व पुरावे आजतागायत उपलब्ध झाले आणि आजही नव्याने उपलब्ध होत आहेत. या विश्वव्यापक सिद्धान्तानुसार पाहिले असता—

१) आर्य हा वंश नाही.
२) शूद्रवर्ण आर्यांचाच एक भाग आहे.
३) आर्यवंश भारताबाहेरून भारतात आलेला नाही.
४) भारतातून आर्यवंशाचे लोक बाहेर गेले, असेही नाही.
५) आर्यांची वैदिक संस्कृती सर्व विश्वात प्राचीन काळी पसरली होती. (३००० वर्षापूर्वी)

ह्या महत्वाच्या पांच गोष्टी सिद्ध होतात. डॉ. आंबेडकरांनी सुद्धा पहिले तीन मुद्दे "शूद्र पूर्वी कोण होते ?" या पुस्तकात उत्तम रीतीने सिद्ध केलेले आहेत. हेही अतिशय महत्वाचे आहे. वैदिक ऋषींनी आम्ही सर्व जगाला सुसंस्कृत करू—कृण्वंन्तो विश्वमार्यम्। ही वैदिक प्रतिज्ञा पूर्ण केली होती. हे वैदिक ऋषी एका भारताचेच रहिवाशी नसून सर्व जगात होते. कश्यपऋषी कास्पियन समुद्राजवळील त्यांच्या आश्रमात होते. वसिष्ठ आसामात होते. पाणिनी काश्मिरात होते. अगस्ति दक्षिण

भारतात होते. शुक्राचार्य बलिराजाच्या इजिप्त वगैरेत पसर-लेल्या साम्राज्यात होते. याप्रमाणे सर्व जगात वैदिक ऋषी आर्य-संस्कृती सर्व मानवांना शिकवित होते. परंतु पुढे संस्कारलोप झाल्यामुळे सर्व जगातली आर्यसंस्कृती लोप पावत गेली आणि शेवटी आज केवळ भारतात संकोचित होऊन राहिली आहे. आणि ती सुद्धा अधोगतीस जात आहे. त्यागप्रधान आर्यसंस्कृती लोप पावून भोगप्रधान आसूरी संस्कृतीचा झपाट्याने विकास होत आहे. याला पायबंध घालण्यासाठी सर्व सत्प्रवृत्त संघटनांनी संस्थांनी आणि व्यक्तींनी सामुहिक आणि व्यक्तिगत प्रयत्न कर-ण्याची आवश्यकता आहे. व्यक्तिगत प्रयत्नांनी स्वत:ची उन्नती करावी आणि सामूहिक प्रयत्नांनी समाजाची उन्नती करावी. भोगाकडून त्यागाकडे–स्वहिताकडून परहिताकडे–आणि शेवटी नराचा नारायण होण्यासाठी पुनः एकदा वैदिक ऋषींच्या प्रतिज्ञेची आठवण ठेवून प्रतिज्ञा परिपूर्तीसाठी कटिबद्ध होण्याची आज गरज आहे.

“ कृण्वन्तो विश्वमार्यम् । ”

कोणत्याही समाजाला पारतंत्र्य हा फार मोठा शाप आहे. दुर्दैवाने आपल्या भारतावर एक हजार वर्षापासून गुलामगिरीचे सावट पसरले होते. पैकी मुसलमानी आक्रमणाने राजकीय हानी झाली आणि भारतीय समाजाची उदार आणि व्यापक मनोवृत्ति संकोचित झाली परंतु नंतरच्या इंग्रजी गुलामगिरीने मात्र भारतीयांच्या अस्मितेलाच जबर हादरा बसला. त्यामुळे

तत्त्वज्ञान–गणित-विज्ञान–काव्य–आयुर्वेद–साहित्य–कला–क्रीडा वगैरे सर्व क्षेत्रात आपण पराभूत आहोत आणि जेते इंग्रज सर्व श्रेष्ठ आहेत असा समज निर्माण झाला. त्याचबरोबर भारतीय मनावरील प्राचीन श्रेष्ठत्वाचे सर्व संस्कार पुसून टाकण्यास पाश्चात्य शिक्षणपद्धतीचा ख्रिस्ती मिशनऱ्यानी शस्त्र म्हणून वापर केला. त्यात प्राचीन इतिहास, प्राचीन संस्कृती व धर्म हीन आणि टाकाऊ असून युरोपियन विज्ञानवाद हाच सर्व श्रेष्ठ आहे अशा शिक्षणाचे बाळकडू आपणा सर्वांना प्राप्त झाले. यातून सुटण्यासाठी प्रथम आपल्या पूर्वजांचा इतिहासविषयक दृष्टिकोण समजून घेऊन प्राचीन आर्य संस्कृतीचे श्रेष्ठत्व–विश्वव्यापकत्व आणि भारतीयांचे जगद्गुरुत्व समजून घेणे महत्त्वाचे आहे. या ठिकाणी आपल्याला केवळ पूर्वजांची स्तुती करावयाची नसून त्यापासून स्फूर्ती घ्यावयाची आहे आणि त्या स्फूर्तीतून सुशिक्षित–सुसंस्कार संपन्न–इतर जगापेक्षा सर्व दृष्टीने प्रगत आणि एकात्म असे भारताचे मानचित्र नव्याने रंगवावयाचे आहे. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि आसामपासून सोमनाथापर्यंत भारतीय संस्कृतीच्या निरनिराळ्या रंगछटांनी एकात्म भारताचे ते उज्वल मानचित्र शोभायमान झाले पाहिजे, याच एका हेतूने विश्वव्यापी आर्य संस्कृतीचे विहंगम आलोडन करणे अगत्याचे आहे. त्यासाठी प्रथम प्राचीन आर्यांची इतिहासदृष्टी समजून घेण्याचा थोडक्यात प्रयत्न करू. हा विषय प्रचंड आहे आणि त्यासाठी सर्वांनीच सामूहिक प्रयत्न करणे जरूर आहे. तसे केल्यानंतरच आपले ईप्सित साध्य होण्याजोगे आहे.

हिंदूंची इतिहास दृष्टी

आर्यांचा इतिहासविषयक दृष्टिकोण हाच श्रीगुलाबराव महाराजांचा दृष्टिकोण आहे व तो पाश्चात्यांपेक्षा वेगळा आहे. पाश्चात्यांना वाटते की प्रत्येक ऐतिहासिक घटना सांगोपांग जशीच्या तशी लिहिली गेली पाहिजे. ऐतिहासिक व्यक्तींनी ज्या बऱ्यावाईट गोष्टी केल्या त्या सर्व तपशीलवार पुढील पिढीला माहित झाल्या पाहिजेत. हा विचार काही अंशी बरोबर आहे. तरी देखील ज्यांचा इतिहास २–३ हजार वर्षांचाच आहे, त्यांना अशा नोंदीचा अभ्यास करणे थोडे फार शक्य देखील आहे. परंतु ज्या राष्ट्रांचा इतिहास हजारो वर्षांचा आहे त्यांच्या इतिहासाचा असा सांगोपांग अभ्यास करणे अशक्यप्राय आहे. दुसरे असे की युरोपातील लढायांचा व अत्याचारांचा क्रूर इतिहास, व्यभिचारी राण्या व राजांचा इतिहास; मुलाने बापाला, भावाने भावाला मारून राज्य बळकावल्याचा यावनी इतिहास; अशा प्रकारच्या खऱ्या पण अनैतिक इतिहासाचा अभ्यास करून उपयोग काय? याचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. महाराजांनी शिक्षणाची व्याख्या 'सुसंस्कारांचे दान म्हणजे शिक्षण'' अशी केली आहे. त्या दृष्टीने पाहिले असता या अनैतिक इतिहासाचे यथासांग व तपशीलवार ज्ञान करून घेतल्याने नवीन पिढीवर काय चांगले संस्कार होणार आहेत? उदा– समजा आईकडून तारुण्यात चुकीमुळे व्यभिचार घडला तर ते ज्ञान करून घेतल्याने मुलगा काय सुसंस्कारसंपन्न होणार आहे? अशा वाईट

गोष्टी विसरून जाणे हेच व्यक्तिगत आणि सामाजिक दृष्टीने हिताचे असते. म्हणूनच आर्यांच्या रामायण महाभारतादि इतिहासात व पुराणादिकात धर्माचरण करणाऱ्या पुरुषांचा विजय आणि अधर्मी लोकांचा अध:पात आणि शेवटी नाश; हेच प्रामुख्याने लिहून ठेवण्यात आले आहेत.

"शेवटी सत्याचा विजय होतो" म्हणून प्रत्येकाने कितीही कष्ट पडले तरी सत्याची कास सोडता कामा नये या शिकवणीसाठी इतिहासाचा अभ्यास हिंदू करीत असतात व तसे संस्कार नवीन पिढीवर व्हावे, हीच हिंदूंच्या इतिहास लेखनाची संकेतरेखा आहे.

> अधर्मेण एधते तावत्, ततो भद्राणि पश्यति ।
> सपत्नान् जयति, समूलं च विनश्यति ।।

हे सूत्र आर्यांच्या इतिहास लेखनात आढळते. चांगल्या इतिहासाच्या अभ्यासामुळे सुसंस्कार होऊन, समाजाचे स्थैर्य आणि मन:शांती कायम राहून भारतीय संस्कृतीला अभिप्रेत असलेली ऐहिक, नैतिक आणि शेवटी परमोच्च आध्यात्मिक प्रगती व्हावी यासाठी अशा इतिहासलेखनाला पंचम वेद मानले गेले आहे.

आय विट्नेसच्या मर्यादा

वरे, "केवळ इतिहासासाठी इतिहास" हाही पक्ष गृहीत धरला तरी खरा इतिहास लिहिला जाऊ शकतो काय? याचाही विचार होणे आवश्यक आहे. पण तसे मुळीच आढळत

नाही. उदा.– एकच घटना चार लोकांनी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिली तरी ते चारजण चार प्रकारची उलटसुलट माहिती "आय विट्नेस" म्हणून न्यायालयात साक्ष देतात. त्यापैकी एकच खरा असू शकतो व बाकीचे खोटे असतात, पण असे असूनही न्यायाधीश इतरांना खोटी साक्ष दिल्याबद्दल शिक्षा करीत नाही. कारण प्रत्यक्ष प्रसंग पहात असताना देखील स्वतःच्या मनोभूमिकेचा परिणाम होऊन नंतर त्या प्रसंगाचे ज्ञान प्रत्येकाला होत असते. म्हणूनच प्रत्येकाच्या ज्ञानात सत्य आणि असत्याचे मिश्रण असते. त्यामुळेच मित्रांनी लिहिलेला इतिहास व शत्रूंनी लिहिलेला इतिहास यात जमीन–अस्मानचा फरक आढळतो. त्यावर विश्वास ठेवल्याने अगदी खरा इतिहास कधीही कळू शकत नाही. परंतु त्यातही "शत्रूंनी केलेली स्तुति व मित्रांनी केलेली निंदा, या मात्र सत्य परिस्थितीच्या निदर्शक असतात," असे महाराजांनी इतिहासविषयक प्रश्नाचे उत्तर देताना साधुबोध या ग्रंथात मार्मिकपणे सांगितले आहे व ते खरे आहे.

याच कारणामुळे इतिहास लिहिण्याचे कार्य आर्यसंस्कृतीत सर्वज्ञ आणि निस्पृह अशा महात्म्यांकडे सोपविण्यात आले आहे. हिंदू लोक व्यासादिकांनी लिहिलेल्या रामायण, महाभारत व पुराणे यांच्यावर विश्वास ठेवीत. त्यांनाच इतिहास म्हणून मान्यता देत. त्यामध्ये विश्वव्यापी आर्यसंस्कृतीचा हजारो वर्षांचा इतिहास अतिशय रंजक आणि उद्‌बोधक करून सांगितला गेला आहे. त्यात शेकडो राजांची केवळ नामावली आली आहे. त्यांचा तपशीलवार इतिहास जपून ठेवणे आणि

या प्रचंड कालौघात क्रूर संहारक नरपशूंच्या यावनी आक्रमक विध्वंसातून इतिहास ग्रंथांना वाचविणे आपल्या पूर्वजांना अशक्य झाले. आणि जरी नालंदा, तक्षशीला वगैरे सारख्या अनेक विश्वविद्यापीठातून त्यांचे रक्षण झाले असते तरी देखील त्या सर्वांचा सांगोपांग अभ्यास करणे अशक्यच होते.

आपल्या संस्कृतीत निस्पृह, सद्‌गुणसंपन्न आणि महात्मे यांनी लिहिलेल्या इतिहासाचा पुराणे म्हणून अभ्यास केला जाई. अवतारांची कृत्ये गायिली जात आणि शेवटी धर्म, नीती व ज्ञानभक्तीचे वर्धन करून प्रत्येक मनुष्याला परमार्थाच्या प्रवासाला उद्युक्त केले जाई. याप्रमाणे इतिहासाचा उपयोग देखील मानवाच्या सर्वंकष उन्नतीसाठीच केला जावा अशी भारतीय संस्कृतीची भूमिका महाराजांनी मांडली आहे. श्री गुलाबराव महाराजांच्या साधुबोध ग्रंथातील आर्यविषयक आणि इतिहासविषयक प्रश्नोत्तरे, समयोपदेशातील प्रवचने व संप्रदायसुरतरूतील काही प्रकरणात हा भाग विस्तारपूर्वक आलेला आहे, त्यावरून महाराजांची इतिहासविषयक दृष्टी किती मूलगामी होती, हे दिसून येईल. इतिहास शिकविण्याचे प्रयोजन काय, इतिहास कोणी लिहावा व कसा लिहावा, या मूलभूत बाबींवरील महाराजांचे विचार अगदी स्पष्ट आणि परखड आहेत. त्यांचे दोन सिद्धान्त असे.

१ इतिहास स्वोत्कर्षवर्धक असावा. २ विश्वव्यापी आर्यसंस्कृती.

या दोन सिद्धांतांच्या अनुषंगाने आपण प्राचीन आर्यांची इतिहासविषयक दृष्टी आणि आधुनिक इतिहास–लेखन-पद्धतींचा थोडक्यात परामर्श घेणे जरूर आहे.

ऐतिहासिक विकासवाद

प्रत्येक गोष्ट ऐतिहासिक दृष्टीने पाहण्याची प्रवृत्ती महाराजांना मान्य नाही. ते म्हणतात. की ही सवय पाश्चात्य उत्क्रांतिवादाने लागली आहे. उत्क्रांतिवाद मान्य केला की जुने ते सर्व वाईट, असाच अभिप्राय निघतो. पण असे जर ठरले तर आपला एखाद्यावरील फार दिवसांचा स्नेह कुचकामाचा ठरणार. नवीन रोग उत्पन्न झाले तर ते सुधारलेले व जुनी निरोगी स्थिती वाईट ठरेल. नदीच्या उजळ पाण्यापेक्षा पुराने ओंगळ झालेले पाणीच पिण्याला चांगले समजावे लागेल. अशी उदाहरणे देऊन महाराज म्हणतात–

"ज्या गोष्टी नित्य आहेत अशा गोष्टींविषयी जुना इतिहासच खरा आहे आणि ज्या गोष्टी बदलणाऱ्या आहेत त्याविषयी पाहिजे असल्यास नवेपणाची घमेंड मारावी."

ऐतिहासिक विकासवाद त्यांना मुळीच मान्य नाही. तसे मानल्यास,

"नेहमी विसदृश गोष्टीच घडत गेल्या पाहिजेत. जर सारख्या गोष्टी घडतील तर मागची घटना कोणती व त्यानंतरची घटना कोणती, याचा ऐतिहासिक कालनिर्णयच होणार नाही." (उत्क्रांतिवादानुसार समजणार नाही.) कारण विश्वाचा प्रवाह सदृश आणि विसदृश घटकांनी बनलेला आहे सर्वथा वैसदृश्य कबूल केल्यावाचून कोणत्याही गोष्टीचा प्रारंभ व विकास मानणे शक्य नाही. सादृश्याने आरंभाच्या पूर्वीही तसे

असण्याचा संभव मानावा लागतो. (या संबंधीचे अधिक स्पष्टीकरण उत्क्रांतिवादाच्या समीक्षणात महाराजांनी केले आहे.) "इतिहासाची पुनरावृत्ती होत असते" हे इतिहासातील महत्वाचे तत्त्व विकासवादाच्या विरोधी कसे आहे, याचेच जणू महाराजांनी विवेचन केले आहे. ऐतिहासिक विकासवाद मान्य केला की एकसारखी घटना पुनः पुनः कधीच घडू शकत नाही. म्हणून ऐतिहासिक विकासवाद चुकीचा आहे असे महाराजांच्या विवेचनावरून दिसून येईल.

इतिहास कोणी व कसा लिहावा ?

"रागद्वेषामुळे ऐतिहासिक शोध बदलत असतात", हे आपण नेहमीच पाहतो. याप्रमाणे इतिहासाचा सर्वत्र संशयच आहे तर कोणी लिहिलेल्या इतिहासावर विश्वास ठेवावा ? या विषयीचे महाराजांचे विवेचन महत्वाचे आहे. ते म्हणतात– "महात्म्यांनी लिहिलेल्या इतिहासावरच विश्वास ठेवावा. कारण वैयक्तिक उपपत्तीविषयी रागद्वेषामुळे ऐतिहासिक शोध बदलत असल्यामुळे रागद्वेषरहित अशा साधुपुरुषांनी लिहिलेले इतिहासच खरे समजून त्यानुसार बोध घ्यावा."

कोणी म्हणतात स्तुती करणाऱ्यांपेक्षा निंदा करणाऱ्यांनी लिहिलेला इतिहास चांगला असतो. पण हे मत महाराजांनी अगदी त्याज्य ठरविले आहे–"जगात राग मात्र आहे व द्वेष असा काही नाही. शिवाय चुका सर्व प्रेमातच होतात, द्वेषात

चुका मुळीच होत नाहीत–हा सिद्धांत गणितातल्या सिद्धांता-प्रमाणे सत्य होईल त्या दिवशी या लोकांचेही म्हणणे खरे होईल.– "इतिहासात शत्रूच्या तोंडची स्तुती व मित्रांच्या तोंडची निंदा या मात्र नेहमी खऱ्या स्थितीच्या निदर्शक समजल्या जातात." म्हणून महाराजांनी असे मत मांडले आहे की "इतिहास हा मोठ्या महात्म्यांनीच लिहावा, हे आर्य धर्माचे तत्त्व बरोबर आहे."

"याचे कारण असे की आर्यधर्मात, १. वचने, २. आचरण व ३. आचरण करणारी मनुष्ये; अशी त्रिपुटी अनादि मानलेली आहे व तिची धर्माला जरूरीही आहे.

१–श्रुती वचन प्रमाण आहे

२–स्मृती आचरणप्रधान आहे

३–पुराणात धर्माचे आचरण करणाऱ्या मनुष्याच्या कथा आहेत,

असा एकंदर धार्मिक क्रम आहे. आता इतिहास जर सर्वज्ञप्रणीत नसेल तर 'कर्णाने प्रसंगी आपल्या आईचे ऐकले नाही' हा त्याने धर्म केला की अधर्म केला, इत्यादी गोष्टींचा निर्णय कोण आणि कसा करणार? महाराज म्हणतात – "खाण्यापिण्यापासून सर्व लहानमोठ्या व्यवहारात आम्हा आर्यांना धर्मावाचून दुसरें काही दिसत नाही. अलीकडच्या इतिहासात तिथीसुद्धा विश्वसनीय सापडत नाही तर मग धर्माचा लाभ त्यापासून काय होणार! म्हणून सर्वज्ञप्रणीत असे रामायण महाभारतच आम्ही इतिहास समजतो; आणि येवढ्याच करता साधूंनी लिहिलेले इतिहास आम्हाला प्रमाण वाटतात.[४]"

या संदर्भात आधुनिक युगातील इतिहासलेखन पाहण्यासारखे आहे. आज विसाव्या शतकातील घडणाऱ्या महत्वाच्या घटना टेलिव्हिजनने पाहता येतात. ताज्या बातम्या काही तासातच रेडियोने ऐकावयास मिळतात आणि वर्तमानपत्रातून इत्थंभूत वाचावयास मिळतात. परंतु त्यात परस्पर विरोधही अनेकदा असतो. प्रत्येकजण स्वतःचा स्वार्थ साधण्यात आणि शत्रूची हानी करण्यातच आधुनिक वैज्ञानिक प्रगतीचा उपयोग करीत असतो. निस्पृहता नावालाही नसते. विज्ञानाची इतकी प्रगती होऊनही सत्य इतिहासाचा अपलाप आणि विकृतिकरण होत असते. म्हणून हिंदुस्थान पाकिस्थान युद्धात अमेरीकेत दूरदर्शनवर फिलम दाखविल्या गेली की पाकिस्थान दिल्ली उध्वस्त करीत आहे, दिल्लीच्या इमारती कोसळत आहेत. असा सारा खोटा प्रचार आकाशवाणी, दूरदर्शन व वर्तमानपत्रे वगैरेतून होत होता. भविष्यकाळात या खोटया प्रमाणांच्या साह्याने कोणी इतिहास लिहला तर तो खरा ठरेल काय ?

इतिहासावर विश्वास कसा ठेवावा ?

यासंबंधी महाराजांचे मत असे आहे की एकमेकांचे शत्रू एकमेकांचे इतिहास दाबून टाकून मुद्दाम द्वेषपूर्ण चुकीचा इतिहास लिहीत असतात. त्यामुळे वाटेल त्याने लिहिलेल्या इतिहासावर खरा इतिहास म्हणून विश्वास ठेवणे योग्य नाही.

या विवेचनाकरून एकूण तीन मुद्दे लक्षात येतात.

१– दिव्यदृष्टी ज्याला आहे अशा साधुपुरुषांनी लिहि-

लेल्या इतिहासावर विश्वास ठेवावा.

२– दिव्यदृष्टीचा प्रयत्न नसेल किंवा दिव्यदृष्टीवर विश्वास नसेल तर स्वोत्कर्षबोधक असलेल्या इतिहासावर विश्वास ठेवावा.

याचे कारण असे की एकमेकांचे विरोधी एकमेकांच्या इतिहासाचा अपलाप करीत असतात.'

महाराजांनी प्रतिपादन केलेले मत मेकॉले, मॅक्समूल्लर मॅकडोनल, व्हिलर, ग्रिफिथ, मार्शल वगैरेंनी लिहिलेल्या इतिहासावरून आणि आधुनिक वर्तमानपत्रातील लिखाणावरून उत्तम रीतीने सिद्ध होते. परंतु शत्रूच्या तोंडची स्तुती ही या खऱ्या वस्तुस्थितीची निदर्शक असल्यामुळे त्यांचेवर खरा इतिहास म्हणून भरवंसा ठेवणे चांगले. त्यामुळे मॅक्समूलर, टॉड, मांगो पार्क, कौंट जार्नस्टजर्ना वगैरेंनी केलेली स्तुती अगदी खरी आहे असे समजून चालण्यास मुळीच हरकत नाही. महाराजांच्या मतांवरून असे दिसते की इतिहासचा खरा शोध लावणे फार दुरापास्त आहे. ते जीवबुद्धीच्या आटोक्यात नाही. ते म्हणतात, की, प्रत्यक्ष लेखादिकांवरून जेवढा शोध लावला त्यावर कसातरी विश्वास ठेवावा पण त्यावरून एखादे अनुमान काढले की ते बहुतेक चुकीचे ठरते.

पण यामुळे ऐतिहासिक प्रमाण पूर्णपणे नाहीसे होते असे नाही. प्रमाणाला सामान्य सत्ता अपेक्षित आहे. इतिहासाची सामान्यसत्ता कोणीही नाकबूल करीत करीत नाही. परंतु जेथे विकारात्मक लेख दृष्टीस पडतात तेथे मात्र दिव्य दृष्टिवाचून कोणत्याही रीतीने इतिहास समजणे शक्य नाही. पण—

१– दिव्यदृष्टीचा आव आणून एखाद्याने तसा इतिहास लिहिला तर तो इतिहास आपल्याला आपल्या जागेहून ओढणारा असल्यास, आपल्यातील दिव्यदृष्टी पुरुषांचा शोध करून किंवा आपण ती दिव्य दृष्टी संपादन करून, खरे–खोटेपणाचा निवाडा करून घ्यावा.

२– असे पाहण्यास जर आपल्यामध्ये शक्ती नसेल तर दुसऱ्याच्या दिव्य दृष्टीवर विश्वासू नये व तो इतिहासही खरा मानू नये.

३– इतिहास जर स्वोत्कर्षबोधक असेल तर तो कोणीही सांगितलेला असेल तरी खुशाल विश्वास ठेवावा. तसेच

४– विकाररहित व अनिच्छित असेल तरीही विश्वास ठेवावा.

हिंदुराष्ट्राविषयी पाश्चात्यांचे गौरवोद्गार

त्या दृष्टीने पाहिले असता इंग्रज आणि ख्रिस्ती मिशनऱ्यांनी केलेल्या विकृत प्रचारामुळे भारतीय लोक आपल्या प्राचीन पूर्वजांच्या इतिहासाकडे–तत्त्वज्ञानाकडे–साहित्य–संगीत–काव्य–कला–आणि शास्त्रांकडे देखील तिरस्कार बुद्धीने पाहू लागले. त्यामुळे मानव समूहाला भूषण असलेल्या ज्ञानशाखांच्या शास्त्रपरंपरा देखील नष्ट झाल्या. आणि भारतीय लोक भौतिक विकासाने मिळणाऱ्या सुखलोलुपतेच्या मागे लागले. ही विकृती दूर करण्यासाठी–इंग्रजांचेच भाईबंद असलेल्या–पण मोकळ्या मनाने आर्यसंस्कृतीचा सखोल अभ्यास

करणाऱ्या–युरोपियन पंडितांनी प्राचीन आर्यसंस्कृतीविषयी जे गौरवाचे उद्गार काढले आहेत ते समजून घेणे अगत्याचे आहे. आपले पूर्वजांविषयी झालेले गैरसमज दूर करण्याचे श्रेय या गौरवपूर्ण उद्गारांना नक्कीच लाभेल. असा हा स्वोत्कर्ष बोधक इतिहास युरोपियनांच्याच शब्दातून येथे उद्धृत करणे श्रेयस्कर !

सर विल्यम जोन्स, प्रो. विल्सन, कोलब्रुक, मॅक्समूलर, कर्नल टॉड, पोकॉक, वगैरे युरोपियन पंडित व सर्व मान्य इतिहासकार यांनी प्राचीन हिंदुराष्ट्राबद्दल लिहिलेले गौरवोद्गार साक्ष या दृष्टीने महत्वाचे आहेत. "युरोपियनांचा शब्द म्हणजे वेदवाक्य" या समजुतीने या पाश्चात्य पंडितांची मते उद्धृत केलेली नाहीत. अगदी तिऱ्हाईत व प्रतिष्ठित साक्षीदारांच्या साक्षीस न्यायालयात विशेष महत्व असते. त्याच दृष्टीने या आधारांचे महत्व आहे. वास्तविक युरोपियन पंडितांनी हिंदुस्थानाविषयी अनादर व निंदा करणे हे स्वाभाविकच आहे, पण असे असूनही त्यांनी हिंदुस्थानचा आदर, गौरव व स्तुती केली असेल ती पूर्ण विचारांती पूर्ण खात्री झाल्यामुळेच व कदाचित नाईलाज झाल्यामुळे केली असेल; असे गृहीत धरण्यास, हरकत नाही. निव्वळ भाटाच्या स्तुतीपेक्षा आरंभी निंदक असून पुढे गुणग्राहक व नंतर स्तुतिपाठक बनलेल्यांनी केलेल्या स्तुतीची योग्यता अर्थातच अधिक आहे.

(द. गो. लिमये– भारतीय श्रेष्ठत्व–प्रस्तावना.)

१ प्राचीन भारतातील इतिहासलेखन

कर्नल टॉड साहेब राजपुतान्याच्या इतिहासाचे प्रस्तावनेत लिहितात:– "महंमदाच्या स्वाऱ्या हिंदुस्थानावर होऊ लागल्या-पासून तेथे झालेल्या अनेक क्रांत्या व मुसलमानी बादशहांची निष्ठुर धर्मांधता यांचा विचार करता हिंदुस्थानात इतिहास ग्रंथ शिल्लक राहिले नाहीत याचे आश्चर्य वाटावयास नको व **"हिंदूंना इतिहास लिहिणे माहीतच नव्हते असे अशक्य अनुमानही काढावयास नको."** इतर सुधारलेल्या देशात अतिप्राचीन काळापासूनच इतिहास लिहिण्याची प्रवृत्ति दिसून येत असून ती अति सुधारलेल्या प्राचीन हिंदुराष्ट्रात मात्र नव्हती हे म्हणणे मुळीच शोभत नाही. सूक्ष्म व व्यापक दृष्टीवर अवलंबून असणारी ज्योतिष–गणितादि शास्त्रे ज्यांनी पूर्णत्वास नेली, शिल्प, मूर्ति, काव्य, गायन ह्या कला ज्यांनी निर्माण केल्या; येवढेच नव्हे, तर त्या संबंधाचे अति सूक्ष्म व व्यापक नियमही ज्यांनी घालून देऊन त्यांची शास्त्रे बनविली, त्यांस राजांचे स्वभाव, त्यांची चरित्रे व त्यांचे कारकीर्दीत घडलेल्या गोष्टी लिहून ठेवण्याची साधी व सोपी कला मुळीच माहीत नव्हती. अशी कल्पना तरी करता येईल काय? "

(It is to be imagined that a nation so highly civilised as Hindus amongst whom the exact sciences flourished in perfection, by whom the fine arts, architecture, sculpture, poetry, music were not only cultivated, but taught and defined by the nicest and most elaborate rules, were totally unaccounted with the simple art of

recording the events of their history, the characters of their princes and the acts of their reigns ?)

"जुने इतिहासग्रंथ– कल्हणाची राजतरंगिणी (काश्मिर) विजयविलास, सूर्यप्रकाश, खिमात, जगद्विलास, राजप्रकाश, जयविलास, खोमानरासा, मानचरित्र इत्यादि राजस्थानातील ग्रंथ, गुजराथचा इतिहास सांगणारी रासमाला, पृथ्वीराज रासा वगैरे अनेक ग्रंथ होते. अबुल फाजलने हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाची जी माहिती दिली, ती त्याने कशावरून घेतली ? चंदाच्या 'पृथ्वीराज रासा' ग्रंथातील उल्लेखावरून असे अनुमान होते की त्याचे वेळी दुसरेहि बरेच ग्रंथ प्रचलित होते. चंद वगैरे भाट अडाणी होते असे कोणी मानू नये. राज्य-कारभार, परराष्ट्रसंबंध, राजनीती वगैरे संबंधाचेहि जे अध्याय चंदाचे ग्रंथात आहेत. त्यावरून भाट अडाणी होते असे दिसत नाही."

(हिंदू सुपिरिऑरिटी– पं. हरविलास सारदा पा. ९६)

२ कालचक्राने उलथापालथ

साप्रंतकाळी ज्या देशात केवळ रानटी लोकांचीच वस्ती आहे असे देश जगाचे आरंभापासून त्याच स्थितीत आहेत असे गृहीत धरून राष्ट्राच्या किंवा देशाच्या संस्कृतीची प्राचीनता ठरविण्याचे काहीच कारण नाही.

एखादा देश अत्यंत सुधारलेला असूनही तेथील संस्कृति प्रचंड भूकंप, ज्वालामुखीचे उद्रेक जलप्रलय किंवा क्रांत्या यांनी

नामशेष होऊन तेथे पुन: रानटी स्थिति येण्याचाही संभव आहे, ही गोष्ट विसरता कामा नये. तसेच जगात अति प्राचीन काळी एक देश अगदी रानटी स्थितीत असला म्हणजे त्या काळी सबंध पृथ्वीवरील सर्वच देशांची तशीच स्थिती होती असेही गृहीत धरण्याचे कारण नाही. (भा. श्रे. २१)

या दृष्टीने पाहिले असता युरोप, इजिप्त, दक्षिण व उत्तर (मध्य) अमेरीका, आणि हिंदुस्थान यांच्या प्राचीन आणि अर्वाचीन इतिहासातील जमीन अस्मानाचा फरक का आहे, याची संगती लक्षात येते.

२ सर्व पृथ्वीचा नमुना– हिंदुस्थान

"या हिंदुस्थान देशातील सृष्टिदेवतेने चित्रविचित्र व अनेक रंगाचे बहुमोल वस्त्रच पांघरले आहेसे वाटते. या देशात उन्हाळ्यात एकदम वर येणारी मुबलक वनस्पती संपत्ति व पावसाळ्यात होणारी भयंकर वादळे, हिमाच्छादित हिमालयाची भव्यता व वालुकामैदानाचा रखरखितपणा, उत्तर हिंदुस्थानातील अतिविस्तीर्ण मैदाने व गगनचुंबित पर्वतावरील सृष्टिशोभा, ही पाहणाराचे मनावर तेथील सृष्टीची विलक्षणता, भव्यता व चमत्कृति यांचा कायमचा परिणाम झाल्यावाचून राहत नाही."

कौंट जॉर्नस्टजर्ना (Theogony of the Hindus, P. 126)

"हिंदुस्थान हा सगळ्या पृथ्वीचाच एक लहानसा नमुना आहे (India is an epitome of the whole world.) असे जे

एका मार्मिक लेखकाने (Chamber's Encyclopedia P. 337) म्हटले आहे ते अक्षरश: खरे आहे."

"नखशिखांत लोखंडी चिलखत घातलेला राजपुतान्यातील अश्वारुढ योद्धा व काशीच्या देवालयातील ईश्वरधर्मनिष्ठ ब्राह्मण पहा; आपल्या लढाऊ जहाजातून किंवा चपळ घोड्यावरून त्वरेने हालचाली करणारा कडवा मराठा व हत्तीवर बसून मंदगतीने चालणारा नबाब याजकडें दृष्टी फेका; अगर जंगलात वाघाची शिकार करणारी वीरस्त्री व आपली कामवासना देवालाच अर्पण करणारी मुरळी याजकडे नजर फेका; तुम्हास हिंदुस्थानात विलक्षणता, भव्यपणा व चमत्कार हे आढळल्यावाचून राहणार नाहीत"

कौंट जॉर्नस्टजर्ना (Theogony of the Hindus, P. 126)

"हिंदुस्थानातील सृष्टिशोभेची भव्यता, विशालत्व व विविधता आणि तेथील भूमीत उत्पन्न होणारी अनेक प्रकारची बहुमोल व मुबलक धान्यसंपत्ती या बाबतीत जगातील कोणताहि देश हिंदुस्थानची बरोबरी करु शकणार नाही."

म्यूर (हिंदुस्थानचा इतिहास पृ. १)

४ पहिला मानव हिंदुस्थानात जन्मला

सर वाल्टर राले यांनी आपल्या जगाच्या इतिहासात (पृ. ९९) "भरतखंडात प्रथमच मनुष्यप्राणी जन्मास आला व तेथूनच तो सर्व पृथ्वीवर पसरला." असे म्हटले आहे.

(भा. श्रे. ९८)

५ **मानव संस्कृतीचे उगम स्थान**

"हिंदुस्थान हेच मानवजातीचे व मानव संस्कृतीचे मूळस्थान होय." असे काउंट जर्नस्टजनी Theogony of Hindu P. 168 व कर्नल अल्कॉट (थियासफी मार्च १८८१) यांनी म्हटले आहे

६ **सर्व ज्ञानशाखांचे व सर्व धर्मांचे उगम स्थान**

"हिंदुराष्ट्राच्या मनाची व बुद्धीची भरारी जितकी उंच व दूर पोचलेली आहे, तितकी पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याही राष्ट्राची पोचलेली नाही" —मिसेस मॅनिंग

(Ancient & Mediaeval India vol II P. 148)

प्रो. हीरेन (Historical Researches, Vol. II P. 45.) म्हणतात:— "केवळ आशिया खंडाचेच नव्हे तर युरोपखंडातील लोकाच्याही सर्व ज्ञानाचा व धर्मांचा उगम हिंदुस्थानातच आहे."

(भा. श्रे. ५)

७ **ऋग्वेदाचा काळ अगम्य**

सर हंटर — या पूज्य ऋग्वेदाचा काळ अगम्य आहे.

मॅक्समूलर — मानवजातीच्या पुस्तकसंग्रहातील वेद हे अत्यंत जुने ग्रंथ आहेत. (१३३)

८ **अखंड ऋण**

यजुर्वेदाची एक प्रत जेव्हा व्हॉलटेअर यास अर्पण करण्यात आली तेव्हा तो म्हणाला की— "ही देणगी खरोखर

अमूल्य असून त्याबद्दल पौरस्त्य राष्ट्रांचे पाश्चात्य राष्ट्रांनी अखंड ऋणीच राहिले पाहिजे."

लेऑन डेलवॉस उत्साहाने म्हणतो– "ग्रीस व रोम मधील प्रत्येक स्मारकाची योग्यता ऋग्वेदाच्या खालीच लागेल." (१३३)

९ मानवी अभिमानाची गोष्ट

मॅक्समूलरचे कळकळीचे सांगणे आहे की– "इतर कोणत्याही भाषेतील ग्रंथाने जे काम झाले नसते ते वेदांनी जगाच्या इतिहासात केले आहे. सबब ज्याला ज्याला म्हणून स्वतःचा, पूर्वजांचा व आपल्या मानवजातीच्या इतिहासाचा अभिमान आहे त्या प्रत्येकाने वेदांचा अभ्यास करणे जरूर आहे." (१३४)

१० स्त्रियांची ज्ञान साधना

ज्या काळी मानवी मनाला अत्यंत कठीण वाटणाऱ्या विषयांचे विवेचन व उद्घाटन करण्यात ब्राह्मण मोठ्या उत्साहाने मग्न असत. आणि वेदान्तासारख्या पवित्र विषयातील सिद्धान्त स्त्रियांपुढे मांडण्यात येऊन त्याही आपल्या उत्साहयुक्त कळकळीने व ज्ञान जिज्ञासेने त्या सिद्धान्ताच्या गूढ प्रदेशात शिरून व मर्म हुडकून काढून पुरुषासही विचारांच्या गांर्भीयाने, खोलपणाने व वजनाने आश्चर्यचकीत करून सोडीत– त्या काळाची प्रतिमा या ब्राह्मण– ग्रंथात उठलेली आपणास दिसते."– **प्रो. बेंरर** (भा. श्रे. १३४)

११ सर्वात जुने व अजूनहि टिकलेले हिंदुराष्ट्र

एडिंबरो रिव्हयूमध्येही (आक्टोबर १८७२) एक

लेखक म्हणतो :– "जगाच्या उपलब्ध इतिहासात जी प्राचीन राष्ट्रे केवळ नाममात्रेवरून सांप्रत हयात आहेत, त्यांच्यामध्ये संस्कृतीचा अरुणोदय होण्यापूर्वीच या प्राचीन हिंदुराष्ट्राचा संस्कृति सूर्य मध्याह्नी येऊन ठेपला होता ! ज्याच्या प्राचीन संस्कृतीचे महत्वाचे अवशेष सांप्रत विद्यमान आहेत अशा जुन्या राष्ट्रात हिंदुराष्ट्र हे सर्वात जुने आहे. असे असूनही सुसंस्कृति व सुधारणा या बाबतीत आजतागायत कोणत्याही राष्ट्राला हिंदुराष्ट्रास मागे टाकता आलेले नाही !"

१२

हिंदुस्थान काय शिकवितो ?

"मानवी अंतःकरणाच्या व बुद्धीच्या श्रेष्ठ वृत्ती व शक्ती कोणत्या देशात पूर्णावस्थेस पोचल्या आहेत ? सृष्टीतील व संसारातील अत्यंत महत्त्वाच्या गूढ प्रमेयांचा सूक्ष्म व खोल विचार कोठे झाला आहे ? व प्लेटो, कँटप्रभृति तत्त्ववेत्त्यांच्या ग्रंथांचे परिशीलन केलेल्या पंडितांच्याही अध्ययनास सर्वस्वी पात्र होईल असा वरील गूढ प्रमेयांचा उलगडा कोठे झाला आहे? असे प्रश्न मला कोणी विचारले तर मी त्यास 'हिंदुस्थान–हिंदुस्थान–हिंदुस्थान' असे एकच उत्तर देईन.

ग्रीक, रोमन व यहुदी या तीनच राष्ट्रांचे विचार, वाङ्मय व संस्कृति याजवर युरोपियन राष्ट्रांचे आजपर्यंत पोषण झालेले असल्यामुळे त्यांचे आध्यात्मिक जीवन अपुरे, आकुंचित व खुरटे झालेले आहे. हे जीवन खरोखर परिपूर्ण, विशाल, सर्व मनुष्यता आकलन करणारे व विश्वव्यापक करावयाचे असल्यास, किंबहुना त्यात नवीन व सनातन असे चैतन्य ओतून त्यास अजरामर करावयाचे असल्यास, आपण कोणत्या देशाच्या

वाङ्‌मयाकडे धाव घ्यावी असा मी मनाशी विचार करू लागलो तर भाग्यशाली भरतखंडच माझ्या डोळ्यापुढे उभे राहते.

भाषा, धर्म, पुराण कथा, कायदे, चालीरीती, प्राचीन-कला, प्राचीन शास्त्रे वगैरे जे मानवी मनोबुद्धीचे निरनिराळे विकास व विलास आहेत त्यापैकी कोणत्याही एकाच्या विशेष अध्ययनास आरंभ केल्यावर तुम्हाला आवडो वा न आवडो तुम्हास हिंदुस्थानाकडेच जाणे भाग पडेल! कारण मानवी इतिहासाच्या सामुग्रीपैकी अत्यंत महत्वाच्या व अत्यंत बोध-कारक सामुग्रीचे भांडार हिंदुस्थानात–केवळ एकटचा हिंदु-स्थानातच–साठविलेले आहे."

– मॅक्समूलर

(India, what can it teach us ? P. 45)

१३ प्रचंड ग्रंथसंपत्तीची काव्यमयता

"संस्कृतमधील काव्य भांडाराचा मुळीच ठाव लागत नाही. परंतु भारतीयांची नैसर्गिक प्रवृत्ती काव्यमय असल्याने त्यांच्या हातून इतके असंख्य काव्यग्रंथ निर्माण झाले यात काय आश्चर्य ? सध्या उपलब्ध असलेल्या ग्रंथसंख्येने जर आपण इतके मोहित झालो तर पुच्छविषाणरहित नरपशूंच्या धार्मिक अत्याचारास बळी पडून ज्यांची राखरांगोळी झाली, त्या ग्रंथांची नक्की संख्या आम्हास माहित झाली तर आमच्या आश्चर्यास सीमाच उरणार नाही. नैसर्गिक काव्यप्रवृत्ती हीच या अफाट ग्रंथ संपत्तीचे कारण होय. कायदेशास्त्र काव्य-मय, ज्योतिषशास्त्राची उभारणी काव्याच्या पायावर, इतर विज्ञान शास्त्रांची भाषा काव्ययुक्त, धर्मशास्त्र काव्य वाणीने बोललेले, सारांश कोणत्याही लेखनाचे कामी काव्याचा सहज

लीलेने उपयोग करण्याचे त्यांस मुळीच जड जात नसे. जे ऋषी त्रिकाल सत्य असलेले वेद आपल्या सरळ, रसाळ, मोहक आणि काव्य रसाने थबथलेल्या वाणीने बोलले त्यांच्या वंशजास कवित्वशक्ती परंपरेने प्राप्त झाली असल्यास त्यात नवल ते कोणते ?"

– प्रो. मॅक्स डंकर (१३८)

१४ ८००० वर्षापूर्वी बाक्ट्रियात हिंदु राजा

"दबिस्तान नामक एक बाक्ट्रियन लेख **सर विल्यम जोन्स** यास काश्मिरात सापडला होता. व तो पुढे त्यानी युरोपात नेला. या लेखात अनेक राजांची मोठी नामावली दिलेली असून त्यातील पहिला राजा बाक्ट्रिया देशात शिकंदराचे स्वारीपूर्वी ५६०० वर्षांचे सुमारास राज्य करीत होता; आणि हा राजा हिंदुच होता. यावरून खि. पू. ६००० चे सुमारास म्हणजे पृथ्वीवर मनुष्यप्राणी निर्माण झाल्याचा जो काळ मध्ययुगीन युरोपियन ग्रंथकारांनी दिला होता. त्याचे आधी अनेक शतके भारतात असलेली आर्य संस्कृति किती श्रेष्ठतेस पोचली होती ते कळून येते." – **कौंट जार्नस्टजर्ना**

(Theogony of the Hindus P. 134). (भा. श्रे १९)

१५ कलहात्मक राज्यपद्धतीची कारणे

"राज्यपद्धती कोणतीहि असली तरी समाजाची आध्यात्मिक, नैतिक व सामाजिक ध्येये उच्च प्रतीची असतील, तर तेथील राज्य व्यवस्थाही त्याच ध्येयास अनुसरून प्रजेस सुखावह अशी होत असते. समाजात अशी ध्येये खेळत नसली म्हणजे राज्य पद्धती कितीही उत्तम असली तरी तेथील राज्य

व्यवस्थेत व्यक्तिव्यक्तींमध्ये, पक्षापक्षांमध्ये व वर्गावर्गामध्ये द्रव्यासाठी व हक्कासाठी (चढाओढ हे गोंडस नाव मिळालेला) कलह माजल्यावाचून राहत नाही. युरोप व अमेरिकेतील राज्यपद्धती बहुतांशी लोकसत्तात्मक असूनही तेथे असा मोठा कलह माजून राहिलेला असतो, याचे तरी बीज हेच होय."

१६ उत्तम राज्यपद्धती– हिंदुस्थानात

"सत्तेच्या अधिष्ठानाचे दृष्टीने राज्य पद्धतीचे वर्गीकरण केले तर राजसत्ताक, महाजनसत्ताक, प्रतिनिधिसत्ताक, लोकसत्ताक, वगैरे तिचे भेद होतील, पण प्रजाजनांचे सुख व भरभराट ही एकच दृष्टी ठेवून विचार केला तर असा सामान्य सिद्धांत निघेल की उच्चशीलाचे, उदारमनाचे, व्यापक सहानुभूतीचे, थोर सद्गुणाचे व श्रेष्ठ बुद्धिमत्तेचे लोकांस मात्र जी राज्यपद्धती श्रेष्ठपणास चढविते आणि शीलहीन, हलक्या मनाचे, संकुचित दृष्टीचे, दुराचरणी व बुद्धीहीन लोकास जी श्रेष्ठतेस चढू देत नाही; तीच राज्यपद्धती उत्तम होय...

"ही कसोटी प्राचीन भरतखंडात लाविली असता, तेथील राज्यव्यवस्था उत्तम होती– "पृथ्वीवरील सर्व राष्ट्रात प्राचीन भारतीय राष्ट्र संस्थेने सर्वाहून श्रेष्ठ होते," असे कोणाचेही मत झाल्यावाचून राहणार नाही." – **प्रो. मॅक्स डंकर**
(History of Antiquity VOL. II P. 18) (भा. श्रे. २९)

१७ भारत व युरोपची तुलना

"प्राचीन भरतखंडात चोरीचे नावही नव्हते" असे **स्ट्रॅबोने** नमूद करून ठेवले आहे. (भा. श्रे. ३०)

"अत्यंत सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्राची राजधानी म्हणजे सैतानाचे माहेरघर असून, रात्री रस्त्यातून फिरणे म्हणजे मरणाची तयारी करणे आहे व परक्याचे घरी निजावयास जाण्यापूर्वी आपले मृत्युपत्र करून ठेवणे आवश्यक आहे," असे ज्या काळाचे डॉ. जॉनसनने अत्युक्तीचे वर्णन केलेले आहे. त्या काळी "घराचे दरवाजे कां लावावयाचे व त्यास कड्याकुलपे कशासाठी घालावयाची ? हेही हिंदू लोकास माहीत नव्हते"

— जॉन्सन

मेगॅस्थनीस याने असे लिहिले आहे की "चंद्रगुप्ताच्या छावणीत एकंदर ४ लक्ष लोक असूनही तेथे दररोज होणाऱ्या चोऱ्यांचा माल सरासरीने ३० रुपयाहून जास्त किमतीचा नसे. यावरून त्या काळच्या पोलिसच्या चोखपणाचीही साक्ष पटेल."

— मेगॅस्थनीस

इंग्लंडमध्ये व्हिक्टोरिया महाराणीचे कारकीर्दीपर्यंत व्यवस्थित पोलिसखाते अस्तित्वातही आलेले नव्हते ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. (३१)

१८

लोकसत्ताकांचा संघ = प्राचीन भारत

"प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति हिंदूंच्या स्वप्नातही आली नव्हती. किंबहुना ती त्यांच्या राजकीय प्रकृतीस कधी मानवणारही नाही, असे पुष्कळ विद्वान म्हणत असतात. पण हे म्हणणे साफ चुकीचे आहे. प्राचीनकाळापासून हिंदुस्थानातले प्रत्येक गांव किंवा शहर म्हणजे एक लहानसे पण स्वयंपूर्ण लोकसत्ताक राज्यच असे. व सर्व हिंदुस्थान म्हणजे अशा

छोटया स्वराज्यांचा एक प्रचंड संघच होता."

– ले. कर्नल मार्क विल्कस

(Historical sketches of the South of India VOL. I. P. 119)

१९ व्यक्तिस्वातंत्र्य

"भरतखंडातील प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र होती", असे एरियनने आदरपूर्वक म्हटले आहे.

२० लोकसत्ताकाची बीजे

"हिंदुस्थानची प्राचीन राज्यपद्धती व कायदे यामध्ये लोकसत्ताक राज्यांची बीजे स्पष्ट दिसत आहेत." असे मिल सारख्या दुराग्रही व अहंमन्य इतिहासकारासही कबूल करावे लागले आहे.

२१ स्वयंपूर्ण लोकसत्ताक नगरे

सर चार्लस मेटकाफ यांनी तर या ग्रामसंस्थांचे मोठेच रसभरित गुणवर्णन केले आहे. ते लिहितात- "या ग्रामसंस्थारूपी छोटया लोकसत्ताक राज्यांच्या बहुतेक सर्व गरजा गावातल्या गावात भागत. त्यांचेवर परकीय राजसत्तेचा शह कधीच बसला नाही. जेथे इतर सर्व गोष्टी क्षणभंगुर भासतात तेथे या ग्रामसंस्था मात्र सनातन दिसतात. एकामागून दुसरी अशी अनेक राजघराणी जमीनदोस्त झाली. एकामागून एक राज्य-क्रांत्या अनेक होऊन गेल्या. पठाण, मोंगल, मराठे, शीख, इंग्रज वगैरेंच्या राजसत्ता आळीपाळीने या देशावर नांदल्या. पण या सर्व उलथापालथीत ग्रामसंस्था आपल्या पूर्ववत कायमच्या कायमच आहेत ! या ग्रामसंस्थारूपी लहान लहान लोकसत्ताक

राज्यांचा असा संघ बनल्यामुळेच हिंदूलोकांस राजकीय स्वातंत्र्य, स्वावलंबन व राजकीय सुख यांचा लाभ झाला आहे."

(रिपोर्ट ऑफ सिलेक्ट कमेटी– व्हाल्यूम ऑफ दि हाऊस ऑफ कॉमन्स इ. स. १८३२)

The Village Communities are little republies having nearly everything they can want within themselves and almost independent of any foreign nation.

They seem to last where Nothing lasts. Dynasty atfer dynasty tumbles down revolution succeeds revolution and Pathan, Moghul, Marhatha, Sikh, English are all Mastesr turn, but the Village Communities remain the same. This union of village communities each one forming a little state in itself, is in a high degree conducive to their (Hindoo) happines and to the enjoyment of a great portion of freedom and independence.

(Report of the Select Committee Vol III of the House of Commons 1832) (भा. श्रे. ३१–३२)

२२ ग्रामराज्ये एका सूत्रात होती

"पण ह्या लहान लहान ग्रामसंस्था वाळूच्या कणाप्रमाणे पृथक असून त्यांचा एकजीव नव्हता असे कोणास वाटेल, पण खरी स्थिती तशी नव्हती. राजाने प्रत्येक गावावर एकेक, दहा किंवा वीस गावाच्या समुदायांवर एक, अशा पाच किंवा दहा समुदायांवर एक आणि अशा दहा महासमुदायांवर एक याप्रमाणे अधिकारी नेमावे व त्यांनी एकमेकांशी चढत्या क्रमाने जबाबदारीनें वागावे अशी पद्धत होती." – मनुस्मृति

(अ ७।१२३–१२४)

"धर्मशास्त्र किंवा कायदे यांचे स्वरूप व व्यापकता ही राज्यव्यस्थेच्या बरेवाईटपणाची एक कसोटी आहे. भारतीयांच्या धर्मशास्त्राचा मुख्य ग्रंथ मनुस्मृति हा होय. याची रचना जशी साधी आहे; तसे त्यातील नियम दूरदृष्टीचे व शहाणपणाचे पूर्ण निदर्शक आहेत. हे नियम वारंवार बदलणारे नसूनहि ते समाजातील व्यक्तींच्या सर्व भिन्न भिन्न परस्पर संबंधास पुरतील इतके व्यापक आहेत." (३२)

२३ युरोपवर मनुस्मृतीचा प्रभाव

"मनुस्मृति ही ग्रीक स्मृतिकार **सोलन** किंबहुना लायकरगस यांच्या कायद्याहूनही प्राचीनतर असली पाहिजे. क्रीट बेटातील प्राचीन कायदे मनूच्या धर्मशास्त्रासारखेच असल्याचे दिसून येते; व हेच कायदे लायकरगस्ने स्पार्टामध्ये आणले असावेत."

– **सर विल्यम जोन्स**

(Houghton's institute of Hindu Law.
प्रस्तावना पृष्ठ १०।१२.)

धी बायबल इन इन्डिया, नावाचा ग्रंथ लिहिणाऱ्या लेखकाचे तर असे मत आहे की, "इजिप्त, इराण, ग्रीस व रोमन येथील कायद्याची रचना मनुस्मृतीचेच पायावर केलेली आहे, व अजूनही युरोप खंडाच्या न्यायकचेऱ्यात मनुस्मृतीचेच प्राबल्य असल्याचे दररोज दिसून येते." The मनुस्मृति was the foundation upon which the Egyptian, The Persian,- The Grecian, and the Roman codes of law were built, and the influence of मनु was still every day felt in Europe

(३२)

"डेसेमव्हेरेटच्या आमदानीत ग्रीकानी भारतीयांच्या स्मृतींवरून आपले कायदे तयार केले असावे; व पुढे ग्रीक कायद्यापासून रोमन व रोमनपासून इंग्रजी कायदे रचण्यात आले."
— प्रो. विल्सन (३३)

२४ फार सुधारलेल्या लोकांचे नियम

"हिंदूंच्या स्मृती ग्रंथात समाजातील सर्व भिन्न भिन्न संबंध नियमित करणारे नियम दिले आहेत. हे नियम प्रचलित असलेला समाज फारच सुधारलेला असल्याबाचून असे नियम अस्तित्वातच येणे शक्य नाही."
— प्रो. विल्सन (३३)

२५ मनुस्मृतीत राजांनाही न्यायनिष्ठुरता

"Mythology of the Hindus," नामक ग्रंथात (पृष्ट ८) असा अभिप्राय दिला आहे की, "मनुस्मृतीच्या भाषेत कायद्याच्या ग्रंथात आवश्यक असे एक प्रकारचे गांभीर्य व उदात्तता असून त्यामुळे तीबद्दल मनात एक प्रकारचा आदरयुक्त दरारा वाटतो. ईश्वराखेरीज इतर सर्वासंबधाने नियम सांगतांना मनुस्मृतीने अत्यंत स्वतंत्रता स्वीकारल्याचे दिसून येत असून खुद्द राजांचीही न्यायनिष्ठूरपणे तिने केलेली कानउघाडणी तर खरोखरच उच्च दर्जाची आहे."
— कोलमन

"The style of मनु has a certain austere majesty that sounds like the language of legislation and extorts a respectfull awe ? The sentiments of independence on all beings but God and harsh admontions even to kings are truly noble."

२६ मनुस्मृतीबद्दल आदर

मद्रास हायकोर्टाचे चीफ जस्टिस सर थॉमस स्ट्रेंज यांनी तर असे लिहीले आहे की; "या शास्त्राचे अध्ययन केल्यास प्रत्येक इंग्रज कायदेपंडिताचा फायदा होऊन त्याच्या नुसत्या वाचनानेही त्याचे मनात आदर व आनंद उत्पन्न झाल्यावाचून रहाणार नाही."

— थामस स्ट्रेंज

"Hindu law of Evidence will be read by every English lawyer with a mixture of admiration and delight; as it may be studied by him to advantage."

२७ परिश्रम आणि गूढज्ञान

"मानवी जीवनाच्या अत्यंत गूढ तत्त्वांचा उद्बोध करून–ती सर्व जगास पटवून देण्यात सांख्यांनी जे परिश्रम केले ते केवळ बिनमोल आहेत..... एकंदर विवेचनावरून असे वाटते की त्यांनी जे लिहिले आहे त्यापेक्षा त्यांचे ठिकाणी पुष्कळच अधिक विचार शिल्लक होते." —मिसेस मॅनिंग.

(भा. श्रे. १८३)

२८ सांख्याचा अनुवाद = उत्क्रांतिवाद

"विश्वाची उत्पत्ति व्यवस्थिती व उत्कर्ष यांचे जे विस्तृत विवेचन सांख्यांनी केले आहे त्याचाच केवळ अनुवाद हल्लीच्या उत्क्रांतिवाद्यांनी नवीन दृष्टीने व नवीन भाषेने केला आहे. व त्यापेक्षा यांची काही जास्त करामत आहे असे म्हणवत नाही."

— सर हंटर

२९ उपनिषदांपुढे बर्कले तत्त्वज्ञान खुरटे

"ज्याने बर्कलेचे तत्त्वज्ञान समजून घेऊन शिवाय उपनिषदे व ब्रह्मसूत्र यांच्यातील ज्ञान अधिगत केले आहे त्यास खात्रीपूर्वक असे सांगता येईल की उपनिषदे व ब्राह्मण यातील तत्त्वज्ञानापुढे वकलेचे तत्त्वज्ञान अगदीच तुटपुंजे व खुरटे दिसते ?"

— **मॅक्समूलर** (भा. श्रे. १८७)

३० शांकर भाष्याची महती

"आचार्य भाष्यासारख्या सुंदर ग्रंथाचे एखाद्या युरोपियन भाषेत संपूर्ण भाषांतर झाल्याशिवाय तत्त्वज्ञानाचा इतिहास पुरा होणार नाही. प्रत्यक्ष सरस्वतीस सुद्धा आचार्य भाष्याची महती गाताना शीण आल्याखेरीज राहणार नाही."

— **सर विल्यम जोन्स** (१८८)

मीमांसा विवेचन पद्धतीत प्रथम पूर्वपक्ष, नंतर उत्तरपक्ष व शेवटी सिद्धान्त असतो. या पद्धतीबद्दल पाश्चात्यांना फार आश्चर्य वाटते. "आजपर्यंत जगात चमत्कृतिजनक अशी बरीच काव्ये व ग्रंथ निर्माण झाले. परंतु या ग्रंथाची थोरवी काही अपूर्वंच आहे. धन्य आहे त्या महाभागाची की– ज्याच्या बुद्धीतून असे पुस्तक उदयास आले. प्रत्येक प्रकारच्या ज्ञानप्रसारास असले साधन उत्पन्न करून ते इतके सुव्यवस्थित–सोपे–सर्व संग्राहक बनविणाऱ्या हिंदूंच्या कल्पक बुद्धीची तारीफ करावी तेवढी थोडीच होणार आहे." — **मॅक्समूलर** (१८८)

३१ उपनिषदांचा अभ्यास हेच परमोच्च सुख

"ज्यूधर्मातील अंधश्रद्धायुक्त समजुती व वेडगळ समज

यांचे मनावरचे कीट वाढले होते. अशा अंधश्रद्धेच्या पायावर असलेल्या तत्त्वज्ञानाने जो मनाला पंगुपणा आला होता, तो सर्व उपनिषदांच्या अवगाहनाने नाहीसा होऊन मन कसे प्रफुल्लित व जोमदार होते ते पहा! सर्व जगात उपनिषद ग्रंथांच्या अभ्यासापेक्षा दुसरा कोणताही अभ्यास फलदायी व मनाच्या उच्चस्थितीला नेणार नाही. माझ्या आयुष्यातील उपनिषदांचे अध्ययन हेच श्रेष्ठ सुख व मरणोत्तर प्राप्त होणारे आत्यंतिक सुखही तेच होय." – **शोपेन हॉवर** जर्मन तत्त्वज्ञ. (१८९)

३२ कुठे ग्रीक आणि कुठे आर्य !

"हिंदूंचे सर्व विषयातील ज्ञान बरेच वाढलेले होते. तरीपण ईश्वरस्वरूपाच्या ज्ञानाचा जो भव्य दीप भारतीय आर्यांजवळ होता व ज्याच्या साह्याने त्यांनी सर्व आध्यात्मिक प्रदेश हिंडून त्यात अभूतपूर्व व दुस्साध्य शोध लावले त्यांचा एखादा मंद किरण सुद्धा विशाल व गाढ ग्रीक विद्वत्तेला मिळालेला नाही. तेणे करून तिला संशयरूप अंधःकार व नास्तिकवादरूपी खाचखळगे यातून मार्ग काढणे फार कठिण झाले."

– **एलफिस्टन** (१८९)

३३ आरोग्य सुधारक मनु

"हिंदु शास्त्रात आरोग्याचे नियम हल्लीप्रमाणे सुधारलेल्या स्वरूपाचे होते. प्रख्यात धर्मशास्त्रकार मनु यांची आरोग्य रक्षक म्हणून फार दूरवर कीर्ती पसरली आहे. जगातील अतिशय नामांकित आरोग्यसुधारक माणसांमध्ये मनूचा दर्जा फारच उच्च आहे. – **लॉर्ड ॲपथिल मद्रासचे गव्हर्नर** (१३२)

३४

आर्य वैद्यकाचा विस्तार

"आर्य वैद्यक इतर पूरक शास्त्राशी फारच एकरूप झालेले होते. शरीररचना–अवयव–जोड–स्नायु–रक्त वाहिन्या व शरीर घटक (टिश्यू)–धातू, यांचा आर्य वैद्यकात विस्तृत विचार झालेला आहे. हिंदूंच्या सर्वमान्य सर्व संग्राहक वैद्यक ग्रंथात वनस्पती–खनिज–प्राणी विषयक सर्व वस्तूंचा समावेश झाला आहे. त्यांची नामावळी बेसुमार विस्तृत झाली असून **"यांतील बरीच नांवें युरोपियन वैद्यकाने उचलली आहेत."** औषधक्रिया खुबीदार असून औषधांच्या वर्गीकरणाचे व सेवनाचे नियम फारच सूक्ष्म व लांबलचक आहेत. आरोग्य–अन्नसेवन व आहार याकडे फार बारीक दृष्टी दिलेली आहे."

—सर विल्यम हंटर (१९२)

३५

आयुर्वेदाच्या भरभराटीचे कारण

"भारतीय आर्यांचे रोगनिदान अगदी तंतोतंत असून लक्षणांची व्याख्या व पृथक्करण सूक्ष्मगामी आहे.– शस्त्रक्रियाही बरीच वाढली होती व औषध योजनेत तर त्यांचा हातखंडाच असे, कारण की, नैसर्गिक अनुकूलतेमुळे कोणत्याच औषधीची कधी वाण नसे. शिवाय त्यांची चौकस बद्धी, मेहनती स्वभाव सूक्ष्म व खोल दृष्टी इत्यादी गुणांमुळे व वनस्पतींच्या विपुलते-मुळे आयुर्वेदाची फारच भरभराट झाली."

–प्रो. विल्सन.

३६

शस्त्रक्रिया

"आर्य वैद्यककाली शस्त्रक्रिया फार पुढ गेलेली असून कित्येक बाबतीत चालू काळी सुद्धा सुधारणा झालेली नाही असे

म्हणावे लागते. नाक–कान इत्यादी अवयव कापून नवे बसविणे ही सध्या कष्ट साध्य असलेली शस्त्रक्रिया त्या काळी सहज करीत असत. या कामी लागणारी शस्त्रेसुद्धा विलक्षण तीक्ष्ण, नाजूक व सूक्ष्म असत." -- **वेबर, एलफिस्टन, मॅनिंगबाई** (१९३)

३७ नासिक प्रत्यारोपण

"इ. स. पूर्व एक हजार वर्षे पूर्वी भारतातील कुम्भकार जातीचे लोक कापलेले नाक पुनः शल्यचिकित्से द्वारा नवे करून देत असत." – **इनसायक्लोपिदिया ब्रिटानिका**

(नवनीत सप्टेंबर १९८३ पा. २१)

वीने नावाच्या एका फ्रेंच प्रवाशाने कांगडा येथे जाता येताना अनेक लोकांनी आपली कापलेली नाके जोडून नवीन केलेली पाहिली असल्याचा उल्लेख केला आहे. (नवनीत पा. २२)

सन १७९३ मद्रास सरकारी गॅझेटमध्ये नासिका प्रत्यारोपणाच्या एका शल्य चिकित्सेचा उल्लेख "एकुलते एक ऑपरेशन" म्हणून केला आहे. आणि या ऑपरेशनचे वर्णन **जंटलमन्स मॅगेझिन** या लंडन येथील नियतकालिकात प्रसिद्ध झाले आहे. (१९८३ नवनीत पान २३)

३८ प्लॉस्टिक सर्जरीचे मूळ

"इटालीयन प्लॉस्टिक सर्जरी मूळरूपात भारतीय विद्याच असून ती व्यापारी आणि नाविकांच्या बरोबर येथे आली." या नंतर १९ व्या शतकातील अनेक जर्मन वैद्यांनी भारतीय आणि इटालवी या दोन्ही पद्धतीच्या आधाराने प्लॅस्टिक सर्जरीची प्रगति केली." – **बारियन** (नवनीत पा. २२ सप्टें. १९८३)

३९ शरीरशास्त्राची सूक्ष्मता

"वेदकालीन मानवेतर प्राण्यांच्या शरीर शास्त्राचे बरेच ज्ञान आर्य लोकांस अवगत होते कारण प्रत्येक अवयवास भिन्न व योग्य शब्द सापडतो आणि ही गोष्ट शास्त्राच्या वाढीशिवाय होणे शक्य नाही. मग मनुष्याच्या शरीरशास्त्राबद्दल तर विचारावयासच नको. अमरकोशामध्ये मानवी शरीर व रोग या संबंधी जे शब्द आढळतात त्यावरून वरील अनुमान काढणे भाग पडते."

– **प्रो. वेबर** (१९४)

४० अरबी भाषांतरे

"संस्कृतमध्ये वैद्यक ग्रंथांची बरीच मोठी संख्या असून त्यापैकी प्रख्यात ग्रंथांची अरबी भाषेत भाषांतरे झाली आहेत. या भाषांतर ग्रंथामध्ये वैद्यकशास्त्राच्या **शस्त्रक्रियेसुद्धा** सर्व **शाखांचा उहापोह** आहे. तसेच बिनचूक निरीक्षण आणि सप्रमाण, यथान्याय व यथाशास्त्र औषध योजना दिलेल्या आहेत."

– **प्रो. विल्सन**

४१ स्वदेशी पुनरागमन

"प्राचीन आर्यावर्तातून मुसलमान लोकांनी वैद्यक शास्त्राचे ज्ञान स्वदेशी नेले होते. ते त्यांनी हिंदुस्थानावर स्वारी करून येथे राज्य करण्यास आल्यावर परत आणले. मध्यंतरी पुष्कळ शतके या ज्ञानाचा लोप झाल्यासारखा वाटत असे. परंतु मुसलमानांच्या आगमनाने ते ज्ञान परत स्वदेशी आले."

– **लॉर्ड आम्थिल मद्रास गव्हर्नर** (२००)

४२

मागमूसही राहिला नाही

"युरोपखंड अगदी रानटी स्थितीत होते. त्यावेळी हिंदुस्थानात उपचारात्मक व प्रतिरोधात्मक दोन्ही पद्धतींची औषधे तयार करण्याची तत्त्वे सर्वत्र मशहूर झाली होती. वैद्यकशास्त्र हिंदुस्थानात तयार होऊन नंतर त्याचा प्रवेश युरोपात झाला ही गोष्ट सर्वास अवगत आहे की नाही कोण जाणे! परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, युरोपातील वैद्य १७ व्या शतकापर्यंत आरबी ग्रंथावरून हे शास्त्र शिकत व स्वतः अरबांनी ते हिंदुस्थानातून नेले होते. प्राचीन सुधारणा पूर्वेकडून पश्चिमेस गेली असता त्या सुधारणेच्या जन्मभूमीत–आर्यावर्तात तिचा मागमूसही करू नये हे केवढे आश्चर्य!"

– लॉर्ड ॲम्थिल मद्रास गवर्नर (१९५)

४३

शिष्याने गुरूस शिकविले

"मध्यंतरीच्या अवनतीच्या काळात भारतातील सर्व लोकहितकारी गोष्टी नष्ट झाल्या, त्यांचा अवशेष देखील शिल्लक राहिला नाही. त्यामुळे–हिंदुस्थानातील लोकास त्या नवीन वाटत असून ब्रिटिश अमलाबरोबर आलेल्या पुष्कळ गोष्टीबरोबर वैद्यकशास्त्रही ब्रिटिशांनी आणले असे वाटते– परंतु खरी गोष्ट अगदी उलट असून **शिष्यावर गुरूस शिकविण्याची पाळी आली आहे एवढेच नवीन आहे.** काळाच्या असंख्य लोलांपैकी ही एक आहे, यापेक्षा दुसरे काय?"

– लॉर्ड आम्थिल

४४ अवनतीचा फेरा

"इतिहासकार व प्राचीन वस्तु संशोधक यांच्या परिश्रमाने या गोष्टी प्रकाशात येऊन प्राचीन भारताचे ज्ञानवैभव केवढे होते–पण अवनतीच्या फेऱ्यात सापडल्यामुळे किती हानी होते–समर्थाचे पदरी केवढा दीनपणा येतो, या सिद्धान्ताचे स्पष्टीकरण पहावयास मिळते."

"या जगात नवीन असे काही नाही. हल्ली जे आहे ते प्राचीन काळी होते फक्त स्वरूप भिन्न असेल अथवा लौकिक ज्ञान समजूत सर्वसामान्य नसेल एवढाच फरक. सर्वस्वी नवीन असे कोठेही आढळणार नाही. यांच तत्त्वाचे सत्यत्त्व रोग-प्रतिबंधक पद्धतीत दृगोचर होते."

– **लॉर्ड ॲम्थिल मद्रास गव्हर्नर**

४५ गणित शास्त्र

"भारतीयांचे प्राचीन गणितशास्त्र इतके पूर्णावस्थेस पोचले होते व ज्योतिषविषयक गणित तर ते इतके बिनचूक करीत की सूर्य चंद्राचे गमनमार्ग व गति ही त्यांनी अचूक मापली होती." – **जन. कनिंगहॅम शिखांचा इतिहास**(भा श्रे १२)

४६ लिपी व दशांश पद्धती भारताचीच

"मनुष्याने आजपर्यंत जे जे शोध लावले त्यापैकी लिपीचा शोध पहिल्या प्रतीचा असून त्याच्या खालोखाल दशांश पद्धतीचा आहे, असे इतिहासकारांनी मानलेले आहे. यापैकी लिपीप्रमाणेच दशांश पद्धतीही हिंदूचीच कल्पना आहे असा सर्वसंमत सिद्धान्त आहे." – **श्लेजेल जर्मन चिकित्सक** (२०३)

४७ विज्ञानातही भारताचे जगावर ऋण

"विज्ञान शास्त्रातसुद्धा युरोपखंड भारतभूमीचे अत्यंत ऋणी आहे. अंकपद्धतीचा फार मोठा शोध प्रथम लावून आर्यांनी जगावर उपकार केलेले आहेत. कारण ही पद्धत जगाने भारतापासून उचललेली आहे."

"त्यानंतर मोजमापाच्या दशांशपद्धतीसुद्धा भारतीयांनीच शोधून काढली हिचा परिणाम केवळ गणितशास्त्राच्या वाढीवर झाला नसून जगातील सर्व सुधारणेवर व संस्कृतींवर झालेला आहे. या गोष्टीची थोरवी मानावी तेवढी थोडीच होणार आहे.

आठव्या व नवव्या शतकात हिंदूंपासून अरबांनी ही शास्त्रे स्वदेशात नेली नंतर ती अरबांबरोबर पाश्चात्य राष्ट्रात आली. याच कारणाने बीजगणितास अरबी नाव मिळाले– पण त्याची खरी उत्पत्ती हिंदुस्थानातच आहे" – **प्रो. मॅकडोनल.**

४८ भूमितीची ज्योतिर्विषयक कोष्टके

"हिंदुस्थानात भूमितीच्या साह्याने तयार केलेली ज्योतिर्विषयक कोष्टके होती. परंतु ती केव्हा तयार झाली याचा अंदाज लागत नाही.– फार प्राचीन काळी प्रत्यक्ष वेध घेऊन ती तयार केलेली असावीत व तो प्राचीन काल म्हणजे खिस्तापूर्वी ३ हजार वर्षांचा असला पाहिजे."

– **बेली** वगैरे विख्यात ज्योतिर्विद (२०६)

४९ त्रिकोण–वर्तुळ

"त्रिकोणाचे क्षेत्रफळ त्याच्या बाजूंनी व्यक्त करता येते– ही हिंदूंस पूर्ण अवगत असलेली गोष्ट क्लॅवियसने युरोपात

प्रसिद्ध करीपर्यंत कोणास माहीत नव्हती.

त्याप्रमाणे त्रिज्या व परीघ यामधील परस्पर प्रमाण हिंदुलोक ज्या मापनाने मोजीत ते हल्लीच्या नवीन पद्धतीनेही तंतोतंत जुळते.

गेल्या शतकापर्यंत या गोष्टी युरोपियनास माहीत नव्हत्या त्याच हिंदुलोकास हजारो वर्षांपूर्वी माहीत असाव्या– यापेक्षा त्यांची श्रेष्ठता सिद्ध करण्यास आणखी कोणता पुरावा पाहिजे?"

– **एलफिस्टन** (२०६)

५० भास्कराचार्यांची बीजगणिताची रीती

एडिम्बरो रिव्हू या मासिकातील माहिती—

" AX^2+B (अक्ष२+ब) ही पूर्ण वर्गात्मक संख्या 'क्ष'च्या कोणत्या किमतीने होईल?" या प्रश्नाचा मजेदार इतिहास—

डायफॅन्टस् याने हा प्रश्न सोडविण्याचा थोडाफार प्रयत्न केला. नंतर **फरमाट** Feremat याने १७ व्या शतकात त्याच पद्धतीत आणखी फरक करून तो प्रश्न इंग्रजी बीजगणित तज्ञाकडे पाठविला. शेवटी त्याचे समाधानकारक पूर्ण उत्तर प्रख्यात **यूलर** Euler या गणिततज्ञाने दिले.— परंतु शेवटी यूलरची आणि भास्कराचार्यांची रीत एकच आहे असे आढळून आले."

पुढे त्याच मासिकाच्या २९ व्या भागाच्या १५३ पानावर असे म्हटले आहे की—

भास्कराचार्यांनी जे उत्तर दिले आहे तेच **लॉर्ड ब्रॉंकर** याने इ. स. १६५७ साली स्पष्ट करून सांगितले. आणि त्याच

प्रश्नाचे सामान्य उत्तर १७६७ साली **डीलाग्रांज** याने दिले. ते **ब्रह्मगुप्त** याने दिलेल्या उत्तरापेक्षा मुळीच निराळे नाही."

– एडिम्बरो रिव्ह्यू (२०९)

बीजगणित रीतीचा सोपेपणा

५१

"हिंदू व ग्रीक बीजगणिताच्या विद्वानांत जो फरक आहे तो नवीन शोधांच्या बाबतीत नसून रीतींच्या सोपेपणात आहे. हिंदूंची बीजगणितातली सोपी आवडती रीत होती तिचा इ. स. १६२४ पर्यंत जगास पत्ताही नव्हता. ती प्रथम **बाचेट डी मेझेरिक** याने युरोपात प्रसिद्ध केली. यूलरनेही हिचाच अंगीकार केलेला होता." – एलफिस्टन् (२०९)

वैदिक गणित सूत्रे

५२

जगन्नाथपुरीचे शंकराचार्य श्री भारतीकृष्ण तीर्थ यांनी वैदिक गणिताची १६ सूत्रे तयार केली आहेत. तिचाही प्रसार इंग्लडमध्ये सुरू झाला आहे हेही लक्षणीय आहे. ती फार सोपी असून मोठमोठी कूट गणिते चटकन सोडविण्यास त्या सूत्रांचा उपयोग होतो. – विश्वपुनर्निर्माण संघ, तेलंखेडी नागपूर.

व्याकरण

५३

वेदांवरील स्वरबोधक "प्रातिशाख्य" शास्त्र आहे. प्रो. विल्सन प्रातिशाख्यासंबंधाने म्हणतो—"इतर कोणत्याही राष्ट्राच्या वाङ्मयात मानवी भाषाशास्त्राच्या स्वरूप-लक्षणाचे इतके सूक्ष्म, व्यापक, खोल, आणि विस्तृत विवेचन झालेले नाही. जसे–(१) स्वरशास्त्र (२) स्वर व व्यंजनांचे वर्गीकरण.

(३) शब्द व्युत्पत्ति (४) शब्दजातिभेद वगैरे."
– प्रो. विल्सन (१३५)

५४ युरोप २५०० वर्षे मागे

आग्रा कॉलेजचे मुख्याध्यापक व प्रसिद्ध शब्दव्युत्पत्ति शास्त्रज्ञ थॉमसन यांच्या मते–" संस्कृतातील व्यंजनव्यवस्था अपूर्व असून मानवी बुद्धिमत्तेच्या विलासाचा तो एक उत्कृष्ट मासला आहे. युरोप या बाबतीत अशा विज्ञानशास्त्र प्रकर्षाच्या २५०० वर्षे मागे आहे व सर्व ध्वनींची वाचक अशी अक्षरे इंग्लिश भाषेत नाहीत." – थॉमसन (१३६)

" आर्यांच्या शब्दव्युत्पत्तिशास्त्राने तर इतर प्राचीन व अर्वाचीन राष्ट्रांवरही मात केली आहे." – रेव्हरंड वॉर्ड.

५५ पाणिनीचे भव्य प्रासाद मंदिर

" पाणिनीचे ग्रंथ उघडताच असे वाटते की आपण एखाद्या भव्य प्रासादात शिरलो आहो. त्या भव्य मंदिराच्या द्वारतोरणावरील कर्त्याचा नामलेख पाहिला म्हणजे मन क्षणभर आश्चर्याने व कौतुकाने भरून येते. भाषासृष्टीतील सर्व प्रसंगाचे यथायोग्य व समर्पक स्पष्टीकरण केलेले पाहून त्या पुरुषाची आश्चर्यकारक कल्पकबुद्धि व साधनसामुग्रीचे सखोल व परिपूर्ण आकलन याविषयी पूर्ण खात्री पटते. व मनावर त्याच्या बुद्धिप्रकर्षाबद्दल सकौतुक आदराचे फार वजनदार दडपण पडते." – प्रो. वेबर (१३६)

५६ प्रयत्न व कल्पकतेची परमसीमा

१) विधानांचा बिनचुकपणा २) धातुपृथक्करणाची

परिपूर्णता आणि ३) शब्द घटनातत्वांची शुद्धता या तीन बाबतीत जगातील सर्व व्याकरण ग्रंथात पाणिनीचा ग्रंथ अत्यंत श्रेष्ठ आहे. कित्येक ठिकाणांची थोडी दुर्बोधता सोडून दिली तर बीजगणितासारखी परिभाषा निर्माण करून आपल्या ग्रंथात जो **खोचदार संक्षिप्तपणा** आणला आहे, **तो तर केवळ निरूपम** आहे. मानवी प्रयत्नाने व कल्पकतेने केवढी उज्वल कामगिरी करता येते याचे संस्कृत भाषेतील सर्व गोष्टींचा तार्किक पद्धतीने जो मेळ घालून दिला आहे, त्यावरून प्रत्यंतर येते." **–सर हंटर** (१३६–१३७)

५७ आर्यांचा हात धरण्याचे साहस नाही

व्याकरणातील पृथक्करण व मानवी भाषाशास्त्र तत्वांची मांडणी" या दोन बाबतीत **प्राचीन आर्यांचा हात धरण्याचे साहस** व योग्यता कोण्याही अर्वाचीनाच्या अंगी नाही.

– प्रो हंटर व मॅक्समूलर (१३७)

५८ कोशग्रंथ

प्राचीनकाळी संस्कृत भाषा किती परिणतावस्थेस पोचली होती हे कोशग्रंथावरून स्पष्ट दिसून येते. आणि त्याबद्दल हिंदू विद्वानलोक अत्यंत थोर आदरास पात्र आहेत.

– रेव्हरंड वार्ड (१३८)

५९ रामायण आणि ग्रीक महाकाव्ये

मोनियर विल्यमसारख्या आंग्लपंडिताने असे म्हटले आहे की "या दोन ग्रीक महाकव्यांना रामायण व महाभारत यांच्या पंक्तीस केव्हाच बसविता येणार नाही.

त्यांची व यांची तुलना करणे, म्हणजे नगाधिराज हिमालयातील बर्फाच्छादित प्रदेशात उगम पावून ठिकठिकाणी लहान मोठ्या नद्यानाल्यांच्या संयोगाने विस्तृत होणाऱ्या, काही ठिकाणी अफाट उथळ पात्रातून वाहणाऱ्या, तर कित्येक ठिकाणी भिन्न दिशांकडे जाणाऱ्या, खोल, अनेक प्रवाहात रूपांतरित होणाऱ्या 'गंगा' 'यमुना' या सारख्या महानद्यांना व 'अँटिका' आणि 'येसाली' प्रांतातील डोंगरी ओढ्यांना एकाच मालेत ओवण्यासारखे आहे."

"अत्यंत विशुद्ध भावनेशी पूर्ण परिचय इत्यादी गुणांनी जगांतील कोणत्याही भागात कोणत्याही काळी निर्माण झालेल्या अत्यंत सुंदर व मनोरम काव्यामध्ये रामायणाची योग्यता फारच मोठी आहे. निसर्गप्राप्त वाढीने भरारलेल्या व विस्तारलेल्या उपवनांची उपमा रामायणास दिल्यास खरोखर काही वावगे होणार नाही. गोड व सुंदर उपदेशपर श्लोक हीच कोणी अच्छोदकाची सरोवरे व परस्परान्वयी विस्तृत व उदात्त कथाभाग ही सर्व वृक्षराजी; अशाप्रकारे ही उपमा किती तरी सार्थ होणार आहे. बरे रामचरित्र तर किती उत्तम रीतीने रेखाटले गेले आहे—रामचरित्रात पहिलेपासून अखेरपर्यंत जे निस्वार्थी वर्तन दृगोचर होत आहे. त्यावरून त्याची मानुषी जीवनक्रमाबद्दल मनात मोठी शंका येऊन हा खरोखर परमेश्वरी अंश असला पाहिजे अशी मनाची समजूत होते. त्याच्या अतिमानुष कृत्यांनी कधी कधी आमच्या मनाची मोठी चमत्कारिक स्थिती होऊन काही वेळ तर मन केवळ भांबावून जाते, परंतु असे प्रसंग फार वेळ टिकत नाही. निदान पूर्व भागात तरी एखाद्या शूर उदारमनस्क पवित्र व सदगुणी मनुष्यापेक्षा कवीने जास्त असे रामचरित्रात

मुद्दामच दाखविले नाही. आज त्यांचे प्रेम, शौर्य, औदार्य निर्लोभता, पित्राज्ञाप्रामाण्य, विमल पत्निप्रेम, सहोदर प्रेम व क्रोधमय विचारांचा पूर्ण अभाव इत्यादी गुणांची मात्र जितकी तारीफ करावी तेवढी थोडीच होणार आहे. आपल्या सापत्न मातेच्या क्रोधास जेव्हा राम बळी पडतो तेव्हा त्याच्या मुखावाटे एकही रागाचा शब्द निघत नाही. जेव्हा त्याचा पिता त्यास वनवासात पाठवण्याचे ठरवितो, तेव्हा तो हूं का चूं सुद्धा करीत नाही. आपल्या पित्याच्या माथी प्रतिज्ञभंगाचे पाप येण्यापेक्षा आपल्या स्वतःच्या सुखाची होळी करण्यास तो तयार होतो. व सीतेविषयी तर बोलावयासच नको; कारण ती केवळ गृहलक्ष्मीच होय व तीजमध्ये सद्‌गुण मूर्तिमंतच अवतरले होते असे दिसते."

– विलीयम मोनियर (१४२)

६०

महाभारताची थोरवी

डॉ. हेंसलर नामक अमेरिकन पंडित म्हणतो की, "दैवी स्फूर्तीने भारलेले प्राचीन आर्यावतातील अत्यंत थोर महात्मे यांनी जो महाभारत नामक ग्रंथ निर्माण केला आहे, तो इतका थोर ग्रंथ आजपर्यंन्त माझ्या पाहण्यात दुसरा नाही. व माझ्या पूर्व आयुष्यातील अनुभावावरून मी असे म्हणतो की, या ग्रंथाने मला जितके वेड लावून सोडले आहे, तितके वेड मला इतर कोणत्याही ग्रंथाने पूर्वी लागले नाही. या ग्रंथाचा अहर्निश अभ्यास करून मी त्यातून एक हजारावर उतारे घेऊन माझ्या पुढील आयुष्यातील अभ्यासाकरिता मांडणी केली आहे."

"महाभारत म्हणजे एक अभिनव सृष्टीच आहे असे मला वाटते व त्यातील सत्पक्षप्रीती, ज्ञान, चातुर्य व सत्य इत्यादी

गुणसमुच्चयाचे वर्णन वाचून तर मी अगदी तल्लीन होऊन जातो. परंतु एवढ्यानेच त्याचा मोठेपणा संपला असे नाही. तर माझ्या मताने परमात्मा व जगदुत्पत्ती या संबंधी जे काही सिद्धान्त बांधले होते, तेच या ग्रंथात सुंदर व स्पष्ट भाषेत सांगितलेले पाहून मला या ग्रंथाबद्दल फारच आदर वाटू लागला व याची थोरवी किती गाऊ अन् किती नाही असे मला होऊन गेले आहे."

– डॉ. हेंसलर (१४३)

६१ साऱ्या जगाचे कल्याण करणारे महाभारत

बाबू पी. सी. रॉय यांनी मोठ्या नेटाने महाभारताचे इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध करण्याचे काम चालविले होते व त्यावेळी त्यास अमेरिकेतून **जेरेमिआकर्टीन** नामक मानव वंशशास्त्राकडून असे पत्र आले की "महाभारताचे २४ भाग मी साद्यंतपणे व काळजीपूर्वक नुकतेच वाचून संपविले आहेत. व त्यावरून माझी खरोखरच अशी समजूत झाली आहे की, या ग्रंथाइतका श्रेष्ठ ग्रंथ दुसरा नाही; व यापासून मला जेवढा आनंद झाला तेवढा इतर कोणत्याही ग्रंथामुळे आजन्मात झाला नाही. आर्यांच्या बुद्धिमत्ते विषयी व खऱ्या शीलाविषयी या ग्रंथवाचनाने सर्व लोकांच्या नेत्रात चांगलेच अंजन पडेल. तुम्ही जे कार्य हाती घेतले आहे त्यायोगे केवळ हिन्दुस्थानचेच कल्याण होईल असे नाही, तर सर्व आर्य वंशाचे कल्याण होणार आहे. महाभारत ही एक फार विशाल खाण आहे व तीमधील संपत्तीचा अदमास अजून जगाला लागलेला नाही. यातील रत्ने जशजशी बाहेर येतील तसतसे याचे महत्व जगास कळू लागल. या ग्रंथातील माहितीने आर्यआर्यांचा इतिहास कळावा

अशी ज्यास तीव्र लालसा आहे त्यांचे समाधान होईल! व दीन दुबळा मानव आणि अत्यंत शक्तिमान सर्वव्यापी परमात्मा यांचे काय नातें आहे याचाही बोध स्पष्टपणे यावरून होणार आहे. **–जेरेमीआकर्टीन वंशशास्त्रज्ञ** (भा. श्रे १४४)

६२ व्यास आणि होमर

१८८६ च्या सप्टेंबरच्या अंकात **सानूहिलेर बार्थोलेमी** नामक एक फ्रेंच मासिककार म्हणतो की, "सुमारे १००० वर्षां पूर्वी विल्किन्स नावाच्या गृहस्थाने महाभारतातील काही वेचे छापून प्रसिद्ध केले, आणि भगवद्गीतेच्या प्रसंगाने या प्रचंड ग्रंथाचा परिचय जगास करून दिला. या ग्रंथाचा भव्यपणा ऐकून सर्व पाश्चात्य जग थक्क झाले. होमर हा महाभारतकार व्यास यांजपुढे क:पदार्थ आहे, असे सर्व लोक मानू लागले व आर्यावर्त ग्रीसपेक्षा श्रेष्ठ आहे अशी सर्वांची खात्री झाली." **–सानूहिलेर** (भा. श्रे.१४४)

६३ प्लेटोपेक्षा व्यासांचा मोठेपणा

भरत खंडांत विद्वानांचे तत्वज्ञान सामान्य जनसमूहाचे धर्मकल्पनात पूर्णपणे मिसळून गेले आहे. ईश्वराचे एकमेवाद्वितीयत्व व सृष्टिकर्तृत्व, आत्म्याचे अमृतत्व व जीवांची कर्मबद्धता ही भारतीय तत्वज्ञानातील चार मूलतत्वे सामान्य लोकांच्या धर्माचीही मूलतत्वे बनली आहेत. ज्या पुनर्जन्मतत्त्वाचा **मोझेसने** मुळीच उल्लेख केलेला नाही. किंवा केला असेल तर फारच संदिग्ध व अस्पष्ट केला आहे. तसेच ईश्वराचे जे एकत्व व सर्वशक्तिमत्व अनेक देवतावादी ग्रीक व रोमन सामान्य जनसमूहास किंवा दैवी भिथ्रेइक धर्मशास्त्रकारासही

अज्ञात होते ते तत्त्व गंगानदीतीरावरील ऋषींनी भरतखंडातील सगळ्या जनतेस पूर्वीच पटविले होते. शिवाय पापाचरणाबद्दल फार भयंकर शासन होते. हा सिद्धांत सामान्य जन समूहाचे मनात ठसवून त्यांची पापभीरुता जाज्वल्य राखण्याचे कामी व्यासांनी प्लेटोवरही ताण केली आहे." —प्रो. हिरेन

६४ सर्व ज्ञानशाखात सुसंपन्नता

प्रो. हिरेन यांनी असा अभिप्राय दिला आहे की "संस्कृत वाङ्मय शास्त्रीय विषय, गद्य आणि पद्य या सर्व शाखांतही सुसंपन्न आहे." —**प्रो. हिरेन** (भा. श्रे.)

६५ आयुष्य पुरणार नाही

"भारतीय वाङ्मयाच्या एक दोन शाखांचे संपूर्ण अध्ययन करू म्हटले तरी त्यास एक जन्माचे संबंध आयुष्य पुरे होणार नाही." — सर **विल्यम जोन्स**

"ज्यांची हस्तलिखिते सांप्रत उपलब्ध आहेत असे संस्कृत भाषेत दहा हजार निरनिराळे ग्रंथ आहेत." असा **मॅक्स मूलर** यांनी हिशोब केला आहे.! "ग्रीस व रोम या दोन्ही देशांचे सर्व प्राचीन वाङ्मय एकत्र केले तरीही येवढी ग्रंथसंख्या भरणार नाही." —**मॅक्समूलर**

(India what can it teach us ? पृ ८४)

(आज पाहिले तर जर्मनी व इंग्लंडमध्ये ३ लाखांच्या वर भारतीय ग्रंथ सुरक्षित असून यांचा अभ्यास चालू आहे.)

६६ भारतीय हार जाणारे नाहीत

"भारतीयांत बहुतेक प्रत्येक शास्त्राचे अध्ययन चालू होते. असे त्यांचे वाङ्मयावरून दिसून येते. शिवाय त्यांची

त्या त्या विषयाची प्रतिपादन शैली पाहिली तर विद्वत्तेत ते कोणत्याही लोकांस हार जाणारे नाहीत. याचाही प्रत्यय येतो. त्यांचे तत्वज्ञान विषयक वाङ्‌मय व धर्मशास्त्रे यांचे जसजसे परिशीलन करावे तसतशी त्यांच्या विद्वत्तेची व शहाणपणाची खात्री पटत जाते." – रेव्हरंड वार्ड

Antiquity of Hinduism VOL. IV (१२९)

६७ बुद्धीचा शेवटचा पल्ला

"मानवी मन व बुद्धि यांची मजल जेथपर्यंत पोचणे शक्य आहे. तेथपर्यंतचा पल्ला भारतीयांच्या मन बुद्धीने खास गाठला आहे." – मिसेस मॅनिंग.

(Ancient and medieval India Vol. II पृ १४८)

६८ सूर्य आणि काजवा

"हिंदूंच्या विचारात तडफ, भारदस्तपणा व विशुद्धता फार आहे. ग्रीक लोकांना ज्या ज्ञानाबद्दल फार अभिमान वाटतो तो हिंदूंच्या ज्ञानापुढे केवळ फिक्का पडल्यावाचून राहाणार नाही. आणि या दोघास सूर्य व काजवा यांचीच उपमा शोभेल." – श्लेजेल (१७३)

६९ भारत सर्व जगाच्या गुरुस्थानी

"राष्ट्रात जिकडे तिकडे शांतता असून धनधान्याची समृद्धि आहे. काही ठळक ठळक कुटुंबाजवळ विपूल संपत्ती साठलेली आहे, सर्व लोकांनां विद्या व कला यांचे ज्ञान होण्यास लागणारी विद्यालयें व विद्यापीठे भरपूर आहेत. अशा स्थितीत पोटाकरितां अहर्निश झटणाऱ्या लोकसमूहा-

मधून थोड्यांना विद्या–कला अशासारख्या गोष्टीकडे लक्ष देण्यास सवड मिळते. व त्यांतूनही काहींना त्यांचा ध्यास लागलेला असतो. अशा अल्पसंख्येतून भावी तत्वज्ञानी व सर्व जनांच्या चित्तांना अल्हाद व शांती देणारे तत्वज्ञान निर्माण व्हावयाचे असते. हाच नियम जर हिंदुस्थानात लावला तर तो पूर्णपणे खरा ठरलेला पाहावयास मिळतो. आणि येथील जगविख्यात तत्त्वज्ञान्यांची मोजदाद केल्यास वरील नियमान्वये **हिंदूस्थान सर्व जगाच्या गुरुस्थानीच शोभेल यांत कांही संशय नाही.**" **– मॅक्समूलर**

(भा. श्रे. पा. क्र. १७२)

❖ ❖ ❖

याप्रमाणे आपण आपल्या प्राचीन विश्वव्यापिनी संस्कृतीवर पाश्चात्य विद्वानांनी उधळलेल्या स्तुतिसुमनांच्या सुगंधाने आणि वर्षावाने सुखावतो यात संशय नाही. आपल्या प्राचीन "उत्कर्षबोधक इतिहासाचा" ज्याप्रमाणे पाश्चात्यांनी अभ्यास केला त्याप्रमाणे आपण भारतीयांनी देखील आपल्या पूर्वजांचा इतिहास "आदरबुद्धीने–श्रद्धेने–डोळसपणे आणि मुख्यत: समन्वयात्मक रीतीने" अभ्यासिला पाहिजे.

पुराणादि तात्त्विक इतिहास

आपल्या पूर्वजांनी लिहिलेल्या इतिहासाचे दोन प्रकार आहेत (१) केवळ **व्यक्तिनिष्ठ इतिहास** म्हणजे राजतरंगिणी. विजयविलास, रासमाला, बखरी वगैरे सारखे २–४ हजार वर्षातले इतिहास आणि (२) दुसरा प्रकार म्हणजे रामायण–महाभारत–हरिवंश–पुराणे–बुद्ध चरित्र–महावीर चरित्र वगैरेतून मनोवेधक रीतीने सांगितलेला व्यक्तिनिष्ठ, तात्त्रिक आणि परमेश्वरीय इतिहास यातून महापुरुष–महात्मे–राजे यांच्या वंशावळी मिळतात आणि त्यांच्या कथानकाद्वारा सत्वगुणबोधक शिक्षणही मिळते. **सुसंस्कारांचे दान म्हणजे शिक्षण**" या महाराजांच्या व्याख्येनुसार,समाजातील सर्व थरातील लोकांची सत्त्ववृद्धी करण्यासाठी– त्यांना सुसंस्कार संपन्न करण्यासाठी– त्या सर्व ऐतिहासिक प्रसंगांची मांडणी रंजक रीतीने केलेली आहे. (३)पुराणादिकात निसर्गातील वृक्ष प्राणी यांच्याही कथा आल्या आहेत. त्यांचाही उपयोग शिक्षणाकडेच होतो. त्यांना मात्र श्री गुलाबराव महाराजांनी **'तात्त्विक इतिहास'** म्हणून संबोधिले आहे. आणि त्यांचा अभ्यास करण्यासाठी काही वेगळे निकष सांगितले आहेत.

"खरा इतिहास कोणता ? आणि कोणत्या इतिहासावर विश्वास ठेवावा वगैरे व्यक्तिनिष्ठ इतिहास संबंधीचे नियम आणि इतिहासाचा संदिग्धपणा" — पुराणादि जे तात्त्विक

इतिहास आहेत त्यांना लागू होत नाहीत हे त्यांनी युक्तिवादपूर्वक दाखवून दिले आहे.

व्यक्तींच्या इतिहासाला मात्र वरील नियम लागू होतात. पुराणादिकांना महाराजांनी तात्विक आणि परमेश्वरीय इतिहास म्हटले असून त्यावर 'पुराण मीमांसा' नामक संस्कृत सूत्रग्रंथ लिहून पुराणांची सामान्यसत्ता प्रतिपादन केली आहे. त्यामुळे पुराणादिकांतील किंवा महाभारतातील कोल्ह्याकुत्र्यांच्या गोष्टी किंवा वाऱ्याचा व सावरीझाडाचा झगडा, इत्यादी गोष्टी देखील सामान्य दृष्टीने खऱ्या मानल्या आहेत. पण त्यात स्थलकालाचा संयोग सापडत नाही व इतिहासात सापडतो एवढाच दोहोत फरक आहे. म्हणून "त्यावरही विश्वास ठेवावा" असे महाराजांनी आपले मत मांडले आहे.[७] या मताचे पुष्टीकरण वेदान्तातील दृष्टिसृष्टिवादानुसार आणि परमेश्वराच्या किंवा ऋषीमुनींच्या सत्यसंकल्पत्वाच्या सिद्धान्तानुसार केले आहे. एकूण काय तर सर्व समाजावर सुसंस्कार करण्यासाठी तात्त्विक इतिहासाचा आणि परमेश्वरीय इतिहासाचा आपल्या देशात आजपावेतो उपयोग होत होता व पुढेही होण्यासारखा आहे.

आपल्या संस्कृतीत पूर्वी विद्याभ्यासाला मर्यादा होत्या त्यामुळे गुरुकुलात जाऊन शास्त्राभ्यास करणारे लोक फार कमी होते. सामान्य माणूस आपला परंपरागत व्यवसाय शिकत असे आणि उपजीविका करीत असे. अशा समाजावर धर्म नीती वगैरेचे सुसंस्कार करण्याचे कार्य पुराणिक, कीर्तनकार वगैरे करीत. गावागावातील मंदिरात रात्रौ प्रवचने असत. पुराणकथा विस्ताराने सांगितल्या जात आणि

कीर्तने होत. या कीर्तनात संगीत, नाट्यमयता आणि उद्बोधन सारेच काही असल्यामुळे मनोरंजन आणि धर्मनीतीचा संस्कार म्हणजे सुशिक्षण – समाजातील सर्व थरांना मिळत असे. त्यामुळेच आपली हिंदू संस्कृती हजारो वर्षापासून नीतिमान् आहे– सत्वप्रवृत्त आहे आणि धार्मिक आहे. मुसलमानांचे हजार वर्षे राज्य असूनही हिंदूंचे भावविश्व कधी उध्वस्त झाले नाही. विद्याव्यासंग कमी झाला नाही. चांगल्याला चांगला म्हणून स्वीकारण्याची प्रवृत्ती नष्ट झाली नाही. त्यागाला लोकमानसात सन्मान होता. स्वार्थ प्रत्येकालाच हवा असतो तरीही धर्मनीतीच्या सिंहासनावर त्यागच अधिष्ठित होता. आणि सारे टिकून राहण्यासाठी तात्त्विक आणि परमेश्वरीय इतिहास कीर्तन प्रवचन पुराणादिकातून समाजाला शिकविला जाई त्यामुळे समाजमानसावर सुसंस्कार होऊन हिंदूंची समाजव्यवस्था चांगल्या रीतीने टिकून राहिली. कांही अपवाद आणि थोडेफार दोष कोणत्याही पद्धतीने निर्माण होतात. परंतु त्यातल्या त्यात कमी दोष असलेली आणि सद्गुणांचा विकास करणारी, समाजातील प्रत्येक घटकाला सत्प्रवृत्त करणारी जीवनपद्धती, हिंदुचीच आहे. हे आता जडवादी पाश्चात्य विद्वानही स्वीकारू लागले आहेत. यातच हिंदू संस्कृतीची नित्यनूतनता आहे.

इतिहासाची मर्यादा

इतिहासाचा अभ्यास करताना इतिहासाच्या मर्यादाही लक्षात ठेवणे आवश्यक आहे असे महाराजांना वाटते. त्यांनी

इतिहासाच्या मर्यादेसंबंधी एक महत्वाचा विचार मांडला आहे. इतर ठिकाणी इतिहासविषयक सूक्ष्म विवेचन करून इतिहासाचे श्रेष्ठत्व जसे प्रतिपादन केले आहे तसे त्यातील उणीवाही मोजक्या शब्दात त्यांनी दाखविल्या आहेत.

प्र.– शास्त्र येत असूनही त्यातील रहस्य कोणाला समजत नाही ?[८]

उ.– त्यातील भाषेवर किंवा इतिहासावर ज्याचा भर असतो त्याला.

हे साधुबोधाचे मार्मिक उत्तर पाहून महाराजांच्या नीर-क्षीर विवेकाची कल्पना येते. इतिहास हुडकून काढण्यासाठी विद्वान लोक पुराणांचा अभ्यास करतात, रामायण महाभारतांचा अभ्यास करतात, गीता, ज्ञानेश्वरी, दासबोध वगैरे उत्तमोत्तम ग्रंथांचा अभ्यास करतात पण लक्ष ठेवतात केवळ त्यातील इतिहासाकडे किंवा भाषेकडे! त्यामुळे अभ्यासू असूनही ग्रंथकाराचे हृद्गत ते ओळखू शकत नाहीत. म्हणून इतिहासाचा अभ्यास करताना इतिहासाच्या मर्यादा लक्षात ठेवणे आवश्यक आहे असे महाराजांना वाटते. याप्रमाणे इतिहासविषयक आर्यांच्या प्राचीन संकेतांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे भारतीय इतिहासाचा अभ्यास करताना बरेच अपसमज निर्माण झाले. तसेच, भारतावर आक्रमण करणाऱ्यांनी स्वतःचा धर्म आणि राज्य वाढविण्यासाठी दूरगामी परिणाम होतील अशा शैक्षणिक योजना आखल्या. त्यामुळे आपल्या इतिहासाची विकृती मुद्दाम करण्यात आली. त्याचे दुष्परिणाम आज आपल्या हिंदुसमाजाला भोगावे

लागत आहेत. म्हणून "आर्य" शब्दाचा अर्थ आर्यांचे गमनागमनाचे तथाकथित मतवाद आणि "आर्यसंस्कृतीची विश्वव्यापकता" या संबंधी पुनर्विचार करून खऱ्या सत्याचा शोध घेणे, ही भारतीय इतिहासाची मूलभूत गरज आहे.

आर्य = सुसंस्कृत मानव

आर्यसंस्कृतीचा विचार करताना प्रथम, आर्य या शब्दाचा अर्थ काय आहे आणि काय केला जातो, हे पाहिले पाहिजे. वेद, पुराणे, स्मृती, बौद्ध, जैन व काव्यादि सर्व संस्कृत-वाङ्मयातून किंवा भारतातील पाली प्राकृत भाषातून आर्य, दस्यू आणि दास हे शब्द आलेले आहेत. आर्यशब्दाची स्मृतीं-मधील व्याख्या पाहिली असता आर्य शब्द वैदिक व संस्कृतात कोणत्या अर्थाने वापरण्यात येत होता आणि येत असतो, ते अगदी स्पष्ट कळून येईल--

कर्तव्यमाचरन् कार्यं अकर्तव्यं अनाचरन् ।
तिष्ठति प्रकृताचारे स वै आर्य इति स्मृतः ॥[१]

'ऋ' धातू गतिवाचक आणि ज्ञानार्थी आहे म्हणून आर्य म्हणजे ज्ञानसंपन्न, पूज्य, श्रेष्ठ, असा अर्थ आहे. कर्तव्याचे आचरण करणारा, निषेधाला टाळणारा, धर्माचारण करणारा, व अज्ञानांधःकारातून ज्ञानाकडे जाणारा ("तमसो मा ज्योति-र्गमय") म्हणजे आर्य, असा श्लोकार्थ आहे.

यजनशील वर्ग म्हणजे यज्ञ करणारे लोक किंवा शिष्ठ असाही अर्थ वेदात प्रचारात आहे.

संस्कृत भाषेत पतीला आर्य किंवा आर्यपुत्र वगैरेंनी संबोधतात हे सर्वांना माहितच आहे.

सन्माननीय गृहस्थ वयोवृद्ध आणि शूद्र जातीचा जरी असेल तरी त्याला 'आर्य' म्हणून नाटकादिकातही संबोधिले जाते.

याप्रमाणे आर्यशब्दाचा गुणवाचक अर्थ वैदिक व संस्कृत वाङ्मयात सर्वत्र आलेला आहे. एकाही ठिकाणी वंशवाचक अर्थ चिटकविलेला नाही हे विशेष आहे. असे असूनही मॅक्स-मूलरने आर्य शब्दाचा "वंश" असा अर्थ मानला व लो. टिळकांनीही त्याला प्रमाण मानून आर्य वंशाची एक शाखा उ. ध्रुवावरून भारतात आली, असे प्रतिपादन केले. परंतु आर्य शब्दाचा विचार करतांना महाराष्ट्रीय ज्ञानकोशात डॉ. केतक-रांनी चार कसोट्या मांडल्या आहेत[१०]

चार कसोट्या

आर्य शब्दाला वंशवाचक ठरवावयाचे असेल तर—

१) "आर्य व दस्यु" या शब्दांचा पारमार्थिक अर्थ असलेले उतारे उपयोगाचे नाहीत.

२) "आर्य" या शब्दाचा "समाजातील शिष्ट वर्ग" हा अर्थ असलेले उतारे उपयोगाचे नाहीत.

३) जेथे आर्यास 'वर्ण' म्हटले असेल व जेथे 'वर्ण' या शब्दाचा "वर्ग वाचक" अर्थ असण्याची शक्यता असेल तसे उल्लेख उपयोगाचे नाहीत.

४) "दस्यूंचा संहार" या प्रकारच्या विधानांमध्ये रूपकाची भाषा असता कामा नये.

(खंड १)

या कसोटयानुसार वैदिक वाङ्मयात असलेले आर्य शब्दाचे सर्व उल्लेख तपासून पाहिले तर आर्य, दस्यु व दास हे शब्द एकाही ठिकाणी वंशवाचक आढळत नाही. उलट दस्यु हे आर्य वंशाचे शत्रू होते असे म्हणावे तर ऋग्वेद व अथर्ववेदामध्ये सूक्तकारांनी आर्य व दस्यु या दोघांचाही शत्रू म्हणून उल्लेख केला आहे व त्यांना जिंकण्याची इच्छा व्यक्त केली आहे.[११] आणि दस्यूला आर्य करण्याची शक्ती दे. अशा प्रार्थना केल्या आहेत.

दास आर्य होत असत

२. आसमंतमिद्रण: स्वस्ति शत्रुतूर्याय बृहतीममृध्राम् ।
यथा दासान्यार्याणि वृत्रा करो वज्रिन् सुतुकाना हषाणि ॥

अर्थ– हे इंद्रा, तू आम्हाला शत्रुनाशासाठी पुष्कळ व न संपणारी अशी शाश्वत संपत्ती दे. तिच्या योगाने दास आर्य होतील व शत्रू मारले जातील (दास आर्य होऊ शकतात.)

हे इंद्रा,आम्हाला अशी प्रतिभा दे की जीमुळे दस्यु देखील आर्य होतील आणि मानवाचे सर्व शत्रू नष्ट होतील.

(ऋग्वेद ६।२२।१०)

काळे आर्य

तसेच आर्य फक्त गौरवर्णीच होते, या म्हणण्यातही काही अर्थ नाही. कण्वऋषी काळे होते. इंद्र श्यामवर्णी होता. राम,

कृष्ण, व्यास वगैरे देखील कृष्णवर्णी असून त्यांना कोठेही अनार्य म्हटलेले नाही. याप्रमाणे प्राचीन वाङ्मयात आर्य, दस्यु व दास हे शब्द गुणवाचक वापरीत असत. वंशवाचक नव्हेत.

शूद्राला ऋषित्वाची प्राप्ती

"कवष ऐलूष" हे दासीपुत्र असूनही त्यांची विद्वत्ता पाहून त्यांस ऋषींनी आपणात समाविष्ट करून घेतले. मूळचे दास असूनही ऋग्वेदाच्या काही मंत्रांचे ते दृष्टाऋषी झाले. (ऐतरेय ब्राह्मण) तसेच सत्यकामजाबाल हेही यजुर्वेदाच्या एका शाखेचे प्रवर्तक ऋषी होते[१३] (छांदोग्य उपनिषद्) याप्रमाणे शूद्र पुरुष ब्राह्मणऋषी होऊ शकत असे, हे वैदिक वाङ्मयावरून स्पष्ट होते.

श्री गुलाबराव महाराजांनी देखील या मताचा विस्ताराने परामर्श घेतला आहे. पुरुषसूक्त, महाभारत व मनुस्मृती वगैरेचे आधार देऊन शूद्रवर्ण हा आर्यांचाच एक भेद आहे हे दाखवून दिले आहे.[१२]

देशक्षोभकारक उपपत्ती

आर्य लोक बाहेरून भारतात आले व येथील लोकांना जिंकून त्यांना दस्यु म्हणजे दास म्हणजे शूद्र केले म्हणून जातिव्यवस्था हा धर्मजुलूम होय– या आरोपावर महाराजांनी

स्वत: रोखठोक उत्तर दिले आहे. ते स्वत: जन्माने शूद्र असूनही त्यांच्या मनात ब्राह्मणांविषयी किंतु देखील येत नाही. ते म्हणतात–

"आर्य लोक बाहेरून आले ही उपपत्ती अलिकडेच निघाली आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्य हे तीन वर्ण आर्यांचे असून शूद्रवर्ण हा येथील मूळच्या दस्यू लोकांचा आहे, ही उपपत्ती मानणारे देशाचे पुढारी (लो. टिळक) म्हणवितात. परंतु त्यांच्या या उपपत्तीमुळे शूद्रांचा व ब्राह्मणांचा कायमचा द्वेष राहण्याची पाळी आलेली आहे. आर्यांनी आम्हाला कायमचेच गुलाम करून घेतले, असा समज, या उपपत्तीमुळे शूद्रांच्या मनातून कधीही नष्ट होणे शक्य नाही. कितीही सवलती दिल्या तरी, कायमचा कलह राहतो. शिवाय आम्हाल गुलाम करण्याकरताच वेदांचा अधिकार दिला नाही, ही समजूत या उपपत्तीमुळे दृढ होण्याचा संभव आहे."

पुढे महाराज म्हणतात, "शूद्रवर्ण हा आर्यांपैकी नाही हे म्हणणे देशक्षोभकारक आहे."

ही आर्यांच्या बाहेरून आगमनाची उपपत्ती व्यर्थ भेद-कारक असल्यामुळे मान्य करता येत नाही.

लोकमान्य टिळकांच्या मतासंबंधी बोलतांना महाराजांनी स्वत:कडे कमीपणा घेऊन पण कोणतीही भीती न बाळगता आत्मविश्वासाने स्पष्ट विवेचन केलेले आहे—

"आर्य बाहेरून आले या उपपत्तीचे उत्पादक राष्ट्रीय पक्षामुळे लोकांना मान्य (लोकमान्य) झाले आहेत. म्हणून त्यांच्यावर टीका करणाऱ्या माझा बहुजन उपहास करणार आहेत, हे मी जाणून आहे. पण धार्मिक दृष्टीने माझे म्हणणे बरोबर आहे, हेही मी जाणून असल्यामुळे बहुजनमताला मी भीत नाही."[१८]

म्लेच्छत्वाचे कारण

या विवेचनाला महाराजांनी महाभारतातील शांतिपर्वातील श्लोक प्रमाण घेतले आहेत. पूर्वी सर्वच आर्य होते पण क्रियालोप झाल्याने भारत सोडून बाहेरच्या जगातील सर्व आर्य समाज वृषलत्वाला प्राप्त झालेत. त्यातही पुन: धर्माचरण करणारा आदर्शभूत अशी एकही व्यक्ती दृष्टीस पडेनाशी झाली. इतका भयानक संस्कारलोप झाल्यामुळे पौंड्रक, यवन, शक, किरात, खश, चिनी वगैरे मूळच्या क्षत्रिय जाती म्लेच्छ झाल्या. (आजही क्रियालोप आणि संस्कार लोप झपाट्याने होत आहे, भारतीय लोकांचा धर्म सुटत आहे, हे आपण पाहतोच आहोत.) यावरून असे स्पष्ट आढळून येते की जगातील सर्व यच्चयावत् म्लेच्छ जाती देखील मूळच्या आर्यच होत्या पण कर्मत्यागामुळे म्लेच्छत्वाला प्राप्त झाल्यात.

याप्रमाणे महाराजांनी जगातील सर्व जातीजमातींचे मूळ एकच मानले आहे. त्यांना कोणतेही लोक परके वाटत नाहीत. प्रथम सर्व लोक एकाच ईश्वराने निर्माण केल्यामुळे एकाच वर्णाचे होते– पुढे विकार प्राबल्यामुळे चार वर्ण झाले– नंतर यवनम्लेच्छादि हजारो जाती उत्पन्न झाल्या. हा सर्व धर्माचरण सोडल्याचा परिणाम आहे असे महाराजांनी स्पष्ट मानले आहे. अशी वस्तुस्थिती असल्यामुळे आर्यधर्मातील सर्वोच्च पारमार्थिक सिद्धान्त जगातील सर्व लोकांना शिकविण्यास महाराजांना मुळीच प्रत्यवाय वाटत नाही.[१९]

एकूण वैदिक आणि संस्कृत वाङ्मयाच्या आधारावरून आर्य शब्द हा गुणवाचकच आहे असेच दिसून येते. "आर्य म्हणजे सुसंस्कारसंपन्न आणि धर्माचरण करणारा मनुष्य" असाच अर्थ महाराजांनी तर्क निकषावर प्रमाणांच्या साह्याने मांडलेला आहे. तसेच दस्यु आणि दास हेही शब्द गुणवाचकच आहेत. त्यामुळे आर्यांच्या वाङ्मयातील अन्तर्गत पुराव्यावरून आर्य शब्दावर वंश या अर्थाचा खोटा आरोप करण्याचे कोणालाही काहीही कारण नाही.

आर्य व अनार्य, दस्यु, दास, या संज्ञा सदाचरण व असदाचरण यांना अनुलक्षूनच संस्कृतात सर्वत्र दिल्या गेल्या आहेत. किंवा दुर्जनतोष न्यायाने अनार्य शब्द एका शूद्र जातीचाच वाचक आहे असे कोणाचे म्हणणे असेल तर– कै. श्री बाबाजी महाराज पंडित आर्यधर्मोपत्तीत (पा. ५४२) त्याला परखड शब्दात उत्तर देतात की–

खरा अनार्य

हिंदुधर्माचा घटकावयव असलेल्या एका शूद्र जातीचाच अनार्य कोटीत अन्तर्भाव करून हिंदुसमाजात कलहाग्नी पेटविणारा–स्वतःस मात्र आर्यांचे वंशज ठरविणारा–पण आर्य धर्मांचा अंगिकार न करणारा–असा पाश्चात्य म्लेंच्छ समाज हाच अनार्य संज्ञेस पात्र आहे, हे महाभारत व मनुवचना वरून उघड होते. आर्यांना अनार्य ठरविणे व आपण स्वतः अनार्य असून आर्य बनणे, हेच अनार्यांचे (असंस्कृत माणसाचे) मुख्य लक्षण आहे.[२०]

– श्री बाबाजी महाराज पंडित

आर्यांचे गमनागमन : पाश्चात्य व भारतीय मते

जर्मन पंडित मॅक्समूलरने आर्य शब्दावर वंशवाचकत्वाचा आरोप केला. त्याचा इतिहास लक्षात घेण्याजोगा आहे. विलीयम जोन्सने १७७६ साली सर्व इंडोयुरोपियन भाषा एका कुटूंबातील आहेत, असे प्रमेय सर्वप्रथम मांडले. त्यावरून–

पूर्व पक्ष

एक भाषासमूह बोलणारा–एक समाज–कोठेतरी एकत्र–राहत असला पाहिजे असे मॅक्समूलरला वाटले. हा समाज कुठे होता तर पामीरचे पठारावर.

तेथून एक शाखा युरोपात गेली, एक इराणात गेली व एक भारतात आली. अशी मॅक्समूलरने कल्पना केली. खरोखर पाहता-पुरातन सुसंस्कृत आर्यांच्या ग्रंथांची व संस्कृतीची थोडीशी माहिती मिळाल्याबरोबर पाश्चात्य जग दिपून गेले आणि आर्यांचे पितृत्व प्रत्येक राष्ट्र स्वत:कडे ओढण्याचा प्रयत्न करू लागले कारण आर्य राष्ट्र त्यावेळी युरोपियनांचे गुलाम होते आणि गुलामांना स्वतःहून श्रेष्ठ मानणे हे जेत्यांना कधीच मानवत नाही.

१– डॉ. गाइल्सने आस्ट्रिया, प. जर्मनी वगैरे मध्य युरोप हे आर्यांचे मूळ स्थान मानले.

२– नेहरींगने द. रशियातील किरिधीजचा गवताळ प्रदेश हे मूळ स्थान मानले.

३– बेंफे कास्पियन समुद्रकाठ हे आर्यांचे मूळ स्थान मानतो.

४– इराणी लोक इराणला मूळ मानतात.

५– डॉ. वारेन याने "पॅरेडाइज फाऊंड" या ग्रंथात उत्तर ध्रुवाजवळ मनुष्य वस्ती होती असा सिद्धान्त मांडला.

६– डॉ. वारेनच्या अधारावरून आणि मॅक्समूलरच्या तथाकथित भाषा सिद्धान्तावरून व ऋग्वेदाचे आन्तर्निरीक्षण करून ध्रुवीयवर्णनसाम्यामुळे उ. ध्रुवावरून आर्य भारतात आले असावे, असा लो. टिळकांनी निष्कर्ष काढला.

७– काहींनी उ. ध्रुव हाच काश्मिरात होता किंवा ओरिसा बिहारात होता असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला.

८– स. ना. कुळकर्णी वगैरेंनी त्रि=विष्टप म्हणजे तिबेट हे आर्यांचे मूलस्थान असून तेथून आर्य हिमालयाच्या खाली उतरले असे मत मांडले.

उत्तरपक्ष

याला प्रत्युत्तर म्हणून, पावगी, डॉ. संपुर्णानंद, अविनाशचंद्र दास, राजबलि पांडेय, के. एम. मुनशी, पुसाळकर, दीनानाथशास्त्री चुलेट, डॉ. फतहसिंह, पु. ना. ओक, म. बाळशास्त्री हरदास वगैरेंनी वैदिक वाङमयातील गंगेचे माहात्म्य, गंगेकडून सिंधूकडे जाण्याचे उल्लेख वगैरेवरून येथूनच आर्य बाहेर गेले आणि त्यामुळे त्यांच्या संस्कृतीचा प्रभाव मध्य आशिया, युरोप वगैरेंवर पडला असा उत्तर पक्ष मांडला.

सिद्धान्त पक्ष

पण या पूर्वपक्ष आणि उत्तरपक्षापेक्षा आर्यांच्या विश्वव्यापक संस्कृतीचा सिद्धान्त जास्त व्यापक आणि सत्याला जवळचा आहे. महाराजांच्या मताप्रमाणे आर्यांच्या गमनागमनाच्या दोन्ही उपपत्ती स्वपक्षदूषित आहेत. इतर सर्व धर्म उत्पन्न होण्यापूर्वी सर्व जगात आर्यधर्मच नांदत होता. हा जुना ऐतिहासिक सिद्धान्तच अतिशय महत्वाचा आणि ऐतिहासिक सत्याला धरून आहे.

आर्यांची गमनागमन उपपत्ती चूक असण्याचे मुख्य कारण म्हणजे आर्य हा वंश नसून सुसंस्कृत व धार्मिक मनुष्याला आर्य शब्द योजला जात असे. असे वैदिक आणि संस्कृत पुराव्यावरून आपण तसे मागें पाहिलेच आहे. त्याचप्रमाणे भाषाशास्त्राचा, कपाल शास्त्राचा किंवा मानववंशशास्त्राचा अभ्यास जसा जसा वाढू लागला तसतसे लोकमान्यांच्या मोक्षमुल्लराचे म्हणणे चूक आहे असे युरोपियन विद्वानांच्यासुद्धा लक्षात येऊ लागले.

भाषा व मानववंशशास्त्रानुसार

"ओरिजीन ऑफ आर्यन्स" या ग्रंथात पान १–७ वर इझॅक टेलर म्हणतो– "आर्यन भाषा बोलणारे एकाच वंशाचे असले पाहिजे, हे गृहीतकृत्यच मुळी चूक आहे. एका वंशाचे लोक अनेक भाषा बोलतात व अनेक वंशाचे लोक एकच भाषा बोलतात." अशी अनेक उदाहरणे देऊन मोक्षमुल्लरचे त्याने खंडन केले आहे. पुनः इझॅक टेलर L. C. पा. १७९ वर स्पष्ट

लिहितो की– "भाषा आणि वंश यांचे 'को एक्झीस्टन्स' कधीच राहत नाही हा मानववंश शास्त्राचा ठाम सिद्धान्त आहे."

कवटी शास्त्रानुसार

त्याचप्रमाणे कपालशास्त्राचे (अँथ्रांपॉलॉजी Anthropology) शास्त्रज्ञ देखील असेच सिद्ध करतात. त्यांनी इटली, स्वित्झरलंड, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी इ. ठिकाणी उत्खनने केली. त्यात कपालशास्त्रज्ञांना पाषाणयुगातील (अश्मयुगातील) हत्यारे व मानवी कवटचा सापडल्या. त्या कवटचा आणि आज राहत असलेल्या रहिवाशांच्या कवटचा एकाच वंशाच्या मानवांच्या आहेत असे त्यांना स्पष्ट दिसून आले म्हणजेच युरोपातील अश्मयुगातील मानववंश अजूनही कायम आहे असेच सिद्ध झाले. टोपीनार्ड तर स्पष्ट म्हणतो की "It has been proved that the anthropological types of Europe has been continuous."

डोवजानस्की व डन्न यांनी "आनुवंशिकता, जाती आणि समाज" या पुस्तकात तर असे म्हटले की,– "कोणत्या तरी दुर्दैवी दिवशी मॅक्समूलरने "आर्यन रेस" असा शब्दप्रयोग केला व केवळ बडबड करीत असतानाच एका काल्पनिक प्राण्याची म्हणजे आर्यमानवाची उत्पत्ती झाली."[२१]

प्रा. टी. मुर संस्कृत भाषा– या पुस्तकात म्हणतो की "भारतावर इंडो आर्यन् जमातीचे आक्रमण झाले याला कोणतेही प्रमाण सापडत नाही. ऋग्वेदात आर्य बाहेरून आल्याचा एकही उल्लेख नाही हे किती आश्चर्य आहे.[२२]

मॅक्समूलरचे पराभूत उद्गार

याचप्रमाणे इझॅक टेलर, डोवजनस्की, डन्न, मुरो वगैरे गोऱ्या युरोपियन बंधूंनी स्वतःच्या "एक भाषा व एक वंश" या सिद्धान्ताची केलेली चीरफाड पाहून स्वतः मॅक्समूलरने 'वुई युरोपियन्स' या प्रबंधात आपली चूक कबूल केली, तो म्हणतो– "आर्य भाषा बोलणारे म्हणजे आर्य–येवढाच माझा आर्य शब्दाचा आशय आहे. इंडो युरोपियन वंशासंबंधी आपल्याला अत्यल्प माहिती आहे. ते मिश्र वंशाचे की एकाच वंशाचे हेही माहीत नाही." याप्रमाणे त्याचे पराभूत उद्गार आहेत."

डॉ. मूर देखील– इंद्रो यो दस्यूनधरानवातिरत् ॥ ऋग्वेद १–१०१–५ ॥ यावरील भाष्यात म्हणतो की, दस्यू ही आर्यधर्मापासून पतित झालेली जात आहे. They (Dasyus) are discribed as a degreded race in Rigveda– (Muir's original Sanscrit Text. Vol. II P. 371.) डॉ. मूर शूद्रांना आर्याहून भिन्न वंश मानीत नाही.

डॉ. आंबेडकरांचा सिद्धान्त

" शूद्र पूर्वी कोण होते," या ग्रंथात डॉ. आंबेडकरांनी पाश्चात्य विद्वानांनी मांडलेले अपसिद्धान्त पूर्णपणे खोडून काढले आहेत. शूद्र वर्ण वेगळा नसून आर्यातील क्षत्रियांचाच एक भाग होता हे बळकट पुराव्यांनी सिद्ध केले आहे. तसेच "आर्य हा एक वंश होता" हे मॅक्समूलर वगैरेंचे खोडसाळ मत चुकीचे

असल्याचे स्पष्ट दाखवून "सभ्य माणसांना आर्य म्हणत" असे साधार सिद्ध केले आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात,

"(१) विशिष्ट प्रकारचे अवयव असलेल्या आर्य लोकांचा वंश; आणि (२) सर्वसाधारण एक भाषा बोलणाऱ्या आर्य लोकांचा वंश; या दोन्ही अर्थांनी आर्यवंशाचे अस्तित्व प्रो. मॅक्समूलरने कबूल केले आहे त्याची ही दोन्ही मते परस्पर विरुद्ध आहेत, हे उघड आहे" (पा. ६६)

अर्य व आर्य हे दोन शब्द ऋग्वेदात सापडतात. 'अर्य' हा शब्द ऋग्वेदात ८८ ठिकाणी वापरला आहे.

१) शत्रू
२) सभ्य माणूस
३) हिंदुस्थानचे नाव
४) मालक, वैश्य किंवा रहिवासी. अशा निरनिराळ्या अर्थांनी 'अर्य' हा शब्द ऋग्वेदात वापरला आहे.

"आर्य हा शब्द ऋग्वेदात ३१ ठिकाणी वापरला आहे. परंतु तो "आर्य वंश" या अर्थाने एकाही ठिकाणी वापरलेला नाही. वर केलेल्या विवेचनावरून असे स्पष्ट होते की अर्य व आर्य हे शब्द वंशवाचक अर्थाने वेदात मुळीच वापरलेले नाहीत." (पा. ६७)

"युरोपियन ग्रंथकारांचा दुसरा मुद्दा असा की, आर्य लोकांनी हिंदुस्थानवर स्वारी केली व मूळच्या रानटी रहिवाशांना जिंकून आपले गुलाम केले... ऋग्वेदात या मुद्याला यत्किंचितही पुरावा मिळत नाही." हा मुद्दा सिद्ध करताना

डॉ. आंबेडकरांनी डॉ. पी. टी. अय्यंगार यांच्या Life in Ancient India in the age of the Mantras (PP 11 to 14) या पुस्तकाचा आधार घेतला आहे तोही महत्वाचा आहे. (पा. ७२)

"दस्यू अव्रत, अपव्रत, व अन्यव्रत. अनग्नित्र, अयज्यू, अयज्वन्, अब्रह्म, अनृचा, ब्रह्मद्विष् अनिंद्र वगैरे अनेक शब्द दस्यू, दास, शूद्र यांचे बद्दल ऋग्वेदात वापरले आहेत.* यावरून हेच सिद्ध होते की, आर्यांनी अनार्य, दास, दस्यू यांचेवर स्वारी करून त्यांना आपले गुलाम केले या सिद्धान्ताला ऋग्वेदात सबळ पुरावा मिळत नाही." (पा. ७४–७५)

"हे वज्री, तू तुझ्या शक्तीने दासांना आर्य करून टाकलेस. दुष्ट लोकांना सुष्ट केलेस. ऋग्वेद ६–२२–१०/ इंद्र म्हणतो– मी दस्यूंचे आर्यत्व नष्ट केले आहे. ऋग्वेद १०–४९–३/ वगैरे ऋच्यांवरून हे स्पष्ट होते की आर्य व दास आणि दस्यू यांच्यात जो भेद होता तो शारीरिक स्वरूपाचा किंवा वंशसूचक वर्णाचा नव्हता. अशी वस्तुस्थिती होती म्हणून दास व दस्यू यांना आर्य होता येत असे." (पा. ७७) वगैरे अनेक ठिकाणी डॉ. आंबेडकरांनी हा विषय अभ्यासपूर्ण रीतीने प्रतिपादन केला आहे. त्यांचे एक महत्वाचे वाक्य पाहू–

"आर्य वंशाबद्दल युरोपियन ग्रंथकारांनी जो सिद्धान्त मांडला आहे तो इतका खुळचट आहे की वास्तविक तो फार दिवसांपूर्वीच नष्ट व्हावयास पाहिजे होता. असे न होता सदर सिद्धान्ताची लोकांवर इतकी छाप पडली आहे की सांगता सोय नाही." (पा. ८०) –डॉ. आंबेडकर

निर्विकारपणे विचार करणारे शुद्ध ज्ञानपिपासू पाश्चात्य पंडित देखील आर्य, दस्यू हे शब्द गुणवाचकच मानतात,

वंशवाचक नव्हे; हे महत्वाचे असून श्री गुलाबराव महाराजांच्या म्हणण्याला पुष्टी देणारे आहे.

याप्रमाणे एकसंघ भारतीय समाजघटकातील दुहीचे विषाक्त बीज महाराजांनी २० व्या शतकातील पहिल्या दशकातच ओळखले होते. खरोखर पाहता आधुनिक सुधारणावादी पर-मार्थी लोकांप्रमाणे त्यांनीही आर्य-शूद्र वादाला खतपाणी घातले असते तर ते स्वाभाविकच होते कारण तेही स्वत: शूद्र जातीत जन्मले होते. त्यांची अचाट बुद्धिमत्ता सर्व ब्राह्मणवर्गाला पुरून उरणारी होती. असे असतानाही त्यांनी एकात्म समाजघटकां-तील या सामाजिक दुहीला तात्विक अधिष्ठानावरून विरोध केला हे आश्चर्याचे आणि महत्वाचे आहे. यावरून त्यांची निष्कपट बुद्धी शास्त्रावरील दृढ निष्ठा आणि सामाजिक हिताची कळकळ हे स्पष्ट दिसून येतात.

आर्य संस्कृतीचे विश्वव्यापकत्व

आपण संक्षेपाने आर्यांच्या आणि पाश्चात्य पंडितांच्या ग्रंथातून आर्य-दस्यू वगैरे शब्दांचे अर्थ पाहिले. त्यावरून आणि भारतीय स्मृतिपुराणादि ग्रंथातून आलेल्या इतिहासावरून वैदिक संस्कृतीचे संस्कारसंपन्न लोकच पूर्वी साऱ्या जगात होते हे उघड दिसून येते. आपण केवळ पाश्चात्य ऐतिहासिक पुरावा पाहिला तरी देखील आर्य संस्कृतीच्या विश्वव्यापकत्वाच्या सिद्धान्तावर यावे लागते. आर्यांच्या वैदिक संस्कृतीचे पुरातन अवशेष साऱ्या जगातील काऱ्याकोपऱ्यात इतस्तत: सापडतात असे जगातील उत्खननावरून आढळून येते.

परंतु त्यातील सोईस्कर असे काही पुरावे पुढे करून, राज्यकर्त्या इंग्रजांनी आणि ख्रिस्ती मिशनरींनी आर्यलोक हे भारतातील नसून आक्रमक म्हणून बाहेरून आले अशी 'सोईस्कर कल्पना' सिद्धान्त म्हणून गृहीत धरली आणि इतिहासाची मांडणी केली. त्यांच्या मनात हिंदूंना ख्रिश्चन करणे आणि ब्रिटिश शासन मजबूत करणे, हे दोन हेतू असल्यामुळे "डिव्हाइड अँड रूल" या मंत्राचा अवलंब करून त्यांनी सर्व शिक्षणक्रमात विकृत इतिहास समाविष्ट केला. त्यांच्या मनांत शुद्ध ज्ञानलालसेपेक्षा राजकीय आणि धार्मिक स्वार्थ असल्यामुळे संस्कृत आणि वैदिक वाङ्मयातील अन्तर्गत पुराव्याकडे, त्यांनी मुद्दाम दुर्लक्ष केले आणि आर्यांना परके व आक्रमक ठरविले.

त्यामुळे देशभक्त संशोधकांनी आणि ज्ञानपिपासू पाश्चात्य पंडितांनी संस्कृत ग्रंथातील अन्तर्गत पुराव्यावरून आणि भारताबाहेरील ऐतिहासिक पुराव्यावरून आर्यच भारतातूनच साऱ्या जगात पसरले आणि वैदिक संस्कृतीची ध्वजा फडकाविली असा उत्तरपक्ष उत्तम रीतीने मांडला. परंतु वैदिक संस्कृतीच्या विश्वव्यापकतेचा मूळ सिद्धांत लक्षात घेतल्यानतर आर्य बाहेरून आले किंवा येथून बाहेर गेले, या दोन्ही कल्पनांना फारसा अर्थ उरत नाही.

यवन, म्लेच्छ वगैरे देखील मूळचे आर्य

मागे पाहिल्याप्रमाणे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे चारी वर्ण आर्यांचेच अन्तर्गत प्रकार आहेत. इतकेच नव्हे तर सर्व

जगात, सर्व धर्मांच्या अगोदर एक आर्यधर्मच परिपूर्ण अवस्थेत होता. परंतु पुढे कालांतराने मानवातील सत्वप्रवृत्ती कमी कमी होऊ लागली आणि विकारांचा प्रभाव वाढत गेला. त्यामुळे मूळ वैदिक धर्म हळू हळू सुटत गेला आणि शेवटी मूळ धर्माची त्या त्या समाजात पार विस्मृती झाली. सर्व प्रकारचे धर्माचरण सुटल्यामुळे त्या संस्कारहीन मानव समाजांना म्लेच्छत्व प्राप्त झाले.

शनकैस्तु क्रियालोपात् इमा क्षत्रियजातयः ।
वृषलत्वं गता लोके ब्राह्मणादर्शनेन च ।।४३।।
पौण्ड्रकाष्चौण्ड्र द्रविडाः कांबोजा यवना शकाः ।
पारदा पल्लवश्चीना किराता दरदा खशाः ।।४४।।
मुखबाहुरुपज्जानां या लोके जातयो बहिः ।
म्लेच्छवाचश्चार्यवाचः सर्वे ते दस्यवः स्मृतः ।। मनुस्मृति अ. १०

धर्माचरण आणि संस्कारलोपामुळे पौंड्रक यवन, शक, चीनी, खश वगैरे समाज मूळ क्षत्रिय असून देखील म्लेच्छत्वाला प्राप्त झाले. वैदिक संस्कारांच्या लोपामुळे धार्मिक मार्गदर्शन करण्यासाठी ही कोणीही राहिले नाहीत त्यामुळे आज हे सर्व समाज मूळच्या आर्यधर्माला पारखे झाले. बरे, व्याकरणदृष्टया देखील म्लेच्छ या शब्दाचा अर्थ जातिवाचक नसून "ज्याला शुद्ध उच्चार करता येत नाही तो" असा आहे. परंतु पुढे रूढार्थामुळे त्याला जातिवाचक अर्थ चिटकविला गेला. त्यामुळे म्लेच्छ यवन वगैरे सर्व मूळचे आर्यच होते, हे दिसून येते.

याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे कृतयुगात एकच हंसवर्ण होता– "आदौ कृतयुगे सर्वनृणां हंसवर्ण इति स्मृतः ।।" व पुढे संस्कारहीनतेमुळे किंवा अन्य कारणांमुळे क्षत्रियापासून

म्लेच्छांपर्यंत सर्व जाती निर्माण होत गेल्या. म्हणून जगातील सर्व धर्म उत्पन्न होण्यापूर्वी आर्यधर्मच एक सर्व जगात नांदत होता. त्या त्या धर्माचे पालन करणारे आर्य आणि धर्मविरुद्ध वागणारे सर्व जण अनार्य, दस्यु, दास वगैरे शब्दांनी संबोधिले जात. महाराज म्हणतात,

"प्रत्येक धर्मात, स्वतःच्याच धर्मापासून सर्व धर्म उत्पन्न झाले असे लिहिले आहे. तथापि आपल्या धर्मात जसा ऐतिहासिक पुरावा मिळतो तसा कोठेच मिळत नाही.

सृष्टीची उत्पत्ती

यातही विशेष गोष्ट अशी की आर्यधर्म सोडून बाकी सर्वच धर्मात ३००० वर्षापूर्वी काहीच नव्हते व नंतर ईश्वराने सृष्टी निर्माण केली असे सांगितले आहे. महंमद वगैरे धर्मात त्यांचाच धर्म पूर्वीचा म्हणून सांगितला आहे. पण ३००० वर्षापूर्वी किंवा बायबलात सांगितल्याप्रमाणे ६००० वर्षापूर्वी सृष्टी नव्हती, अशी मते भूगर्भशास्त्राप्रमाणेही असंबद्ध आहेत. असे उल्लेख आपल्या आर्य धर्मात नाहीत"[५] आपली कालगणना चार चार युगांच्या मापनाने सांगितली आहे. ही सृष्टी आकाशापासून झाली, वगैरे जे सांगितले आहे, ते आधुनिक विज्ञानही मान्य करीत आहे.[५]

साधुबोधात महाराज म्हणतात की,– "साधारण इतिहासाचे निरीक्षण केले तर आर्यलोकच पूर्वी भरभराटी होते व धार्मिक इतिहासाच्या दृष्टीनेही प्रत्येक धर्म आर्य धर्मातून

निघालेला दिसतो. यहुदीधर्म पर्शियन धर्मापासून निघाला. त्याने पर्शियन धर्मापूजा व इतर पद्धती घेतली. पुढे यहुदी-धर्मापासून ख्रिती धर्म निघाला. पर्शियन धर्मावर धाड घालून मुसलमानी धर्म निघाला. मुसलमान धर्माच्या पूर्वी लोक अग्निपूजन होते. अरेबियन नाईटमध्ये अग्निपूजेचा उल्लेख आहे. यावरून मुसलमान धर्मापूर्वी अग्निपूजा होती असे दिसते. पण महंमदाने ती मोडून टाकली, 'मस्नवी ए मानवी', इत्यादी सुफी ग्रंथावरून मुसलमान इकडे येण्यापूर्वी सुद्धा त्यांच्यात हिंदुधर्माविषयी आदर होता हे दिसून येते."[२७]

महाराजांच्या व्यापक सिद्धान्तानुसार विचार केला तर सर्व जगात सर्व धर्माच्या पूर्वी आर्यांचा वैदिक धर्मच पसरला होता, ते स्पष्ट आहे. त्यानुसार आपण जागतिक इतिहासाच्या प्राचीन अवशेषांचे थोडक्यात केलेले निरीक्षण परिशिष्टात पाहू. हा सिद्धान्त पुनः प्रथापित करण्यासाठी इतिहासज्ञ विद्वानांच्या सामूहिक प्रयत्नांची अत्यंत गरज आहे. त्यातील एकेक भाग जरी निवडला तरी त्यावर अनेक प्रबंध लिहिले जाऊ शकतील, असा हा फार मोठा व्यापक विषय आहे. त्यामुळे येथे नामोल्लेखाशिवाय अधिक विचार करणे शक्य होणार नाही.

समारोप

याप्रमाणे ख्रिस्ती लोकांनी प्रयत्नपूर्वक लादलेल्या बौद्धिक पारतंत्र्यातून मुक्त झाल्याशिवाय भारताची भौतिक किंवा आध्यात्मिक कोणतीही प्रगती होणे शक्य नाही याची पहिली

पायरी म्हणून इतिहासाकडे पाहण्याची दृष्टी बदलून, भारतीय पद्धतीने विचार करण्यासाठी आर्यांचा इतिहास आर्यांच्याच वाङ्मयातून शोधावा लागेल, आर्यांच्याच परंपरेतून शिकावा लागेल. इतिहास कोणी लिहावा, कसा लिहावा व कोणत्या इतिहासावर विश्वास ठेवावा, यासंबंधीचे महाराजांचे विवेचन पाहिले असता इतिहास जाणून घेण्याची भारतीय पद्धती समजावून घेता येते. शत्रूच्या तोंडची स्तुति व मित्राच्या तोंडची निंदा खऱ्या समजून स्वोत्कर्षवर्धक इतिहासाचा अभ्यास करावा, वगैरे महाराजांचे विचार महत्वाचे आहेत.

तसेच आर्य शब्दाचा अर्थ सद्‌गुणसंपन्न पुरुष असाच असल्याने त्याचा वंशवाचक अर्थ करता येत नाही. आर्यांनी आक्रमण करून भारतातील आदिवासींचा छळ करून क्रूरतेने त्यांना दास म्हणजे शूद्र बनविले नाही. उलट दास, दस्यु, शूद्र हे सर्व आर्यांचेच भेद आहेत. इतकेच नव्हे तर बर्बर–चीन–यवन–खश वगैरे सर्व म्लेच्छ जाती देखील पूर्वी मूळच्या आर्यच होत्या परंतु संस्कार लोपामुळे आर्य संस्कृतीपासून भिन्नत्व पावल्या. तत्पूर्वी सर्व विश्वात एकच वैदिक संस्कृती नांदत होती. उत्तर ध्रुवापासून दक्षिण अमेरिके पर्यंत– दक्षिण आफ्रिकेपर्यंत, युरोप, आशिया वगैरे सर्व जगात एक आर्यधर्मच होता. "कृण्वंतो विश्वमार्यम्"– आम्ही सर्व विश्वाला सुसंस्कृत करणारे आहोत, ही उज्वल प्रतिज्ञा प्राचीन आर्यसंस्कृतीने पूर्ण केली होती असेच आढळून येते. याप्रमाणे महाराजांनी मांडलेली स्वोत्कर्षवर्धक इतिहास आणि विश्वव्यापक आर्यसंस्कृती ही दोन तत्त्वे भारताच्या इतिहासविषयक लेखनातून जोपासली जाणे ही आजची गरज आहे.

परिशिष्ट १

विश्वव्यापी संस्कृतीचे जागतिक पुरावे

मुसलमानपूर्व अरबस्थानच्या इतिहासाचे अवलोकन केले तर महंमद पैगंबरापूर्वी मक्का हे स्थान हरिहरांचे तीर्थक्षेत्र समजले जात असे. विष्णूचे एक पद गयेत, दुसरे मक्केत व तिसरे हरिहरक्षेत्राजवळील शुक्लतीर्थासमीप स्थापिलेले आहे. त्यांच्या दर्शनाने पितरांना मुक्ती मिळते.

एकं पदं गयायां तु मकायां तु द्वितीयकम् ।
तृतीयं स्थापितं दिव्यं मुक्त्यै शुक्लस्य संनिधौ ॥६॥
(हरिहरेश्वरमहात्म्य अ. ७)

शक्तिसंगम तंत्राच्या अनुसार प्राचीन इतिहासात पांच प्रस्थ प्रसिद्ध होते. इंद्रप्रस्थ, यमप्रस्थ, वरुणप्रस्थ, कूर्मप्रस्थ आणि देवप्रस्थ. पैकी वरुणप्रस्थात पश्चिमेकडे मक्केश्वर (मखेश्वर–मक्का) तीर्थ; उत्तरेकडे हिंगुला नदी पूर्वेकडे राजावर्त (राजस्थान) पर्यंत भूभाग अंतर्भूत होता. या पांच प्रस्थात ५६ देश समाविष्ट होते. (शक्तिसंगम तंत्र ३, ७, ४–५६)

यानुसार पाहिले असता मक्केपासून लंकेपर्यंत 'सैंधव' नामक समुद्रतटवर्ती प्रदेश, रत्नाकर–बंगालच्या सागरापासून ब्रह्मपुत्रेच्या उगमापर्यंत प्रदेश; बंगाल, कामरूप, भूतान, काश्मीर, खुरासान, दक्षिणेकडे केरळ, कोंकण, कर्नाटक, सिंहल द्विपापर्यंत प्रदेशांचा समावेश आर्यावर्तात होत असे. असे "सिंध घाटीमें उपनिषदों के प्रतीक," (१९७१, पा. ५७-५८) या संशोधनपूर्ण ग्रंथात राजस्थान प्राच्यविद्याप्रतिष्ठानाचे

निदेशक (डायरेक्टर) डॉ. फतेहसिंह यांनी अनेक प्रमाणपूर्वक सिद्ध केलेले आहे.

महंमद पैगंबराचा काका उमर-बिन्-ए-हश्शाम हा फारशीचा फार मोठा कवी होता. "ऐ-असल-ओकुल' या काव्य-ग्रंथातील त्याच्या कवितेत पान २७५ वर महादेवाची आणि हिंदेची स्तुती केलेली आहे. यावरून तो शिवभक्त होता हे त्याच्या कवितेवरून सिद्ध होते.

पैगंबराच्या पूर्वी २३०० वर्षे लबी बिन-एख्तब,– बिन-ए तुरफा, याने देखील हिंदेचा गौरव केला आहे. तसेच साम-यजु-ऋग्वेद व अथर्ववेद हे ईश्वराने दिले व त्यातील आज्ञा पालन केली पाहिजे वगैरे खूप लिहिले आहे. या दोन्ही कविता काबा येथील शिवमंदिरात सुवर्णाक्षरांनी लिहिल्या होत्या म्हणून महंमदीय धर्मापूर्वी अरबस्थानात वैदिकधर्म प्रचलित होता हे इतिहासप्रमाण महाराजांच्या सिद्धान्ताला पुष्टी देते.

येशू ख्रिस्ताचे हिंदुत्व व ख्रिस्तपूर्व युरोप

१– रशियन संशोधक डॉ. बुचानन याचे – 'अननोन लाईफ ऑफ ख्रिस्त' हे पुस्तक.

२– ख्रिस्ताच्या ईशान पंथाच्या सहकाऱ्यांनी लिहिलेले – 'बाय अॅन आय विटनेस' हा ग्रंथ.

३– बाबाराव सावरकर'चे "ख्रिस्ताचे हिंदुत्व" हे पुस्तक.

या तीन पुस्तकावरून, व येशू ख्रिस्ताचे फोटो असलेल्या चरित्रावरून हेच दिसून येते की दोन हजार वर्षापूर्वी पॅलेस्टईन मध्ये आर्यधर्म मोडकळलेल्या अवस्थेत प्रचलित होता. म्हणून येशूला धर्माच्या व योगाच्या शिक्षणासाठी

भारतात यावे लागले. नंतर आपल्या बांधवांना सुसंस्कारांचा उपदेश केला. म्हणजेच 'कृण्वंतो विश्वमार्यम्' या प्रतिज्ञेचे पालन करण्याचेच कार्य येशूने केले.

- पोकॉकचे–इंडिया इन ग्रीस (पा. २०१)
- अल्काट याचे ग्रंथ.
- मंगोपार्कचे प्रवासवर्णन–एसियाटिक जर्नल भा. ४ पान ३२४.
- एच. एच. विल्सन – मिश्र हा संस्कृत शब्द. मेनासराजा मनु.
- बुक ऑफ डेड–रविला 'ख' म्हणत. या सर्वांनी इजिप्त व इथिओपिया मध्ये आर्य वैदिक संस्कृतीच होती असे सिद्ध केले आहे.
- विल्यम जोन्स, मॅक्समूलर, कर्नल टॉड, बरोसोस, वगैरेचे म्हणणे आहे की इराण मध्ये ख्रिस्तपूर्व २२०० वर्षापूर्वी तो ६००० वर्षेपर्यंत वैदिक संस्कृती असल्याचे पुरावे आहेत.
- कौंट जॉन्स्टर्नां– "थियॉगनी ऑफ हिंदूज" या ग्रंथात खाल्डियन लोकांना व बॅबिलोनियन लोकांना ते मूर्तिपूजक रजपूत हिंदू आहेत असे म्हणतो. आणि ख्रिस्तपूर्व ४००० वर्षापूर्वी सूर्योपासना होती असे सूर्यमंदिराच्या अवशेषावरून सिद्ध करतो.
- मेसोपोटोमिया, रोम, आफ्रिका, कास्पियन समुद्र (कश्यप ऋषींचा आश्रम),स्कॅंडेनेव्हिया, ब्रिटन, चीन अमेरिकेतील मेक्झिको, पेरू वगैरे सर्व देशात आर्य

संस्कृतीच होती हे पाश्चात्य इतिहासकारांनीच सिद्ध केलेले आहे.

- गॉडफे डिगिन्स याने–सेल्टीक डुइडस–या ग्रंथात ब्रिटन मध्ये हिंदू लोकांची वसाहत होती हे सिद्ध केले आहे
- वॅरन हंबोल्ट याने उत्तर अमेरिकेत गणपतीची पूजा, समुद्रमंथन, रामलीला यांच्या कथा असल्याचे दाखवून दिले आहे.
- विल्यम जोन्सनेही आशियाटिक रिसर्चेस १, पा. ४२६ वर अमेरिकन संस्कृतीचे मूळ आर्य संस्कृतीलाच मानले आहे.
- उत्तरधृवासंबंधी तर लो. टिळकांचे संशोधन प्रसिद्धच आहे.
- चीन, जपान व आशियातील हिंदुसंस्कृतीचे पुरावे तर अगदी स्पष्टच आहेत.

मोहंजोदारो, हरप्पा व लोथल व सुमेरियन संस्कृती असल्यासंबंधी व्हीलर, मार्शल यांनी मुद्दाम विकृत कल्पना मांडल्या. पण आता त्यांचे डॉ. फतेहसिंह, श्री गोळेगावकर, डॉ. राव, डॉ. हरिभाऊ वाकाणकर वगैरेंनी सखोल अभ्यास करून त्या विकृत खोटया कल्पनांचे समूळ उच्छेदन जवळ जवळ केलेलेच आहे. मुंगीच्या पावलाने कां होईना पण ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या स्वार्थी व अतिरंजित पूर्व ग्रहांपासून हळू हळू भारतीय बुद्धी मुक्त होण्याची सुरवात झाली असल्याचे आशादायक दृश्य दिसू लागले आहे.

१ ग्रीस

ग्रीक भाषेचा उगम संस्कृतातून

"ग्रीक भाषा संस्कृतपासून निघाली आहे असे पुष्कळ भाषा शास्त्रज्ञांचे मत आहे. ग्रीक लोकांचे मूलस्थान भरतखंडच होय" हे मत प्रथमत: **कर्नल टॉड व कर्नल विल्फोर्ड** यांनी प्रतिपादन केले. (या मताची परिपूर्ती करून मि. पोकॉक यांनी India in Greece हा ग्रंथ लिहिला).

होमरच्या काव्यात वर्णिलेल्या समाजव्यवस्थेचे सूक्ष्म व विस्तृत परिक्षण केल्यानंतर ही व्यवस्था आशियाटिक विशेषत: भारतीय स्वरूपाची आहे. येवढेच नव्हे तर दोन्ही देशातील भाषा–धर्म–तत्वज्ञान–राजसंस्था किंबहुना पर्वतांची व नद्यांची नावे यातही विलक्षण साम्य आहे.

– पोकॉक

२ रोम

राम = रोम

"प्राचीन ग्रीकांप्रमाणे प्राचीन रोम लोकांच्या देवदेवता या दुसऱ्या कोणी नसून "हिंदुस्थानातील प्राचीनतर वीर-पुरुषांचीच ती दैविक रूपांतरे" होत.

रोमन लोक ज्या ट्रोजनांचे वंशज ते स्वत: ही हिंदुस्था-नातून आर्य वसाहत वाल्यांचेच वंशज होते. 'रोम' नाव

वास्तविक लॅटीन नाही. त्याचे मूळचे रूप 'राम' आहे. संस्कृतातील 'आ' चा लॅटीनमध्ये 'ओ' होतो." – **मि. पोकॉक**

(इंडिया इन ग्रीस पा. १४२–१६६)

३

इटाली

धर्मविधींचे साम्य

"ग्रीसमध्ये भारतीयांची वसाहत झाली त्याच काळाचे सुमारास त्यांचेपैकी काही लोकांनी इटालीतही वस्ती केली, व हेच प्राचीन "इस्ट्रुक्सन" लोक होत यांचा धर्म व त्यातील अनेक धर्मविधी यांचे इजिप्शियन व हिंदुधर्मविधींशी विलक्षण साम्य आहे."

– **कौंट जार्नस्टजर्ना** (१०५)

४

जर्मनी

भाषासाम्य–मूळपुरुष मेनस = मनु

"जर्मन लोक '**ट्युटोन**' वंशाचे असून या वंशाचे मूळ पुरुष Manus **मेनस** होता असे जर्मन पुराण कथात म्हटले आहे. भारतीय आर्यातही मनु: = मनुस् हाच सांप्रतच्या मन्वंतरातला आदिपुरुष मानल्या जातो. इंग्रजीतील Man व जर्मनातील Mann हे शब्द संस्कृतातील मनुस् शब्दापासून झालेले असून जर्मनमधील Mensh व संस्कृतातील 'मानुष' हे शब्द एकच होत."

– **मिस 'मॅनींग'**

(अॅनशियंट अॅण्ड मेडीएव्हल इंडिया भा. १ पा. ११८)

वेश आणि प्रातःस्नान

"प्राचीन जर्मनांचा सैल व फैलावलेला झगा आणि डोक्यावर गाठ देऊन बांधलेले केस हे दोन्ही प्राचीन ब्राह्मणांच्या सारखेच होते. तसेच प्राचीन जर्मन लोकांत सकाळी निजून उठल्याबरोबर शौचमुखर्जनानंतरचे पहिले कृत्य म्हणजे 'प्रातःस्नान' हे असे. ही चाल अर्थातच जर्मनीसारख्या थंड देशात उत्पन्न होणे शक्य नसून ती आशियाखंडातील उष्ण प्रदेशातूनच आली असावी." **–कर्नल टॉड**

(राजस्थान इतिहास भा. १ पा. ६३ व ८०)

उपासना-प्रेतदहन-सतीची चाल

"प्राचीन जर्मन सूर्य-चंद्र-अग्नी यांच्या उपासना करीत. प्रेत न पुरता दहन करीत. त्यांच्यात सतीची चाल असून पुर्नविवाह नव्हता." – **'टॅसिटस' ग्रीक इतिहासकार** (भा. १०६)

शर्मन् – जर्मन

"ब्राह्मणांच्या प्राचीन नावापुढे बहुधा शर्मा हे पद लावीत. ब्राह्मणापासून 'ब्राह्मण्य' हे जसे भाववाचक (किंवा जाति वाचक) नाम झाले आहे तसेच 'शार्मण्य' हे ही नाव बनले श ज य ही तीन अक्षरे पुष्कळ ठिकाणी समान मानून उपयोग होतो. म्हणून शार्मण्याचे जर्मन झालेले आहे असे काही भाषापंडितांचे मत आहे." (भा. श्रे.१०६)

सॅक्सन – शकसुनु

"जर्मनीतील 'सॅक्सन' लोकही वास्तविक भरतखंडाच्या वायव्यभागात राहणाऱ्या शकांचेच वंशज होत "शकसुनुः" सॅक्सन यांचे सादृश्य उघडच आहे. शिवाय हिमालय = स्वर्ग प्राचीन सॅक्सन लोकांत स्वर्गास "हिम्मेल (Hummel) असे नाव असून ते "हिमालया" पासूनच झालेले स्पष्ट दिसत आहे.

– कर्नल टॉड

गोपीकृष्णांची चित्रे

"इंग्लंडवगैरे देशातला अत्यंत प्राचीत सेक्सन प्रार्थना मंदिरावरील जुन्या चित्रांचे हिंदुस्थातातील कन्हया व गोपी यांच्या चित्रांशी असलेले सादृश्य पाहून असे वाटते की सॅक्सन लोकांचे पूर्वज असलेल्या स्कॅंडेनिव्हियातल्या अश्र लोकांनी भारतातून जातानाच ही चित्रे बरोबर नेली असावी." – कर्नल टॉड

(राजस्थानचा इतिहास भा. १ पा. ५७)

---

५ हंगेरी

भाषा चालीरीती वंश यांचे मूळ

"अर्वाचीन हंगेरीयन लोकही तेथील प्राचीन हिंदू वसाहत वाल्यांचेच वशंज असून त्यांची भाषा चालरीत-वंश ह्यांचे मूळ संस्कृतात सापडेल असे तिबेटी भाषेचा कोश तयार करणाऱ्या एका युरोपियन पंडिताने प्रस्तावनेत लिहिले आहे.

(भा. श्रे. १०६)

६ स्कँडेनेव्हिया

नॉव स्वीडन

“ स्कंदनाभि या देशातील प्राचीन पूर्वज हिंदूस्थानातून आलेले क्षत्रिय होते. स्कंदनाभिपासून वरील नाव झाले आहे. “स्कंद” ही क्षत्रियांची देवता असून (शिवपुत्र कार्तिकेयाचे एक नाव) ‘स्कंदनाभि’ हे एखाद्या क्षत्रिय कुलाचे नाव असावे.”
– कौंट जॉर्नस्टजर्ना

एद्द – वेद

स्कँडेनेव्हियन लोकांचा प्राचीन धर्म ग्रंथ ‘एद्द’ (Edda) नावाचा असून त्याचे ‘वेदाशी’ असलेले साम्य स्पष्टच दिसत आहे. **– कौंट जॉर्नस्टजर्ना** (थियॉगनी ऑफ हिंदूज पा. १०८)

असिगर्ड

एद्द या ग्रंथात असे लिहले आहे कि, स्कँडेनेव्हियात प्रथम वसाहत करावयास निटी = जित लोक आले असून त्यांचे दुसरे नाव “ अशी ” असे होते. व त्यांचे मूळ स्थान ‘असिगर्ड’ होते “असिगर्ड = असिगड” होय. ख्रिस्तपूर्व ५०० सुमारास ‘आदित’ स्कँडेनेव्हिआत आला. व त्याचा वारस “गौतम” होय. अखेरचा बुद्ध महावीर असून (ख्रि. पू. ५३३) त्याचाही पट्टशिष्य गौतमच होता. **– कर्नल टॉड**

पुराणे

"स्कंडेनेव्हियनांची प्राचीन वीररस प्रधान पुराणे व काव्ये यांचे इकडील (राजस्थान) तसल्या वाङ्मयाशी पुष्कळ साम्य आढळतें.

– कर्नल टॉड

(राजस्थान इतिहास भाग १ पा. ६४–६८)

वारांची नावे

"सातही वारांना नावे देण्याची तऱ्हा भरतखंड व स्कॅन्डेनेव्हिया यांत सारखीच दिसून येते. (कोष्टक दिले आहे यावरून स्कंडेनेव्हियन पुराण कथांचा मूळ उगम भरतखंडच होय."— कौंट जॉर्नस्टजर्ना (हे स्वतःला स्कँडेनेव्हियन म्हणवितात)

– **थियॉगनी ऑफ दि हिंदूज** (पा. १६९)

---

७ इंग्लंड

बौद्ध ब्राह्मण

"या देशातल्या प्राचीन लोकांच्या पहिला सुगावा 'ड्रुइड' नावाचें जे मठवासी असत त्यांच्या हकीकतीत सापडतो. पोकॉक वगैरे शोधकांच्या मते हे मूळचे "बौद्धधर्मीय" ब्राह्मण पुरोहित असून काश्मिर वगैरे प्रांतातल्या रजपूत जाती बरोबर घेवुन ते ब्रिटनमध्ये वसाहत करण्यास गेले.

पुनर्जन्म – तीन देवता

"ड्रुईड लोक पूर्वजन्म व पुनर्जन्म मानीत. विश्वाची उत्पत्ती पालन व क्षय करणाऱ्या तीन भिन्न देवताही त्यांच्यात होत्या.

धर्मज्ञानरक्षण व त्याचे अध्यापन यांनाही त्यांनी सर्वस्वी आपल्याकडेच ठेवले होते."

शापदान

"ड्रुइड लोक राजाचाही मुलाहिजा न ठेवता त्यास शाप देत कोयत्याच्या झपाट्यापुढे गवत जसे तुटून पडते तसे राजेलोक ड्रुइडांच्या शापामुळे जमिनदोस्त होत. असे वर्णन आहे." **– थियॉगनी ऑफ हिंदूज** (पा. १०४)

हरहर महादेव

"ब्रिटनातील लोकांचा सुप्रसिद्ध जयघोष 'हुरा-हुरा' हा तेथील प्राचीन राजपुतांच्या 'हरो हरो' (हर-हर) या सिंहनादाचेच अपभ्रंश होय." **– 'पोकॉक'**
इंडिया इन ग्रीस (पा. १०४)

बौद्ध अवशेष

ब्रिटनातील स्टोन हेज नावाचे इमारतीचे प्राचीन अवशेष हे या बौद्धधर्मीय लोकांचेच होत.

इंदुवंशीय

"ड्रुईड–द्रुइद–द्रुई–देश–द्रुह्युदेशीय अशी यांची पूर्वपिठीका असावी, असे कित्येकांचे अनुमान आहे. द्रुइद लोक अर्धचंद्र चिन्हे वापरीत. यावरून ते इंदुवंशीय असावे."**– पोकाक**
(इंडिया इन ग्रीस)

रोमन लोकांनी ब्रिटन जिंकल्यानंतर

हे द्रुइद लोक 'आॅईल आॅफ मॅन' मधे जावुन राहिले. त्या नावाचे प्राचीनरूप 'आॅईल आॅफ मॉन' मॉनचे बेट असे होते. मॉन–सेंट असा अर्थ असून तो संस्कृत 'मुनी' सारखाच आहे. अर्थात 'आॅइल आॅफ मॉन = द्रुइदांचे 'मुनिद्विपच' होय'

– **पोकॉक** (इंडिया इन ग्रीस)

कित्येक पाश्चात्य पंडितांनी केल्टीक व संस्कृत भाषांचे व त्यातील प्रयोगांचे विलक्षण साम्य दाववून त्या भाषा बोलणाऱ्यांचा निकट संबंध सिद्ध केला आहे.

---

८ पॅलेस्टाईन

प्राचीन लोकांचे साम्य

"पॅलेस्टाईन मधील इस्रायली लोकांच्या पूर्वेची वस्ती तार्तंर देशातून आलेली असून तार्तंर व हिंदूस्थान यातील गावे वगैरेची पुष्कळ नावे एकसारखीच आढळतात.

यहुद्यापूर्वीच्या पॅलेस्टाईन मधील लोकांची व हिंदूस्थानच्या प्राचीन लोकांची मूर्तिपूजा सारख्याच स्वरूपाची आहे. आणि पॅलेस्टाईनमधील प्राचीन क्षत्रिय व भरतखंडातील राजपूत यांचे मधेही चालीरीतीत विलक्षण साम्य आढळून येते. म्हणून पॅलेस्टाईन मधील प्राचीन लोक हिंदुस्थानातून निघून तार्तर देशातून तेथे वसाहतीस गेले असावे." – **पोकॉक**

इंडिया इन ग्रीस (पा. २२९)

९ आशिया–मायनर

खाल्डिया – कुलदेव

"आशिया मायनर या प्रांतातील प्राचीन खाल्डियन लोक हे हिंदूस्थानचेच प्राचीन आर्य होते. कुलदेव नामक ब्राह्मणांनी वसाहत केलेला जो देश तो अपभ्रंश होऊन 'खाल्डिया' बनला. प्राचीन खाल्डीयन व बाबिलोनियन लोकांची संस्कृती ही हिंदुस्थानातूनच आली होती.

– **कौंट जॉनेस्टजर्ना** थिऑगनी ऑफ हिंदूज (१६८)

"पूर्वीच्या ट्रोजन महायुद्धांत अवंती (Abanti) नावाच्या एका जातीचे योद्धे सामील झाले होते ते माळव्यातील सुप्रसिद्ध अवंतीच्या राज्यातलेच होते." – **मि. पोकॉक**

इंडिया इन ग्रीस (पा. ३३)

१० इराण

पर्शिया – परशुराम

"परशुरामाचे अनुयायी परसु नावाचे असून त्यांचे मुख्यशस्त्र परशु हे होते. यांनी भरतखंडातून येवून पर्शियात वस्ती केली व त्या देशास हे नाव दिले शिवाय इफ्रेटीस हे तेथील मुख्य नदीचे नावही यु–भारत–ईश या शब्दापासूनच निघाले आहे." – **'पोकॉक'**

इंडिया इन ग्रीस (पा. ४५)

"हिंदुस्थानच्या वायव्य उत्तरभागातून येवून प्राचीन इराणी लोकांनी इराणात वस्ती केली आणि आर्य हा शब्दच नव्हे तर काही अंशी धर्मविषयही त्यांनी 'झोरीयास्ट्रीयन' धर्मात शुद्ध स्वरूपात राखले."

– 'मॅक्समूलर'

(सायंस ऑफ लँग्वेज २४३-५३)

प्राचीन इराणी किंवा पल्हवी जातीचे लोक मूळचे भारतीय क्षत्रियच असून कर्मलोपाने वृषल झाले असे 'मनुस्मृतीत' (१०-४३-४५) म्हटले आहे.

संस्कृत व झेंद भाषांचे अत्यंत निकट साम्य आहे झेंदच्या कोषातले १० शब्दातले निदान ६-७ शब्द तरी शुद्ध संस्कृत असतात हे पाहून सर विलीयम जोन्स यास फार आश्चर्य वाटले.

ऐल–ऐर–एराण

चंद्रवंशीय बुधाचा पुत्र पुरूरवा. या पुरूरव्यास त्याच्या आईच्या 'इला' नावावरून 'एल' किंवा 'एर' म्हणतात. त्याचे वंशज आपणास 'एराण' व नंतर 'इराण' म्हणू लागले. इराण व तुराण यांचेमध्ये मोठे युद्ध झाल्यावर प्राचीन इराणी लोक इराणात वसाहत करण्यास आले असे इराणचे जुने इतिहासकार लिहितात.

– मि. हौग (भा श्रे. १०२)

धर्म संकल्पनांचे साम्य

तैग्रीस नदीवर कौसी (Cossiei) नावाचे लोक प्राचीन काळी राहत होते. ते काशीहून तेथे गेले असे इतर शोधकांचे मत आहे. त्यांच्यात ब्राह्मणी धर्मातील काही बाबी संबंधाने मत-

भेद झाला व तो पुढे तीव्र होऊन त्यावर धार्मिक रणे माजली आणि अखेरीस प्राचीन इराणी लोक इराणात जावून राहिले. अश्या दोन्ही लोकांच्या देवदेवता–विभूती–यज्ञविधी–गृहसंस्कार यांची तुलना करून मि. हौग यांनी वरीलप्रमाणे मत दिले आहे. — मि. हौग (Essay ou the Parsees पा. २८७-२८८)

११ तुर्कस्थान

तुर्वसु राजाचे वंशज

'शापग्रस्त 'तुर्वसु' व त्यांचे वंशज हे तुराणीयनांचे प्राचीन पूर्वज होत.

— मॅक्समूलर
(सायंस ऑफ लँग्वेज पा. २४२)

कित्येकाचे मते तुर्क तुरुष्कांचे वंशज होत.

खोरासान

चंद्रवंशाचा यादव व बाल्हीक शाखांनी भारतीय युद्धानंतर खोरासान मधे राज्ये स्थापिली. असे जेसलमीरच्या राजपूत इतिहासात लिहिले आहे. (१०५)

१२ बलीराजा

पुराणातील बलीराजा = बोल = बेल चे साम्राज्य

असीरीयनांचा प्राचीन राजा बोले किंवा बेल (Boal-Bel) ह्या नावाचा होता. हा राजा म्हणजे भरतखंडावर कांबोडिया-

पासून ग्रीसपर्यंतच्या देशावर प्राचीन काळी ज्याचे विस्तीर्ण साम्राज्य होते. तो "बली राजा"च होय. असे कित्येक पाश्चात्य ग्रंथकारांचे म्हणणे आहे. (१०३)

१३

इजिप्त व इथिओपिया

सिंधीलोक व प्राचीन इजिप्ती

"आपण पंत म्हणून देशातून इजिप्तात आलो असे प्राचीन इजिप्ती लोकांचे म्हणणे आहे. या मूळ देशाचे वर्णन "वर-एल-बाबरी" येथील 'हासली-टोप' राणीच्या देवालयाच्या भिंतीवर चित्रलीपीने लिहून ठेवलेले आहे. या वर्णनात त्या मूळ देशातील पशू–वनस्पती व विशेषत: किमतवान लाकडे यांची जी नावे व माहिती आली आहे. ते पशु व वनस्पती निव्वळ हिंदुस्थानातीलच आहेत. ते इतर देशात उत्पन्नच होत नाहीत असे दिसते. अर्थात इजिप्ती लोकांचे प्राचीन पूर्वज हिंदुस्थानातून विशेषत: सिंधुनदीच्या मुखाजवळील भागातून तिकडे गेले असे दिसून येते. हे लोक ८–१० हजार वर्षापूर्वी जहाजात बसून समुद्र-किनाऱ्यांनी सफर करीत जे निघाले ते बलुचीस्थान–इराण अरबस्थान यांच्या किनाऱ्यांनी प्रवास करीत करीत व इराणचे आखात, अरबीसमुद्र, तांबडासमुद्र पहात पहात अखेर इजिप्तच्या न्युबिया व इथियोपिया यांच्या पूर्व किनाऱ्यावर उतरले. असे **कर्नल अल्काट** थिऑसफीस्ट मार्च १८८१ व **पोकॉक** (इंडिया इन ग्रीस पा. ४२) यांचे म्हणणे आहे.

"हिंदुस्थानातील एका राजाचा विश्वासघाताने खून केला म्हणून काही लोकांस भारतातून हाकून देण्यात आले त्यांनी इथियोपियात वस्ती केली." — 'फिलोस्टेटस्'

"सिंधू नदीच्या काळाबागजवळील प्रवाहाला नीलाब्र हे नाव आहे येथील लोकांनी इजिप्तमध्ये वसाहत केल्यानंतर तेथील मोठ्या नदीस ही (नाईल–नीला) हे नाव दिले."

नावे, शिल्प, भाषा यांचे साम्य

इजिप्तमधील इतर नद्यांची व प्रांताची नावेही हिंदुस्थानच्या नद्यांचे व शहर व प्रांताचे नावावरून पडली आहेत. काही राजांची नावे 'रामेसीस' भारतीय रामवंशावरून पडली आहेत. उभय देशातील शिल्पपद्धतीचे विषय व स्वरूप यांचेही निकट साम्य आहे. व प्राचीन इजिप्ती शब्दांचे रूपांतर व भाषांतर तर संस्कृतातून सहज व स्वाभाविक रीतीने होते."

-- पोकॉक (इंडिया इन ग्रीस पा. २०)

वांशिक संकल्पना

मि. ब्लूमेनवास यांनी जगातील निरनिराळ्या वर्णाच्या लोकांच्या डोक्यांच्या कवट्यांचा संग्रह केला असून त्यातील भारती व इजिप्ती लोकांच्या कवट्यांचा आकार व रंग यात विशेषच साम्य दिसून येते. असा प्रो. हीरन यांचा अभिप्राय आहे. (Assiatic Nations Vol. II पृ. ३७३)

प्राचीन इजिप्ती लोकांच्या रीतीभाती, समाजरचना, धर्म, समजुती राजसंस्था यांचे भारतीयांशी विलक्षण साम्य आहे असेही त्यांचे म्हणणे आहे.

१४ आफ्रिका

अबुसिनीया : आफ्रिकेतील नावे

अबुसिनीया व भारत ह्यांचा व्यापारी संबंध पुढेही पुष्कळ वर्ष चालू होता. अनेक हिंदू व्यापाऱ्यांनी त्या भागात जाऊन वस्तीही केली होती. 'ग्रॅबीया' व 'सोनिगाल' नद्यांच्या खाडीतील मुख्य व्यापारी बंदरास जी नांवे आहेत त्यांची अंत्यक्षरे कुंड अशी आहेत. उदा. तंबाकुंड = ताम्रकुंड.

(भा. श्रे. १००)

जर्मन इस्ट आफ्रिकेतही मोठ्यामोठ्या पर्वतास मौटं शंभू व मौंट मेरू अशी नांवे दिलेली आढळतात.

मंगो पार्क ने आफ्रिकेत केलेल्या प्रवासाचे वर्णन लिहीले असून त्यातील ज्या शहरे वगैरेंची नावे संस्कृत किंवा संस्कृतोत्पन्न आहेत त्यांची एक यादीच **एशियाटिक जर्नल** (Vol IV P. ३२४) मध्ये लिहली आहे.

१५ आशिया युरोपचा उत्तर भाग

'सुमेरू व पेशवारून'

आशिया व युरोपच्या उत्तरेस राहणारे प्राचीन "हायपरबोरियन" लोक हे मूळ खैबरपुरहून येवून वसाहत करून राहिलेले होते. खैबरपुरी लोकांची दुसरी वसाहत 'थेसली' प्रांतात 'किनिक्स' नदीचे तीरी झाली होती. व ते लोकही आपणास खिफारा किंवा 'खिफेरा' म्हणवीत.

हायपर बोरियनांच्या शेजारचे लोक 'पेशवारून' हे असून त्यांनी "तोमारोस" पर्वताचे दक्षिणेस वसाहत केली होती. तोमारस–सुमेरू व पेशवारून लोक–पेशावरचे असून त्यांचे ग्रीक भाषेत 'पासारोन' असे रूप झालेले आढळते.

– "**पोकॉक** (इंडिया इन ग्रीस पा. १२७–१२९)

---

१६ सैबेरिया

यादवांचे वंशज

'सैबेरीयातील' "सामोयेदीज" व 'जोदीस' जातीचे लोक हे शाम यादवांचेच वंशज असून त्यांची भाषा संस्कृतला जवळ आहे. सायबेरीयात जातांना वाटेत मध्य आशियात ते जेथे थांबले त्यास अद्याप यदूची डांग (टेकडी) असे म्हणतात.

यादवांच्या काही शाखा झाबुलीस्थान व समरकंद या भागात गेल्या व गझनी ही त्यांनीच वसवीली. – **कर्नल टॉड**

(टॉडकृत राजस्थानचा इतिहास भा. १. पा ८५)

कृष्ण कथा

"जिस देश मे कृष्ण को गिसनखान कहते है." या लेखात डॉ. लोकेशचंद्र (राष्ट्रधर्म मासिक जाने १९७३) यांनी सैबेरियातील लोकबोलीतील कृष्णकथांचे वर्णन केले आहे.

युरोपचे प्राचीन रूप संस्कृत

युरोप या शब्दाचे प्राचीन मूळ रूप यु+रूप (सु+रूप) असे आहे. संस्कृत 'सु' व ग्रीस 'यु' यांचा अर्थ एकच आहे.

– **कर्नल टॉड** (राजस्थानचा इतिहास पा. ८५)

१७ अमेरिका

प्राचीन काळी बहुतेक उत्तर अमेरिका खंड दाट जंगलाने व्याप्त झालेले होते. पण मध्य व दक्षिण अमेरीकेची स्थिती तशी नव्हती.

प्राचीन शहरे–किल्ले–पूल–तलाव–पाट–रस्ते याचे अवशेष–**बॅरन हंबोल्ट** वगैरे प्रवासी व इतर संशोधक यास तिकडे इतके सापडले आहेत की, प्राचीन काळी या खंडात अत्यंत सुधारलेले लोक राहत होते या बद्दल आता संशय राहिलेला नाही. या अवशेषांच्या शिल्पाचे स्वरूप भारतीय शिल्पपद्धतीशी फारच जुळते. प्राचीन अमेरिकनांच्या धार्मिक चालीरीती व समजुती यातही खूप साम्य आढळते.

(१) भारतीय लोक ज्याप्रमाणे धरित्रीमाता किंवा पृथ्वीमाता ही एक देवता मानतात त्याचप्रमाणे प्राचीन अमेरीकन मानीत.

(२) बौद्ध हिंदू व मारवाडी लोक ज्याप्रमाणे बुद्ध, कृष्ण व अजयपाल यांच्या दगडावर उमटलेल्या पावलांची पूजा करतात तीच तऱ्हा मेक्सिकन लोकांत आहे.

(३) ग्रहणकाळी राहू-केतू चंद्र सूर्यास गिळतात या भारतीय कल्पनेप्रमाणेच अमेरीकनांची समजूत असून त्यांचा राहू-केतू 'माल'-'ओयो' नावाचा आहे.

(४) **देवतासाम्य**-भारतीय शिव काली यांचे प्रमाणे अमेरीकन धर्मसंस्थापकांचे व उपाध्यायाचे चित्रातही गळ्याभवती सर्पांची वेटोळी काढतात.

(५) **गणेशपूजा**- गजवदन गणेशाच्या मूर्तीची पूजा मेक्सिकन लोकातही आढळते. हा प्रकार पाहून '**बॅरन हंबोल्ट**' यांनी असे लिहीले आहे की, It presents some remarkable and apperently not accidental resemblance with the Hindus Ganesh. ही मेक्सिकन देवता हिंदूंच्या गणेशासारखी थेट असून हे आश्चर्यकारक साम्य केवळ आकस्मिक आलेले दिसत नाही.

(६) जलप्रलयाची कल्पना अमेरिकनातही आहे.

(७) पृथ्वी एका प्रचंड कूर्माचे (कासवाचे) पाठीवर असून ते कासव समुद्रावर पोहत आहे व ते कासव जेव्हा समुद्रात बुडते तेव्हा पृथ्वीवर जलप्रलय होतो ही कल्पना उत्तर अमेरिकेतील इंडियनात आहे.

(८) **सर्प व नाग यांची पूजा**- हिंदू व प्राचीन अमेरिकनातच आहे असे नव्हे तर इजिप्ती-सिरीयन-ग्रीक-चीनी-स्कँडेनेव्हियन या लोकांच्या पुराणग्रंथातूनही आढळते.

(९) **पुनर्जन्म**- प्राचीन अमेरिकन लोक पूर्वजन्म व पूनर्जन्म ही मानीत.

(१०) **भारतीय वेश**– मूळच्या अमेरिकनाचा वेश हिंदू-प्रमाणेच असून ते वाहणाच वापरीत. त्यांच्या स्त्रियांची लुगडे नेसण्याची पद्धत थेट भारतीय होती.

(११) **रामलीला**–दक्षिण अमेरिकेतील ही भारतीय वसाहत केव्हा झाली हे नक्की कळत नाही पण ही वसाहत रामाचे कालानंतर केव्हा तरी झाली असली पाहिजे. कारण पेरू देशातील मूळच्या अमेरिकनांचा मोठा उत्सव. उत्तर हिंदू-स्थानातल्या प्रमाणे 'रामलीलेचाच' आहे. येवढेच नव्हे तर या उत्सवात ते 'रामसित्वा' असेच म्हणतात. राम हा सूर्य-वंशीय असून त्याच्या आईचे नाव 'कौसल्या' व पत्नीचे नाव सीता असेच पेरूवियन लोक सांगतात. हे पाहून सर **विल्यम जोन्स** वगैरे शोधकास फार आश्चर्य वाटले.

हिंदू संस्कृतीचे संस्कार

"हिंदू आणि मंगोलियन आकृतीचे हजारो लोक अमेरिकेत हिंदू चालिरीती पाळतात.

हिंदू देवता गणेश इंद्र वगैरेची पूजा करतात. हिंदूची शिक्षणपद्धती प्रमाणे गुरुसेवेसाठी मुलांना गुरुगृही पाठवितात. ब्राह्मण पुरोहित विवाह संस्कार करतात. प्रेताला अग्नीने दहन करतात. पती मेल्यानंतर सती जातात किंवा भारताप्रमाणे विधवा वैराग्य धारण करून पवित्र आचरणाने जीवन घालवितात. या सर्वांवरून एकच गोष्ट सिद्ध होते की हिंदू आणि मंगोलियन लोक प्राचीन काळी अमेरिकेत खूप संख्येने जलमार्गाने किंवा स्थलमार्गाने पोचले होते."

– **कोलंबस** (अमेरिकेचा शोध लावणारा युरोपिअन)

(हिंदू अमेरिका–चमणलाल भिक्षू)

सदाचार सत्यप्रियत्व आणि कठोर शिक्षा

प्राचीन अमेरिकन संकृतीचे लोक अत्यंत सदाचचारी होते स्पॅनिश लोकांना ते पाहून आश्चर्याचा धक्का बसला "येथील लोकांची धार्मिक भावना आणि असत्याची घृणा पाहून पॅनिश लोकांना अत्यंत आश्चर्य वाटले. सत्य आणि सदाचाररण करण्यासाठी येथे फार कठोर नियम होते. नियम भंगासाठी शिक्षाही फार कडक होत्या ते पाहून भारतीय स्मृतिकालीन कठोर न्यायालयीन शिक्षांची आठवण होते. – **फ्रेडरिक टॉमसन**

माया, इन्का व आस्तिक संस्कृती

मध्य अमेरिकेची 'माया संस्कृती' दक्षिण अमेरिकेतील 'इंका संस्कृती' आणि मेक्झिकोतील 'आस्तिक संस्कृती' ह्या तीन्ही सस्कृती भारताच्या ऋषिकुल पद्धतीच्या शिक्षणप्रणाली शिकविणाऱ्या होत्या. पुरोहिताकडून शिक्षण दिले जाई. मुलांना गुरुगृही पाठवित. मुले गुरुसेवा करीत. धार्मिक व नैतिक शिक्षण घेत. कठोर नियमाचे पालन केले जाई ब्राह्म-मुहूर्तावर उठणे, स्नान करणे, अघमर्षन करणे वगैरे नित्यक्रम असे. जातीनुसार वेगवेगळे शिक्षण मिळे. धार्मिक यज्ञ–अग्नि-पूजा–युद्धकला–शारिरीक शिक्षण वगैरे सर्व पाहून प्राचीन भारताचीच आठवण होते." – **भिक्षू चिमणलाल** (हिंदू अमेरिका)

रामाची विजययात्रा

"जर गंगेपासून नील नदीपर्यंतच्या इतिहासावरील आवरण काढून टाकले तर असे दिसेल की, रामाची विजय यात्रा प्रथम-पासून 'ऑरगोनॉटस' प्रमाणे लक्षात येईल. अलेक्झांडर जर खुश्कीच्या भूमिमार्गाने पंजाबपर्यंत जावू शकतो तर कोसल

सम्राट सागरवंशाचे समुद्रराज नावाचे प्रसिद्ध असलेले ६० हजार सगरपुत्र जे कुशल नाविक होते ते जगात पसरू शकत नाहीत काय?

– कर्नल टॉड

"भारतातील समुद्रराज नावाच्या अयोध्येच्या सम्राटाने मिस्र (इजिप्तवर) देशावर आपले स्वामित्व स्थापन केले व नंतर हा प्रभाव अमेरिकेत गेला.

– कर्नल टॉड

(पण असे साम्राज्य आणि आक्रमण मानण्याचे कारण नाही. श्री गुलाबराव महाराजांचा विश्वव्यापक आर्य संस्कृतीचा सिद्धांत मान्य झाला की आपोआप सर्वांची संगती लागते).

ऋषींचे विश्वभ्रमण

"मी अत्यंत सावध राहून कठोर परिक्षणे केली आहेत केवळ सिद्धांतच नव्हे तर शब्दांच्या समानतेमुळे मी आश्चर्य चकित झालो आहे त्यांची एकरूपता आणि असंख्यता पाहून असे वाटते की प्राचीन अमेरिकेचे मनोवैज्ञानिक परिक्षण हे असे विलक्षण व्याकरण आहे की ज्याच्या अभ्यासामुळे आपल्या युरोपियनांच्या जगदभ्रमणापेक्षा पूर्वीचे प्राचीन भारतीय ऋषींचा विश्वभ्रमणाचा वृत्तांत सत्य म्हणून स्वीकारावा लागतो. व त्याचे पुरावे आजही मोठ्या प्रमाणात सापडतात.

– पोकॉक (उपसंहार)

१८

पेरू देश

सूर्यवंशी–पेरूवियन

"पेरू देशातील लोक रामाला सूर्यवंशी कौसल्यापुत्र आणि सीतापती मानतात. आणि पेरूवियन इंका संस्कृतीचे

लोक स्वत:लाही अभिमानाने त्याच सूर्यवंशातील मानतात. आणि दसऱ्याचे वेळी 'रामसित्वोत्सव' (रामलीला) राम-सीता-उत्सव मोठ्या धुमधडाक्याने करतात. **— जोन्स**

(प्रख्यात अमेरिकन इतिहासकार)

वेश्याविरहित देश

मेक्सिको प्रमाणे पेरू देशातही ख्रिस्ती येण्यापूर्वीच्या आर्यसंस्कृतीची चिन्हे पहावयास मिळतात. लोक पुनर्जन्मावर विश्वास ठेवीत. वर्ण जातीचे भेद होते. आश्रमधर्माचे पालन करीत असत. पेरूचे लोक उद्योग शीलता–सदाचार आणि शिष्टतेसंबंधी विख्यात होते. चोरीचे नाव नव्हते. देवता इंद्र स्वर्ग यावर त्यांची श्रद्धा होती. मुख्य म्हणजे 'वेश्या विरहित' देश म्हणून पेरूची ख्याती होती.

— भिक्षु चमनलाल (हिंदू अमेरिका.)

---

१९ मेक्झीको

स्त्रियांचे पावित्र्य

"अमेरिकेत जागोजागी मंदिरे होती. लोक रोगी बालकांना देवाला अर्पण करीत व ती बालके आमरण देवाची सेवा करीत. कुमारिकांनाही फार कठोर नियम आणि पवित्रता पालन करावी लागे. अजूनही मेक्झिकोतील प्राचीन संस्कृतीच्या मुली व स्त्रिया वडील; पती किंवा भावाला बरोबर घेतल्या शिवाय संध्याकाळी रात्री बाहेर जात नाहीत.'

— भिक्षु चमनलाल (हिंदू अमेरिका)

मेक्झिकोतील राज्याभिषेक

राज्यभिषेकाची पद्धत भारतीय होती राजाच्या गळयात जानवे असे. पुरोहित राज्याभिषेक करून राजाच्या मस्तकावर राजमुगुट ठेवी. मृतराजाच्या जेष्ठ पुत्र हा जमिनीचा उपभोग घेई. — भिक्षू चमनलाल

महाभारत

हिंदूनी आपल्याबरोबर मेक्सिकोमध्ये पांडवांचे १८ पर्वांचे महाभारत-वर्णाश्रम-व्यवसाय आणि भारतीय बाजाररहाटाच्या पद्धती आणल्या. — ह्युरेट

२० ऑस्ट्रेलिया

सुदर्शन चक्र

आस्ट्रेलियात सापडणारे बरेच अवशेष भारताशी संबधित असलेले आढळतात. तेथील रानटी लोक 'बूमरँग' नावाचे एक लाकडी हत्यार वापरतात. याचा आकार बांकदार व टोकाकडे चपटा असून ते शत्रूस प्रहार करून फेकणाऱ्याकडे पुन्हा परत येते शत्रूस प्रहार करूनही पुन्हा पुन्हा वर्तूळाकार गतीने परत येणाऱ्या व भारतात वर्णीलेल्या चक्राची (सुदर्शन चक्र) ही नक्कल असावी. (भा. श्रे. १११)

२१ जावा–सुमात्रा

अमेरीकेतील पेरू देशाकड़े जाणाऱ्या लोकांनी जावा

व सुमात्रा द्विपसमूहात वस्ती केली होती. हे लोक सूर्यवंशीय क्षत्रिय होते त्यांच्या पुराणकथा व ऐतिहासिक वीरकथा अजूनही तिकडील देवालयात चित्रित केलेल्या व ग्रंथात लिहलेल्या आढळतात. कलिंगातील ब्राह्मणादि लोकांनी प्रथमत: जावा बेटातील मूळच्या लोकांना सुधारून राज्ये स्थापिली. तेथे त्यांचा जूना शक अद्याप चालू असून त्याचा आरंभ इ. पूर्व ७५ आहे. **—एलफिस्टन**

हिंदूस्थानचा इतिहास–पा. १६८

२२ बोर्नियो

बोर्नियो या बेटावर हिंदू पुराणातील कथांची चित्रे काढलेली अनेक देवळे या बेटातील अर्न्तभागीही आहेत. किनाऱ्यापासून ४०० मैल आत असलेली देवळे तर फारच श्रेष्ठ शिल्पकलेची दर्शक आहेत. (११०)

२३ बालीबेट

जावाचे पूर्वेस असलेल्या बालीद्विपात तर हिंदूलोकांचे वंशज राहत असून त्यात रामायण महाभारताच्या काव्याच्या प्रतीही त्यांच्या भाषेत आढळतात.

२४ चीन

चीनची मूळ वसाहतही मूळची हिंदूस्थानातील लोकांनीच केली. चीत व तार्तरी यातील प्राचीन वंशावळीत मूळ

पुरुष 'अवर' हा दिलेला आहे. तो पुरव्याचा पुत्र होता
– कर्नल टॉड राजस्थानचा इतिहास भाग १ पा. ३५.

चिनी लोकांच्या धर्म व संस्कृती यांचा उगम भारतात आहे. हे सांगावयाला नकोच. खुद्द चीन हे नांव संस्कृत असून बायबलात त्याचे रूप 'सिनिम' असे आढळते.
(रॉयल एशिआटीक सोमायटी जर्नल भा. ९)

२५ जपान

जपानमधील सर्वमान्य **शिण्टो** पंडित श्री **रिंगतारो नागासाचा** यांचे असे म्हणणे आहे की, "प्राचीनकाळी बुद्धपूर्व काळात जपानला ब्राह्योनोकयो (ब्राह्मणत्व) म्हणत असत.
(India in Japan पृ. ८३)

भिक्षू चमनलाल यांनी संशोधन केल्यानुसार त्यांच्या हिंदू जपान या पुस्तकात बुद्धपूर्व प्राचीन आर्यसंस्कृतीचे अनेक दाखले दिले आहेत त्यापैकी काही पाहू –

(१) सामुराई योध्याची "हाराकिरी" (आत्मबलिदान) आणि राजपुत्रांचा "जोहार" एका समान मनोवृत्तीचे द्योतक आहेत.

(२) टोकियो मध्ये बुद्धपूर्वकाळापासून अस्तित्वात असलेल्या मंदिरात इंद्राची मूर्ती आहे. तसेच भिंतीवर मत्स्यावतार-वराहावतार वगैरेच्या चित्रावली सुशोभित आहेत.

(३) जपानची जुनी राजधानी "**नारा**" येथील प्राचीन

बुद्धमंदिराच्या प्रवेशद्वारावर 'वेणु वाजविणाऱ्या श्रीकृष्णाची मूर्ती" खोदलेली आहे.

समाज चालीरीती व संस्कार

१– श्राद्ध –जपानी भाषेत ओबोन (पृ १०५)

२– पितरांना भातांचे पिंड देऊन तृप्त करणे (पृ १०६)

३– होमहवन–जपानी भाषेत गोम.

४– प्रातःकाळी पूर्वाभिमुख होऊन सूर्याची उपासना करणे.

५– मंदिरात "ताईका" म्हणजे घंटी वाजविणे.

६– "नमो अमिदबुत्सु" या मंत्राचा, १०८ मण्यांची माळ घेऊन जप करणे.

७– कार्तिक स्ननाप्रमाणे 'कान' मास (जानेवारी ते फेब्रुवारी) महिन्यात प्रातःस्नान करणे.

२६ पूर्व आशिया

ब्रह्मदेशाप्रमाणे कांबोडीया हा शब्दही संस्कृतोत्पन्न आहे. कांबोजपासून 'कांबोडिया' हे रूप बनले आहे. एरियन नामक ग्रीक इतिहासकाराने "कंबिस्थोली" असे एका जातीचे नांव दिले आहे. त्याचे मूळरूप अर्थातच कंबस्थळ असे असले पाहिजे. या कंबस्थळातीत लोकांनी कंबजांनी कांबोजांनी कांबोजियात वस्ती केली असली पाहिजे.

– **विल्सनचे विष्णुपुराण** (भाग २ पा. १८२)

या कांबोडियात १८८२ साली एका मोठया हिंदू देवालयाचे अवशेष एका फ्रेंच संशोधकाने जमिनीतून उत्खनन करून बाहेर काढले.

परिशिष्ट २

विकृतिकरणाची नियमबद्ध योजना

भारताच्या हजारो वर्षांच्या इतिहासात भारतीय संस्कृतीवर आक्रमणे झालीत. परंतु ती सर्व प्रामुख्याने राजकीय स्वरूपाची होती. मुसलमानांनी हजार वर्षे राज्य केले. त्यानी भारतीय भाषा, भारतीय वेष, ललितकला वगैरे वर थोडाबहुत प्रभाव टाकला परंतु भारतीय समाजमनाचे भावविश्व अस्पर्श असेच राहिले. कारण मुसलमानांच्या पाशवी शक्तिपुढे भारतीय समाज जरी दुर्बळ ठरला तरी त्याचे भावविश्व, विद्यासाम्राज्य आणि नैतिक अधिष्ठान अतिशय समृद्ध असल्याने ते कायम टिकून राहिले. इस्लामी आक्रमणापूर्वी अनेक आक्रमणे झालीत. आणि ती सारी भारतीय संस्कृतीशी एकरूप होऊन गेली. याचे कारण असे की, भारतीय ज्ञान–धर्म–नीती यांच्या भव्यतेला दिपून जाऊन सर्व परकीयांनी स्वत:ला भारतीय संस्कृतीत सामावून घेण्यात धन्यता मानली. आणि ज्यांना परत आपल्या देशात जावे लागले त्या अलेक्झांडर वगैरेंनी येथील विद्वान निस्पृह मुनींना आपापल्या देशातील ज्ञानक्षेत्रे समृद्ध करण्यास स्वत:बरोबर नेले आणि अरबस्थान इजिप्त वगैरे पासून युरोपपर्यंत गणित–ज्योतिष–नाटकादि ललितकला–धर्म–नीती यांचे लोण पोचविले. परंतु नंतर इस्लामच्या पाशवी आक्रमणांनी अतिशय प्राचीन विद्याशाखांची समृद्ध

परंपरा कायम राखणाऱ्या नालंदा तक्षशीला वगैरेतील प्रचंड ग्रंथसंपत्तीच्या विध्वंस केला. इतिहासाच्या सुवर्णस्मृतींना आगी लावल्या. मंदिरे उध्वस्त केलीत. भारतीयांना अत्यंत पवित्र वाटणाऱ्या स्त्रियांच्या शीलाला भ्रष्ट केले. त्यामुळे प्राचीन विद्याशाखांचे-धर्माचे-नीतीचे रक्षण कणण्यासाठी आणि आपले भावविश्व जपण्यासाठी भारतीयांना संकोचित वृत्तीचाहि आधार घ्यावा लागला.

इंग्रजांनी १८ व्या शतकात भारताच्या पुण्यभूमीवर पाय रोवले आणि सर्व देश पादाक्रांत करण्याचे मनसुबे रचले. ४० कोटी हिंदुजनतेला ख्रिश्चन करण्याचे स्वप्न ते पाहू लागले. त्यासाठी त्यांनी भगीरथप्रयत्न सुरू केले. १५ ऑगस्ट १८११ रोजी इंग्लंडच्या कर्नल बोडन याने ऑक्सफोर्ड विद्यापीठात देणगी देऊन संस्कृत अध्यापनाची चेअर स्थापन केली.

"हिंदूंच्या संस्कृत धर्मग्रंथांचा अभ्यास करून हिंदूंना ख्रिश्चन बनविणे," या उद्देशानुसार या ट्रस्टने शिक्षणक्रम सुरू केला. मोनियरने विलीयमने आपल्या संस्कृत– इंग्रजी डिक्शनरीच्या प्रस्तावनेत ट्रस्टचा हा उद्देश स्पष्ट लिहिलेलाच आहे.

मेकालेचा " टी. बी. "

पुढे १८३४ मध्ये टी.बी. मेकाले भारतातील शिक्षणप्रमुख झाला. त्याने संस्कृत पाठशालांची अनुदाने बंद केली व कॉलेजातील संस्कृतच्या तथाकथित तुलनात्मक अभ्यासाला प्रोत्साहन दिले. त्याच्या १२–१०–१८३६ च्या पत्रात तो आपल्या पित्याला लिहितो की,– "मी ठरविलेल्या पद्धतीने शिक्षण चालू राहिले तर पुढील तीस वर्षात एकही हिंदू त्यांच्या धर्मावर नितांत

श्रद्धा ठेवू शकणार नाही. ‹एकतर ते ख्रिस्ती होतील किंवा केवळ पॉलिसी म्हणून हिंदू राहतील. हिंदुधर्मात बाह्यता ढवळाढवळ न करता, त्यांचे धार्मिक स्वातंत्र्य कायम ठेवून केवळ ज्ञानप्रसाराने आपले उद्दिष्ट साध्य होईल."

ही मेकालेची आन्तरिक इच्छा केवळ बंगाल बद्दलच नव्हे तर साऱ्या हिंदुस्थानाबद्दल पूर्ण झालेली दिसून येते. पंडित नेहरूंनी तयार केलेल्या भारतीय संविधानातील **धर्मनिरपेक्ष राज्यपद्धतीचे बीज** आणि स्वातंत्र्य वीर सावरकरांचे **जाज्वल्य पण धर्मश्रद्धाविरहित हिंदुत्वनिष्ठेचे मूळ**, मेकॉलेच्या याच शिक्षण पद्धतीचे फलित आहे. असे दुर्दैवाने म्हणावे लागते.

पंडित मोक्षमुल्लर

इ. स. १८५४ साली लॉर्ड मेकॉलेने मॅक्समूलरला इंग्लंड-मध्ये भेटीस बोलाविले. त्याने वेदांचे भाषांतर करण्यास मॅक्समूलरला प्रवृत्त केले. ब्रिटिश सरकार, ईस्ट इंडिया कंपनी व बोडन ट्रस्ट या 'धर्मपरिवर्तनाच्या पवित्र कार्यासाठी' लाखो रुपये व्यय करण्यास तयार असल्याचे आश्वासन त्याला दिले. १८५५ साली मॅक्समूलरने हिंदुलोकांची वेदावरील श्रद्धा भ्रष्ट करण्याच्या "पवित्र कार्याचा" शुभारंभ केला. त्याने सन १९०० पावेतो वेदांची भाषांतरे व संस्कृत साहित्याचा गाढा अभ्यास करून तुलनात्मक दृष्टीने खूप लेखन केले या त्याच्या लिखाणात त्याने केलेली वैदिक व संस्कृत वाङ्मयाची स्तुती खरोखर अप्रतीम आहे. आज सर्व जगात संस्कृतला आणि प्राचीन भारतीय संस्कृतीला मानमान्यता मिळालेली दिसून येते. या श्रेयाचा काही वाटा मॅक्समूलरचा नक्कीच आहे. आजही

संस्कृतचे प्राध्यापक आणि तौलनिक अभ्यास करणारे संस्कृतचे विद्वान मॅक्समूलरचा गौरव करण्यात भूषण मानतात व ते काही मर्यादेपर्यंत योग्य देखील आहे. परंतु मॅक्समूलरचा या कार्यामागील आंतरिक हेतु त्याच्या अनेक पत्रांतून व्यक्त झालेला आहे. तो मात्र अत्यंत भयानक आहे. त्यामुळे त्याने केलेले अवाढव्य थोर कार्य विषमिश्रित अन्नाप्रमाणे भारतीय संस्कृतीला घातक ठरले आहे. ही त्याची पत्रे १९०२ साली त्याच्या पत्नीने प्रसिद्ध केली. "लाईफ अँड लेटर्स ऑफ फ्रेडरिक मॅक्समूलर" खंड १ व खंड २, या ग्रंथात किती तरी पत्रे त्याचे वेदाविषयीचे अंतरंग उघड करून दाखवितात. गुलाबराव महाराज एका प्रश्नाचे उत्तर देताना म्हणतात—

प्रश्न- मोठे कामे केली असताही केव्हा शोभत नाही ?
उत्तर- मनात अभिलाष असतो तेव्हा! (साधुबोध ४०५)

मॅक्समूलरच्या अन्तःकरणातील– "भारतीयांची प्राचीन संस्कृतीबद्दल असलेली निष्ठा उखडून फेकण्याबद्दलची अभिलाषा"–त्याच्या पत्रातून व्यक्त झाल्यामुळे त्याने केलेले भव्य दिव्य कार्य देखील अशोभनीय ठरत आहे. मोठ्या मनाला शोभा न देणारी हिंदूंना ख्रिश्चन करण्याची विकृत अभिलाषा स्पष्ट होणाऱ्या पत्रातील काही स्थळ लक्षणीय आहेत—

(१) वेदाचे उच्चाटण

"तीन हजार वर्षांपासून हिंदू हृदयावर अधिकार गाजविणाऱ्या **वेदांचे मूळ उखडून फेकून द्यावयाचे असेल तर** (वेदांचे भाषांतर) हाच एक उपाय आहे."

(पत्नीला पत्र ९ डिसेंबर १८६६)

(२) वेदधर्म निकृष्ट

"सर्व जगातील धर्मात पहिला क्रम नव्या कराराचा (बायबलचा) लागेल. २– नैतिक दृष्टीने दुसरा क्रम कुराणाचा लागेल. ३– जुना करार, ४– बौद्धांचा त्रिपिटीक; ५– ते ओते, ६– कन्फ्युशस पंथ (चीनी), ७– वेद व शेवटी ८– अवेस्ता (पार्शी) या सर्व ग्रंथात महापुराचे (प्रलयाचे) वर्णन आढळते. वेदात त्याचे केवळ वर्णन आहे. तर जुन्या करारात त्याचा नैतिक अर्थ सापडतो. ते "शिक्षण" आहे म्हणून **वेदांचा क्रम खाली घसरतो**." (मुलाला पाठविलेले पत्र)

(३) वेदाचे फाजील महत्व : दयानंदांवर टीका

"धोक्याच्या सूचना (१) दयानंद सरस्वती सारखे लोक **वेदांना फाजील महत्व** देतात. मुळात नसलेला अर्थ कल्पितात. (२) वेदांकडे केवळ तो ऐतिहासिक ग्रंथ आहे या दृष्टीने पहा. त्यात प्राचीन सरळ स्वभावाच्या माणसांचा विचार आहे. त्यातील काही भाग स्तुत्य वाटेल; परंतु त्यात जर बाष्पयंत्रे, विद्युत, नीती, व तत्त्वज्ञाने शोध लागले तर वेदांचे वास्तविक महत्व संपलेच म्हणून समजावे."

(बैरामजी मलबारीला पत्र २८ जाने. १८८२)

(४) निरुक्तकारांनी सायणाचार्यांनाहि फसविले

ग्रिफिथने केलेले ऋग्वेदाचे इंग्लीश भाषांतर (प्रस्तावना पा. ११) वर मॅक्समूलर लिहितो– "ब्राह्मण ग्रंथाचे लेखक कपोलकल्पित धार्मिक मतवादांनी अंध झाले होते. त्यानंतरच्या **निरुक्तकारानी** तर धातुवादाच्या खोट्या अवडंबराखाली

सामान्य जनतेला धोका दिला आहे. ब्राह्मण व निरुक्ताच्या लेखकांनी मिळून, आपल्या विद्वत्तेच्या बळावर सायणा सारख्या बुद्धिमान भाष्यकाराला देखील फसविले आहे."

(५) चूक मिशनऱ्यांची

"भारतीय **प्राचीम धर्माचे पतन झालेच आहे**. अजूनही ख्रिश्चन धर्म भारतात प्रचलित होत नाही तर यात दोष कोणाचा ? (माझा नसून मिशनऱ्यांचा आहे)."

(भारतमंत्री ड्यूक ऑफ आर्गायलला पत्र १६-१२-१८६८)

(६) हिंदूनो ख्रिस्ती व्हा

"हिंदुधर्माला शुद्ध करून ख्रिश्चन धर्माच्या जवळ आणण्याचा मी प्रयत्न करीत आहे. तू व केशवचंद्रसेन सारखे लोक **ख्रिश्चन धर्माचा स्वीकार उघडपणे कां करीत नाहीत ?**"

(एन. के. मुजुमदार, ब्रह्मसमाजिस्ट कलकत्ता याला पत्र ३०-१०-१८९९
पान ४१०–४१९)

(७) मॅक्समूलरच्या कार्याचे सार्थक (?)

तुझे (मॅक्समूलर) हे कार्य भारतातील धर्मपरिवर्तनामध्ये नव युगाची निर्मिती करेल. तुला हे स्थान दिल्याबद्दल ऑक्सफोर्ड विद्यापीठाचे अभिनंदन. **तुझ्या या मूलभूत व चिरकाल टिकणाऱ्या कर्तृत्वाने संपूर्ण भारत ख्रिस्ती होईल.** जुनाट आणि खोटचा वैदिक धर्माची–ईश्वरीकृपेने परिपूर्ण असलेल्या ख्रिस्ती धर्माशी तुलना होईल व ख्रिश्चनांनाही स्वधर्माचे श्रेष्ठत्व पुनः पटेल. यातच **तुला कार्याचे सार्थक** आहे.

(इ. बी. पुसीचे मॅक्समूलरला पत्र)

यावप्रमाणे संगनमतकरून फसविण्याचा भयानक आरोप वैदिक भाष्यकारांवर मॅक्समूलरने केला आहे. एकीकडे स्तुति व त्यात हेतुगर्भ असलेली निंदा पाहून–थोडा सूक्ष्म विचार केला तर मॅक्समूलरच्या विष गळी उतरविणाऱ्या गोड भाषेची खरोखरीच तारीफ करावीशी वाटते.

या पद्धतीने जगासमोर प्रसिद्ध केलेल्या लेखनातून भारतीय परंपरेची स्तुती केलेली आणि अंतरंग मात्र ख्रिस्तीकरणाच्या अभिलाषेने झांकाळून गेलेले असे मॅक्समूलरचे दुहेरी व्यक्तिमत्व व्यक्त झालेले आहे. म्हणून सत्य वस्तुस्थिती भारतीय विचारवंतापुढे येणे अगत्याचे आहे.

शिक्षणाचे स्वरूप

मॅक्समूलर नंतर मॅकडोनल बोडन प्रोफेसर झाला. त्याने ख्रिस्ती विचारदृष्टीला वैदिक अभ्यासात चिरस्थायी स्वरूप देण्यासाठी ग्रंथरचना केली. (१) वैदिक रिडर फॉर स्टुडंड्स (२) वैदिक मायथॉलॉजी (३) वैदिक ग्रामर. ही पुस्तके ऑक्सफोर्ड विद्यापीठात वैदिक विद्यार्थीसाठी प्रचालित केली. आजही भारतात वेद शिकण्यासाठी विद्यापीठातून यांचाच उपयोग होत असतो.

"आर्य भारताच्या बाहेरून आक्रमक म्हणून आले. त्यांनी द्रविड, कोल, भिल्ल, संथाल वगैरे "आदिवासींना" जिकले. त्यांचा क्रूरपणे संहार केला. त्यांना दास-दस्यु म्हणून गुलाम केले आणि आर्य संस्कृती देऊन शूद्र बनविले." असा विचार 'केंब्रिज हिस्ट्री ऑफ इंडिया' मध्ये मांडला व त्याची वैदिक संस्कृत विद्यार्थींना संथा दिली.

पुढे भारतात लाहोर येथे ए. सी. बुलनरला ओरियंटल कॉलेजचे आणि टी. एच. ग्रिफितला बनारस कॉलेजचे प्राचार्य केले गेले. हेच दोघेजण वैदिक वर्ग घेत असत. शिक्षणक्रम अर्थातच ऑक्सफर्ड प्रमाणे असे. हुषार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन इंग्लडला पाठविले जाई. तुलनात्मक अभ्यासाच्या गोंडस नावाखाली सायणाचार्यादि भारतीय वेदभाष्यकार कसे चुकले या दृष्टीने संशोधन केल्यास त्यांना शिष्यवृत्ती आणि पीएच. डी. सारख्या पदव्या मिळत. पुढे लठ्ठपगार सिव्हिल-लाईन मधील बंगले आणि प्रोफेसर किंवा प्राचार्यांचे पद दिले जाई. अशा प्रलोभनांना बळी पडून भारतीय विद्वानांनी स्वतंत्र विचार करणे सोडून दिले आणि "आर्य हा एक-वंश आहे तो आक्रमक म्हणून भारतात आला त्याने मूळच्या रहिवाशांना गुलाम करून शूद्र केले" वगैरे सारखे विषाक्त असले खोटे विचार भारतीयांच्या बुद्धीत भरविण्यात भारतीय विद्वानांनीही हातभारच लावला.

या प्रमाणे ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आंगल सत्तेच्या साहयाने शिक्षणात आमूलाग्र बदल केला आणि–

दुसरा पराभव

एकदा सैन्यबळावर जिंकलेल्या भारतावर पुनः दुसऱ्यांदा शिक्षण क्षेत्रात अप्रतिम विजय मिळविला.

"India has been conquard once. But India must be conquard again. The second conquest should be a conquest by education."

(Life and Letters of Fredrik – **Maxmuler PP. 377 Part 1**)

हे मॅक्समूलरचे शब्द इंग्रजांनी आणि इंग्रजीला वाघिणीचे दूध समजणाऱ्या आंग्ल विद्याविभूषित भारतीयांनी खरे करून दाखविले.

शिक्षणाच्या माध्यमातून जिंकला गेलेला भारत अजूनही बौद्धिक पारतंत्र्यांच्या श्रृंखला सोडवू शकलेला नाही. उलट त्या श्रृंखला अधिकाअधिक घट्ट होऊ लागलेल्या दिसत आहेत, आणि हीच खरी खंत आहे.

■ ■ ■

परिशिष्ट ३

श्री गुलाबराव महाराजांचे स्फुट विचार

हिंदूची व्याख्या

- हिंदु कोणास म्हणावे ?

उत्तर–१) वेद पुराणे व त्यातील तत्त्वांवर आधारलेले निरनिराळे संप्रदाय ज्यास मान्य आहेत व जो परंपरागत हिंदुच्याच पोटी आला आहे त्यास.

२) परंतु हे ज्यास मनापासून प्रमाण वाटतात त्यालाही दीक्षहिंदू किंवा दीक्षार्य म्हणावे.

३) ज्याला हे मान्य नाहीत व केवळ हिंदूच्या पोटी आला आहे तो जन्मार्य म्हणजे जन्महिंदू होय.

४) उभयार्य सर्वथा श्रेष्ठ आहेत, पण उभयार्य नसेल तर पूज्यतेच्या दृष्टीने दीक्षार्यच मी श्रेष्ठ मानतो. (साधुबोध)

धर्मास कां सोडावे ?

- सर्व धर्म समान आहेत तर आपल्याच धर्मात कां रहावे ?

उत्तर–सर्व धर्म समान आहेत तर आपल्याच धर्मास का सोडावे !

परधर्म ग्रंथवाचन

- परधर्माची पुस्तके वाचावी की नाहीत ?

उत्तर–आपल्या धर्माचा विसर पडेल अशा रीतीने ती वाचू नयेत. स्नेहाने जेवावयास बोलाविले असता कोणाच्या येथे जाण्यास हरकत नाही, परंतु परान्नाची रूची लावून घेणे जसे वाईट तसेच परधर्माची पुस्तके वाचण्यासंबंधी आहे.

भांडणे मोडणारा धर्म

- आपल्या धर्मात दुसरे लोक येऊ शकत नाहीत असा हा तुसट व एकटकोंबडा आहे किंवा नाही ?

उत्तर–तसा तर तो मुळीच नाही; परंतु तो परधर्माचा द्वेष करणारा नसल्यामुळे व कोणताही धर्म कधी ना कधी सनातन तत्त्वाला जाऊन मिळेल असा त्याचा निश्चय असल्यामुळे धर्माधर्मातील भांडण मोडणारा हाच एक धर्म आहे. परधर्मी लोकांना काफिर समजून कापून टाकावे असे वेड आपल्या धर्मात कधीच उत्पन्न झाले नाही व होणार नाही. (सा.बो.५५२)

धर्म परावर्तन

इतर धर्मवादी दुसऱ्यांना आपल्या धर्मात घेतात तसे आम्हीही घेतो–पण त्यांची इच्छा असली तर घेतो. तरवारीने त्यांचा धर्मच्छेद करून आम्ही त्यांना भक्तिमार्गात घेत नाही.

(सा. ५५३)

धर्मातील ढवळाढवळ

आमचे म्हणणे इतकेच आहे की परधर्माला आम्ही जसे प्रेमाने वागवितो तसेच त्यांनीही आम्हास प्रेमाने वागवावे मात्र आमच्या धर्मात ढवळाढवळ करू नये. आणि परधर्मात ढवळाढवळ करण्याचा स्वभाव आमचा नाही.

स्वत:च्या धर्मात ढवळाढवळ केली तरी हिंदूनी उगे राहवे– म्हणजे हिंदुत्व नाहीसे करावे काय ? असे का तुझे म्हणणे आहे ?

हिंदूंनी युक्तिवादच प्रथम केले मुसलमानांचा व हिंदूंचा धर्मद्वेष तरी धर्मद्वेषाने पडलेला नसून हिंदूंना जीवापलीकडे वाटणारी बायकांची अब्रू, ती घेतल्यामुळे पडला आहे. असे टॉड कृत राजस्थानच्या इतिहासावरून दिसते. (५५५)

पुरातनत्व

- सर्व धर्मात हिंदुधर्म सर्वांच्यापूर्वी होता हे जसे तुम्ही म्हणता तसेच सर्व धर्मवेत्ते म्हणतात. तेव्हा खरे कोणते ?

उत्तर–ज्या धर्मात ज्ञात गोष्टी अधिक आहेत व अदृष्ट कल्पना कमी आहेत तो तो धर्म जीवप्रणीत असे ठरलेले असून ऐतिहासिक पुरातनत्व आर्यधर्माकडे येतही आहे.

आर्यदेश कसा टिकला ?

- महंमदी व ख्रिश्चनादि धर्मांनी देशच्या देश आपल्याकडे ओढले असताही हा आर्यदेश कसा टिकला ?

उत्तर–सर्व धर्म आपल्या धर्माचीच अधिकारानुसार स्वरूपे आहेत हे आर्यांस ठाऊक आहे शिवाय,

१) इतर धर्मात नाही ते आर्यधर्मात आहे.

२) इतर धर्मात आहे तेही आर्यधर्मात आहे.

३) आर्यधर्मात नाही ते इतर कोठल्याही धर्मात नाही. हे आर्यांच्या सहवासामुळे इतर धर्मियांना कळू लागले आहे.

४) पुनः इतर धर्मियांनी जरी आर्य धर्म मोडण्याची खटपट केली तरी आर्यधर्माने इतर धर्म मोडण्याची खटपट केली नाही –या आर्यांच्या धर्मभेदसहिष्णुतेमुळे आर्यांचा नायनाट करणे विचारी पुरुषांना बरे वाटले नाही. जे जे धर्म हिंदुस्थानात आले त्यांनी शेवटी आपले आर्यांशी ऐक्यच करून घेतले.

१) बौद्धधर्माच्या महायान पंथाशी व शिवपंथाशी एकीकरण झाले होते. याविषयी– "बुद्धो वा थ गिरीशोऽथवा" इत्यादि श्लोक प्रमाण आहेत. (दार्जीलिंगला दुर्जयलिंगमंदिरात शिव व बौद्ध दोघेही आपापल्या पद्धतींनी पूजा करतात)

२) पार्शी धर्माचे ऐक्य त्याच्या झालेल्या संस्कृत भाषांतरावरून कळते.

३) "मस्नवी ए मानवी" इत्यादी सूफी ग्रंथांवरून मुसलमान इकडे येण्यापूर्वीसुद्धा त्यांच्यात हिंदुग्रंथाविषयी आदर होता असे दिसून येते– हिंदु व मुसलमानांचा ऐक्य करणारा "दिन इलाह" या नावाचा धर्म आकबराने काढला होता असा इतिहास आहे. (दारा शुको ने तर त्यासाठी प्राणार्पणही केले.)

४) ख्रिश्चन व हिंदुधर्माचे ऐक्य करण्याची खटपट आता चाललीच आहे (थियासफी)

तथापि ही खटपट हिंदूंनी आपल्याकडून करून घेतली असा कोठेही इतिहास नाही. तर दुसरीकडून येथे येऊन राहणाऱ्यांनीच हिंदुधर्माला भाळून आपले ऐक्य करून घेतले, असाच इतिहास सापडतो.

दुसरीकडे कितीही जड सुधारणा झाली तथापि तिचा जेव्हा कंटाळा येईल तेव्हा सर्वांना शांती आर्यावर्तातच मिळेल. (युरोप अमेरीकेतील हरेकृष्ण संप्रदाय आणि इतर योगसंप्रदायांना मिळणारा प्रचंड प्रतिसाद हे महाराजांच्या म्हणण्याचे प्रत्यंतर आहे) व याचमुळे आर्यदेश टिकला आहे व टिकणार आहे (५५६)

सर्व जगाचा धर्मग्रंथ

- सर्व जगाचा धर्म होण्यास पात्र असे कोणते पुस्तक आहे ?

उत्तर–होय पात्र झालेच आहे. तें पुस्तक म्हणजे "गीतासंवलित महाभारत" होय.

जीवनाचे ध्येय

प्रज्ञाचक्षू समन्वयमहर्षी श्रीगुलाबराव महाराजांची उत्कट राष्ट्रभक्ती आणि जीवनाचे ध्येय व्यक्त करणारी भूमिका–

"आर्यांचे म्हणणे योग्य आहे हे सिध्द करण्याशिवांय मला आणि माझ्या हिंतचिंतकांना जीवनात कोणतेही काम नाही. सांख्य-योग-वेदान्त जे काही असेल ते आमचे हेच ! आणि इतर कामाची टाळाटाळी करणारा मीही–या कामात कधीही टाळाटाळी करीत नाही. एवढाच माझ्या आयुष्यात नियमितपणा दिसत असेल. तेव्हा हे मी आपले काम बरोबर करीत आहे, असा माझ्यावर विश्वास ठेवून मला येवढे साह्य करावे."

❖ ❖ ❖

सर्वधर्म समन्वय

१) जगातील सर्व धर्मांचे अधिष्ठान एकच – सत्ववृद्धि

पण

२) आचार-विचारांची भिन्नता योग्यतेनुसार असते.

म्हणून

३) स्वत:चा उपासनामार्ग निष्ठेने आचरल्यास परम-प्राप्ती होते–नराचा नारायण होतो.

म्हणून

४) स्वत:चा संप्रदाय सोडण्याचे कारण नाही. आणि दुसऱ्या संप्रदायाचा द्वेष करण्याचेही कारण नाही.

एकाधिकरणक–भिन्नवृत्तित्वे सति,
सम्प्रदाय–विच्छेद–रहितत्वे सति च,
पूर्वनिक फलोपष्टम्भ–अनन्तरम्,
एक-फल जनकत्वम्–समन्वयलक्षणम्

❖ ❖ ❖

सर्व धर्मांचे मूळ – सत्ववृद्धि

श्री गुलाबराव महाराजांनी समन्वयाचे ९ प्रकार सांगितले असून धर्म ज्यावर आधारित आहेत ते मूळ तत्त्व सत्ववृद्धि म्हणून सांगितली आहे. जगातील प्रत्येक संप्रदाय प्रत्येक धर्म मानवातील तमोगुण आणि रजोगुण कमी करून सात्विकता वाढविण्यास शिकवितो.

स्वार्थाकडून परार्थाकडे व परार्थाकडून परमार्थाकडे जाण्याची वाट म्हणजे धर्म होय. यासाठी योग्य तो आचार आणि योग्य तो विचार म्हणजे सांप्रदायिक अनुष्ठान होय.

अशा मनुष्याला सत्वगुणाकडे नेणारा मार्ग स्वधर्मात असो की परधर्मात असो तोच खरा परमधर्म आहे असे महाराजांचे मत आहे. याप्रकारे जगातील सर्व धर्मांचे-संप्रदायांचे व चांगल्या संस्थांचे मूळ तत्त्व या व्याख्येत आले आहे, असे म्हणावयास हरकत नाही–

सत्त्ववृद्धिर्मवेद्येन–अन्य गुणद्वय घातिनी ।
स हि धर्मो न चान्यः स्यादिति स्वमतनिर्णयः ।।
स्वधर्मे परधर्मे वा यत्सत्वफलसाधकम् ।
तत्तदस्तु परं धर्म्यमिति स्वमतनिर्णयः ।। गुलाबराव महाराज ।।

१४३४

❖ ❖ ❖

पूजनीय गुरुजींचे विचार

हिंदी समाज संकल्पना : एक धोका

"हिंदी" या अर्धवट परकीय नावाखाली आम्ही आमच्या पूर्वीच्या आक्रमकांना आणि शत्रूंना आमच्या देशबंधूप्रमाणे लेखू लागलो. आमच्या लढ्यांत त्यांनी आमच्याशी सहकार्य करावे म्हणून त्यांना वळविण्याचा आपण प्रयत्न करू लागलो

"आमचे शत्रू हे आमचे मित्र आहेत" असे सांगून आम्हाला ठकविण्यात आले आहे. आणि आपल्या स्वतःच्या हातांनी खऱ्या राष्ट्रियत्वाचा पाया आम्ही उखडून टाकीत आहोत. आमच्या जुन्या कट्टर शत्रूंना आमचे मित्र समजण्याचा मोठेपणा, हा आजच्या क्षणाचा खरा धोका आहे.

त्यांनी मात्र आपला बुद्धिभेद होऊ दिला नाही. "आपण बाहेरून आलेले विजेते व जुने राज्यकर्ते आहोत" असे ते स्वतःला समजतात आणि अधिक अधिकारासाठी सदैव धडपड करीत असतात. आपण मात्र स्वतःची फसवणूक करून घेत आहोत आणि परकीयांना राष्ट्रीय बनविण्याच्या भरांत आपण त्यांची बकासुरी भूक वाढविण्यांतच यशस्वी होत आहोत. —[आम्ही कोण]

❖ ❖ ❖

" गोऱ्या कातडीच्या अहंगंडामुळे त्यांची दृष्टी साफ नाही हे विसरून चालणार नाही. त्यांच्याचपैकी काही लोकांच्या ताब्यात आपले राष्ट्र आहे. या राष्ट्राची अत्यंत प्राचीनता आणि श्रेष्ठता ते कसे मान्य करतील. त्यांचेजवळ ती मनाची उदारता नाही आणि सत्याची चाडही नाही. स्वतःची शरीरे वेडीवाकडी रंगवून व गोंदवून अगदी कालपरवापर्यंत ते उघडेनागडे रानावनातून भटकत होते. तेव्हा जगातील सर्व लोक त्यावेळी त्याहीपेक्षा रानटी अवस्थेत होते, असे अट्टाहासाने दाखविणे त्यांना क्रमप्राप्तच आहे. पण जेव्हा....

हिंदुसंस्कृतीचे श्रेष्ठत्व, बौद्धिक आणि आध्यात्मिक पराक्रम त्यांना नाकबूल करता येईनात तेव्हा ते असे सिद्ध करण्याचा प्रयत्न करू लागले की — प्रारंभी एकच आर्यवंश कोठेतरी होता. आणि तेथून निघून तो युरोप, इराण आणि हिंदुस्थान यामध्ये पसरला. पण युरोपियन शाखेची प्रगती होत गेली तर उलट हिंदुशाखा भारतातील आदिवासींशी मिसळल्याने तिचा शुद्धपणा राहिला नाही आणि ती अधोगत झाली.

आपल्या देशातील सर्व विद्यापीठातून असल्या मूर्खपणाच्या कल्पना आपल्या कोवळ्या वयाच्या विद्यार्थ्यांच्या डोक्यात कोंबण्यात येतात. शक्य तितक्या लवकर आपण आपल्या इतिहासाचा नीट मागोवा घेऊन स्वतःच आपला सत्य इतिहास लिहिला पाहिजे. आणि मुद्दाम किंवा चुकीने पसरविण्यात येत असलेले हे गैरसमज ताबडतोब दूर केले पाहिजेत.

—**पूजनीय गुरुजी** [आम्ही कोण]

